# GEOGRAPHY

## PART I.

( *For Standard IV.* )

BY

RAMCHANDRA JANARDAN GOKHALE, B. A.
Teacher, Training College for Men, Poona.

*Publisher—Manager, New Kitabkhana,*
Budhwar Peth, Poona City.

---

# भूवर्णन.

## भाग १.

( मराठी चौथ्या इयत्तेकरितां. )

लेखक

रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.,
शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.

प्रकाशक—म्यानेजर नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें.

आवृत्ति चौथी.

सन १९१४.

*Price 3 Annas.* किंमत ३ आणे.

हें पुस्तक पुणें एथें रा. त्र्यंबक हरी आवटे यांनीं
'इंदिरा' छापखान्यांत छापिलें
व
रा० विद्याधर हरी दामले नवीन किताबखान्याचे म्यानेजर
यांनीं प्रसिद्ध केलें.
( पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपल्याकडे ठेविले आहेत. )

# पाहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

सुधारलेल्या इयत्तापत्रकाप्रमाणें मराठी चौथ्या इयत्तेस ‘ मुंबई इलाख्याची सामान्य माहिती,† मराठी जिल्ह्यांची विशेष माहिती,†व हिंदुस्तानचें सामान्य वर्णन ’ हा भूगोलविषयाचा भाग आहे; तो शिकविण्यास उपयोगीं पडावें म्हणून भूवर्णन भाग १ ला, हें पुस्तक लिहिलें आहे.

प्रचलित भूवर्णनविषयक पुस्तकांपेक्षां यांत ज्या **विशेष गोष्टी** आहेत, त्या येणेंप्रमाणें:––( १ ) प्रदेशाची स्वाभाविक रचना, हवा, पिकें, उद्योगधंदे, व्यापार, लोकस्थिति इत्यादिकांसंबंधानें **माहिती** होतां होईतों **सकारण** ( कारणकार्यरूपानें ) दिली आहे;( २ )शक्य होतें तेथें **मनोरंजक माहिती** घातली आहे;(३)**तुलनात्मक पद्धतीचा उपयोग** ठिकठिकाणीं केला आहे; व ( ४ ) भूवर्णनात्मक माहिती **नकाशांच्या साहाय्यानें** मिळविण्याची संवय मुलांस लागावी अशी तजवीज केली आहे.

प्रस्तुत पुस्तकांत विद्यार्थ्यांकरितां जो मजकूर आहे त्याच्या पानांची संख्या जरी ८० आहे, तरी त्यांतील कांहीं भाग वर्णनात्मक असल्यामुळें व कांहीं भागांत पूर्वींच्या माहितीची निराळ्या संबंधांत पुनरुक्ति झाल्यामुळें, मुलांनीं लक्षांत ठेवावयाचा मजकूर खरोखरी पुष्कळ कमी आहे. म्हणून प्रस्तुत पुस्तकांतील लक्षांत ठेवावयाचा भाग प्रचलित पुस्तकांपेक्षां अधिक नाहीं असें दिसून येईल.

प्रस्तुत पुस्तक तयार करण्याचे कामीं मेसर्स मॅकिंडर्, मिल्, मीकलजॉन, स्मिथ, ब्लॅनफर्ड, आर्डन वुड्, मॉरिसन वगैरे इंग्लिश ग्रंथकारांचे ग्रंथ, सरकारी रिपोर्ट व पुस्तकें, आणि व्यापारी भूगोल, कृषिकर्मविद्या वगैरे मराठी ग्रंथ यांचा फार उपयोग झाला आहे; म्हणून त्या त्या ग्रंथकारांचा प्रस्तुत ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

पुणें, ता. १५ मे १९१०. ग्रंथकर्ता.

# चौथ्या आवृत्तीची प्रस्तावना.

पूर्वींच्या आवृत्तींतील चुका व आंकडे यांत आवश्यक तेवढी दुरुस्ती करून ही आवृत्ति पहिल्या आवृत्तीबरहुकूम छापली आहे.


पुणें, १ फेब्रुआरी १९१४. ग्रंथकर्ता.

---


†सामान्य माहिती व विशेष माहिती या शब्दांच्या अर्थासंबंधानें बऱ्याच शिक्षकांचा गैरसमज दिसून येतो. ‘सामान्य माहिती’ याचा अर्थ महत्त्वाची स्थूल माहिती व ‘ विशेष माहिती’ याचा अर्थ ( सामान्य माहितीपेक्षां जास्त अशी ) सविस्तर माहिती असा आहे, हें शिक्षकांनीं ध्यानांत ठेवावें.

# अनुक्रमणिका.


शिक्षकांकरितां माहिती .................... निराळीं पानें १-१७
शिक्षकांस सूचना.......................... " १८-२२
प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करणारांस सूचना... " २३
मुंबई इलाखा--सामान्य वर्णन ........................ १-१६
सिंध.................................... १६
कच्छ.................................... १८
काठेवाड.................................. १९
गुजराथ.................................. २०
मराठी जिल्हे—..............................२३-५३
देशावरील मराठी जिल्ह्यांचें सामान वर्णन...२३-२५
कोंकणांतील मराठी जिल्ह्यांचें सामान्य वर्णन२५-२८
खानदेशाचें सामान्य वर्ण .................. ३०
पश्चिम खानदेश जिल्हा......................... ३३
पूर्व खानदेश जिल्हा.......................... ३४
नाशिक जिल्हा ............................. ३५
पुणें जिल्हा ................................ ३८
नगर जिल्हा................................ ४१
सातारा जिल्हा .............................. ४३
सोलापूर जिल्हा............................. ४६
ठाणें जिल्हा................................ ४८
कुलाबा जिल्हा .............................. ४९
रत्नागिरी जिल्हा............................ ५१
मराठी संस्थानें ............................ ५२
दक्षिणभाग ..................................५३-५५
हिंदुस्तानचें सामान्य वर्णन.................... ५५-८०




समुद्राच्या ज्या भागांत आडव्या रेघा काढल्या आहेत, तो भाग मुंबई बेट व कुलाबा जिल्ह्याचा पश्चिम भाग यांमध्यें आहे. या मुळें तो भाग जहाजें थांबण्यास फार सोईचा आहे. कारण पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्याचे भागांत मुंबई बेट आल्यानें बंदरांतील समुद्रानें पाण्यावर त्याचा फारसा परिणाम होत नाहीं.





ज्या ठिकाणीं आडव्या रेघा काटल्या आहेत तो समुद्राचा भाग जमिनीच्या विमत्यांत अडकल्या सारखा आहे. यामुळें बाहेर या समुद्राची खळबळ व त्यावरून वाहणारा वारा यांचा ह्यावर फारसा परिणाम होत नाहीं. म्हणून हा भाग बंदरास फार सोईचा आहे.





ज्या प्रदेशाच्या दोहों बाजूस समुद्र आहे त्याच्या पृष्ठभागाचें सामान्य स्वरूप पुढें दिलेल्या दोन प्रकारांपैकीं एका प्रकारचें असतें.

प्रकार १ ला.




प्रकार २ रा.



# शिक्षकांकरितां माहिती.

[ प्रस्तुत पुस्तकांत दिलेली भूवर्णनात्मक माहिती मुलांस योग्य तऱ्हेनें शिकवितां यावी म्हणून जी इतर माहिती शिक्षकांना असणें अवश्य आहे ती पुढें दिली आहे. ]

## हिंदुस्तानचा नकाशा काढण्याची रीत.

( कॅमेरॉन् मारिसन् यांचे ग्रंथावरून, थोडा फरक करून. )

**अब** उभी रेघ घ्या. ती दुभागा. दुभागणाऱ्या बिंदूच्या किंचित् वर **क** बिंदू घ्या. ह्या बिंदूतून **अब**शीं काटकोन करणारी **डकई** रेषा काढा. **कई अक**एवढी करा. **डक** रेघ **बक**च्या निम्पट घ्या. **बड** सांधा. **बड** वाढवा, व **बड**च्या एकपंचमांशापेक्षां थोडी कमी **डफ** घ्या. **अफ** सांधा. **अई** व **बई** सांधा, आणि **अई**, **बई** वाढवा. **ईग बई**च्या सुमारें निम्पट ( निम्पटीपेक्षां किंचित् कमी ) व **ईह अई**च्या एकषष्ठांश ( अथवा **डफ**एवढी ) घ्या. **अ**पासून **ग**पर्यंत ( खालचे बाजूस वांकलेली ) कंसाकृति रेघ काढा. ही आकृति हिंदुस्तानच्या नकाशाचो चौकट किंवा सांगडा होय.

या आकृतींत **अ** हिंदुस्तानचे उत्तर टोंकाचे किंचित् पूर्वेस आहे. **ब** हिंदुस्तानचें दक्षिण टोंक होय. **क** इंदूर. **ड** काठेवाडचें पश्चिम टोंक. **फ** सिंधचें नैर्ऋत्य टोंक अथवा मॉंझ भूशिर. **ई** बंगालमधील चितगांव—चितागॉंग. **ग** आसामचें उत्तर टोंक. **ह** पूर्व बंगालचें दक्षिण टोंक. आतां **अफडबईहग** या आकृतीच्या आंतबाहेर हिंदुस्तानची बाह्यरेषा कशी गेली आहे हें लक्षांत ठेवा; म्हणजे हिंदुस्तानच्या नकाशाचा आराखडा सहज काढतां येईल.

## प्रदेशाचा उतार व उंचसखलपणा यांसंबंधानें नियम.

जिकडे उतार असतो तिकडे वाहात जाण्याचा पाण्याचा धर्म आहे. अडथळा येऊन मार्ग बंद होईपर्यंत पाणी सखल प्रदेशाकडे वाहात जात असतें. पृथ्वीवर पडणारें पावसाचें पाणी नद्यांस जाऊन

मिळतें, व नद्यांचें पाणी समुद्रास जाऊन मिळतें. म्हणून नद्या ज्या प्रदेशांतून वाहातात तो प्रदेश नद्यांचे दरम्यान असणाऱ्या प्रदेशाहून सखल होय, व ज्या प्रदेशांत समुद्र असतो तो प्रदेश पृथ्वीवरील इतर भूमिप्रदेशांपेक्षां जास्त सखल होय. पृथ्वीवरील सर्व समुद्र एकमेकांस जोडलेले आहेत; म्हणून सर्व समुद्रांची सपाटी एकच आहे. समुद्राची सपाटी भूमिप्रदेशाचे सपाटीपेक्षां कमी असतें; म्हणून इतर प्रदेशांची उंची मोजण्यास समुद्रसपाटी हें मूळ प्रमाण घेतात. नद्या भूमिप्रदेशांतून वाहात येऊन समुद्रास मिळतात. म्हणून नद्यांचे प्रवाहांचे उलट दिशेनें, समुद्रापासून जों जों दूर भूमिप्रदेशांत जावें, तों तों प्रदेशाची उंची वाढत जाते. नद्यांचा उगम डोंगरांत होतो म्हणून डोंगर सर्वांत उंच भाग होय हें उघड आहे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या असतां असें दिसून येईल कीं, (१) किनाऱ्यापासून भूमिप्रदेशांत जात असतां प्रदेशाची उंची वाढत जाते, (२) ह्या प्रदेशांत जोंपर्यंत मध्यें डोंगर लागत नाहींत तोंपर्यंत त्याची उंची समुद्रसपाटीपासून फारशी नसते; (३) जेथें डोंगरांची रांग लागते त्याच्या आसपासचा प्रदेश उंचवट्याचा असतो; (४) ह्या रांगेचे पुढें कांहीं अंतरावर डोंगरांची दुसरी रांग असेल, तर या दोन्ही रांगांमधील प्रदेश बराच उंचवट्याचा असतो; (५) व यापुढें दुसरा एकादा डोंगर नसून कांहीं अंतरावर समुद्र लागत असेल, तर डोंगरापासून समुद्रापर्यंतचा प्रदेश त्या समुद्राकडे फिरून उतरता होत गेलेला असतो. म्हणजे दोन समुद्रांचे मध्यें जो भूप्रदेश असतो, त्याचा असा साधारण नियम आहे कीं, त्याच्या मध्यंतरीचा प्रदेश उंचवट्याचा असतो व या प्रदेशाचे दोन्ही बाजूंचे प्रदेश समुद्राकडे उतरते होत गेलेले असतात.

ज्या प्रदेशाची समुद्रसपाटीपासून उंची ६०० किंवा १००० फुटांचे आंत असते त्यास सखल प्रदेश किंवा मैदान म्हणण्याची वहिवाट आहे. यापेक्षां ज्याची उंची अधिक असते त्यास उंचवट्याचा प्रदेश म्हणतात.

## किनाऱ्यास खांडी असल्यापासून दळणवळणास होणारा उपयोग.

समुद्राचें पाणी किनाऱ्याजवळ उथळ होत जातें; यामुळें जहाजें किनाऱ्याजवळ येऊं शकत नाहींत. अशा ठिकाणी जहाज खालील

गाळांत रुतेल किंवा खडकावर आपटेल अशी भीति असते. म्हणून नदी समुद्रास मिळाल्यामुळें अथवा किनाऱ्यास खांड असल्यामुळें ज्या ठिकाणीं समुद्राकिनाऱ्याजवळ खोल पाणी व (वाऱ्याचे सोसाट्यानें जहाज हालूं नये याकरितां) निवाऱ्याची जागा असते, तीं ठिकाणें जहाजांना थांबण्यास सोईचीं असतात. अशा ठिकाणांस बंदरें ह्मणतात.

जेथें खाडीचें तोंड आंतील भागापेक्षां अरुंद असतें, किंवा ज्या ठिकाणीं जमिनीचें एक टोंक समुद्रांत तिरपें येऊन समुद्राचा कांहीं भाग जमिनीच्या चिमट्यामध्यें अडकल्यासारखा होतो, तें ठिकाण बंदरास फार सोईचें असतें. कारण, अशा ठिकाणीं अरुंद तोंडामुळें किंवा जमिनीचा भाग आड आल्यामुळें समुद्रावरील वाऱ्याचा सोसाटा व समुद्रांतील लाटांचा खळखळाट यांचा परिणाम तेथील पाण्यावर फारसा होत नाहीं. अशा जागीं तुफानानें किंवा लाटांच्या जोरानें जहाजें एकमेकांवर किंवा बाजूच्या खडकांवर आपटण्याचें भय कमी असतें. म्हणून जहाजांना किनाऱ्याजवळ येण्यास व थांबण्यास अशा जागा फार चांगल्या असतात.

## समुद्र व बंदरें यांचा व्यापारास उपयोग.

खुशकीच्या मार्गापेक्षां जलमार्गानें केलेला प्रवास फार कमी खर्चाचा असतो. तसेंच बैलगाडीपेक्षां आगगाडीनें माल नेणें जितकें कमी खर्चाचें आहे त्यापेक्षांही जहाजांतून माल नेणें कमी खर्चाचें आहे. आगगाडीनें १०० मैल माल नेण्यास जेवढा खर्च लागतो तेवढ्याच खर्चांत तितकाच माल जहाजांतून हजार मैल जाऊं शकतो. या कारणामुळें ज्या स्थळीं जहाजें जाऊं शकतात तीं स्थळें व्यापारास फार सोईचीं असतात.

## पर्वताचे स्वरूपासंबंधानें ध्यानांत ठेवावयाच्या गोष्टी.

(१) लांबून डोंगर शेतांतील ऐरणीप्रमाणें दिसतो. यामुळें, डोंगराचे वरचा भाग अगदीं अरुंद असावा, व आपण डोंगर चढून माथ्यापर्यंत गेलों कीं लागलाच उतार लागत असावा असें वाटतें. परंतु वस्तुस्थिति अशी नसते. बहुतेक डोंगरांच्या माथ्यावर कमी-जास्त सपाट प्रदेश असतो. कांहीं डोंगरावरचा सपाट प्रदेश कांहीं फर्लांग रुंदीचा असतो, तर कांहींवरील कित्येक मैल रुंदीचा असतो.

( २ ) पर्वताच्या आसपासची जमीन सपाट नसून ती बऱ्याच अंतरापासून हळू हळू चढत आलेली असते. पर्वत ज्या मानानें लहान किंवा मोठा असेल त्या मानानें या चढावास आरंभ पर्वतापासून कमी अथवा जास्त अंतरावर होतो.

( ३ ) पर्वताच्या दोन्ही बाजू सारख्या उंचीच्या व सारख्या उताराच्या नसून एक बाजू बहुधा जास्त उंच ( जास्त उताराची ) असते. याचें कारण पर्वताच्या एका बाजूच्या प्रदेशापेक्षां दुसऱ्या बाजूच्या प्रदेशाची उंची कमी असते हें होय. उदाहरणार्थ, सह्याद्रीची पश्चिम बाजू जितकी उंच आहे त्याच्या निम्म्यानें देखील पूर्वेकडील बाजू नाहीं. ही गोष्ट खंडाळें घाटांतून किंवा थळ घाटांतून आगगाडीनें प्रवास करतांना स्पष्ट दिसून येते. हिमालयाची उंचीही दक्षिणेच्या बाजूनें जितकी आहे त्याचे निम्म्यानेंही ती उत्तरेकडे नाहीं.

( ४ ) पर्वताची उंची अमुक फूट आहे, हें वाचून असें वाटण्याचा संभव आहे कीं, त्या पर्वताचे पायथ्याशीं उभें राहिलें असतां आपल्यासमोर तितक्या फूट उंचीचा डोंगर दिसेल. परंतु खरी स्थिति अशी आहे कीं, पर्वताची उंची दिलेली असते ती त्याच्या पायथ्यापासून मोजलेली नसून समुद्राचे सपाटीपासून मोजलेली असते. पर्वतावरील हवामान व वनस्पति हीं कशा प्रकारचीं आहेत हें समजण्यास पर्वताची उंची समुद्रसपाटीपासून किती आहे हें कळणें आवश्यक असतें. म्हणून उंची समुद्रसपाटीपासून देण्याची चाल आहे.

( ५ ) पर्वत म्हणजे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत एकसारखा जाणारा डोंगराचा लांबच्यालांब सोट नसून टोंकास टोंक लागून असलेल्या अनेक डोंगरांचा समूह असतो.

( ६ ) कधीं कधीं असें घडतें कीं, एकाद्या पर्वतांत डोंगरांची एकच रांग नसून अनेक रांगा असतात व त्या कांहीं अंशीं जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणें एकीवर एक चढत गेलेल्या असतात. म्हणून एकंदर पर्वताची उंची समुद्रसपाटीपासून जरी पुष्कळ असली तरी साऱ्यांत उंच रांगेची तिच्या पायथ्यापासूनची उंची एकंदर उंचीचे मानानें थोडीच असते.

## पर्वतापासून हवा व लोक यांवर होणारे परिणाम.

**( १ ) हवेवर होणारा परिणाम**–(हवामानाखालीं दिला आहे)

**(२)पर्वतानें दळणवळणास अडथळा होतो**—हिंदुस्तानच्या उत्तरभागीं हिमालयाची जंगी भिंत असल्यामुळें तिकडून हिंदुस्तानावर कोणी स्वारी केली नाहीं, ही गोष्ट खरी आहे. परंतु हेंही खरें आहे कीं, या भिंतीमुळें हिंदू लोक व हिंदुस्तानच्या उत्तरेकडील देशांतील लोक यांमध्यें व्यापार अथवा अन्य तऱ्हेचें दळणवळण विशेष राहिलें नाहीं.म्हणून भाषा व रीतभात या बाबतींत हिंदुस्तानच्या उत्तरेकडील लोक हिंदूंहून फारच भिन्न राहिले आहेत. ह्याच कारणामुळें अराकानच्या डोंगरांपलीकडचे ब्रह्मी लोक बंगालमधील हिंदूंहून भिन्न राहिले आहेत. हिंदुस्तानच्या वायव्य दिशेस जरी पर्वत आहेत, तरी त्यांस खिंडी असल्यामुळें वायव्य सरहद्दीपलीकडील लोक व हिंदू लोक यांच्यांत दळणवळण राहून त्याचा एथील भाषा, धर्म, कलाकौशल्य यांवर परिणाम झाला आहे. विंध्य, सातपुडा आणि सह्याद्रि यांपासूनही दळणवळणास कांहींसा प्रतिबंध होत असल्याकारणानें उत्तर हिंदुस्तान व दख्खन, त्याचप्रमाणें देश व कोंकण, या प्रदेशांतील लोकांमध्यें भाषा व आचारविचार यांसंबंधानें भेद स्पष्ट राहिला आहे.

विंध्य व सातपुडा हे पर्वत पश्चिमेकडे किनाऱ्यापर्यंत न गेल्याकारणानें गुजराथेंत या पर्वतांचा दळणवळणास प्रतिबंध होत नाहीं. म्हणून तेथें वरील प्रकारचा भेद तितका दृष्टोस पडत नाहीं.

**(३)शौर्य व कंटकपणा हे गुण उत्पन्न करणारें स्थान पर्वत हें आहे**—डोंगराळ प्रदेशांत राहाणाऱ्या लोकांना उदरनिर्वाहाकरितां फार श्रम करावे लागतात व संकटेंही सोसावीं लागतात. यामुळें या प्रदेशांत राहाणारे लोक धाडशी व कंटक असतात. हिंदुस्तानच्या वायव्य सरहद्दीवरील पठाण, गुरखे लोक व शिवाजीस उपयोगीं पडलेले मावळे लोक ह्या नियमाचीं उदाहरणें होत.

**(४)पराभव पावलेल्या लोकांना पर्वत आसरा देतात**—शत्रूंचा हल्ला हटवितां येत नाहींसें झालें म्हणजे रजपूत व मराठे लोक डोंगराचा आश्रय करीत असत हें आपणांस इतिहासावरून माहीत आहे. पूर्वीं आर्य लोकांनीं हिंदुस्तानावर स्वारी केली, त्या वेळीं एथील मूळचे रहिवाशी डोंगरांत जाऊन राहिले. भिल्ल, कोळी, कोंड, संताळ, गोंड वगैरे लोक अशाच प्रकारचे होत.

## नदीच्या प्रवाहाच्या भिन्न भागांचें स्वरूप.

नदीच्या प्रवाहाचे सामान्यत: तीन भिन्न भाग मानतां येतात. नदीचा उगम बहुधा डोंगरांत होतो. डोंगराजवळील प्रदेश उतरता व खडकाळ असतो, यामुळें या उतरत्या व डोंगराळ प्रदेशांतून नदीचा प्रवाह मोठ्या जोरानें वाहातो. शिवाय या प्रवाहास इतर प्रवाह मिळालेले नसल्यामुळें तो लहान असतो. हा नदीचा प्रथमभाग अथवा **पूर्वप्रवाह** होय. डोंगराळ व उतरता प्रदेश संपून सपाट प्रदेशांत नदीचा प्रवाह गेल्यानंतर तो मंद होतो व रुंदावत जातो. शिवाय त्यास इतर प्रवाह मिळाल्यामुळेंही त्याचें पाणी वाढतें. हा नदीचा **मध्यप्रवाह** होय. पुढें प्रवाह जेथें समुद्रास मिळतो तेथें जमीन अतिशय सपाट असल्यामुळें प्रवाह अतिशय मंद होतो, व त्यांतील गाळ तळाशीं सांचूं लागतो. पुष्कळ गाळ सांचून प्रवाहास प्रतिबंध होऊं लागला म्हणजे त्या प्रवाहास फाटे फुटून ते समुद्रास जाऊन मिळतात. या फाट्यांच्यामध्यें जो प्रदेश असतो त्यावर पुराचे वेळीं पाणी पसरून गाळ सांचतो. या कारणानें हा प्रदेश दिवसें-दिवस वाढत जातो. अशा रीतीनें नदीच्या अनेक मुखांचेमध्यें जो त्रिकोणाकार प्रदेश बनतो त्यास ‘ डेल्टा ’ ( डेल्टा हें ग्रीक अक्षर त्रिकोणाकृति आहे म्हणून ) असें युरोपियन नांव आहे. नदीच्या मुखापासून कांहीं लांबीपर्यंतचे संथ प्रवाहाचे भागास नदीचा **उत्तर प्रवाह** म्हणतात.

१ नदीचे पूर्वप्रवाहाचा उपयोग फारसा होत नाहीं. कारण तो उतरत्या खडकाळ प्रदेशांतून वाहात असल्याकारणामुळें संथ नसतो, व तो उन्हाळ्यांत बहुधा आटतो.

२ मध्यप्रवाह मध्यम उपयोगी असतो.

३ उत्तरप्रवाह रुंद, संथ व नेहमीं टिकणारा असतो, म्हणून त्याचा फार उपयोग होतो. त्याच्यायोगानें कांठच्या प्रदेशांत गाळ सांचत असल्याकारणानें जमिनीस सुपीकपणा येतो.

नदीचा प्रवाह संथ अथवा जोराचा व खळखळाटाचा असणें हें, ती नदी ज्या प्रदेशांतून वाहाते त्याचा उतार व कमीजास्त उंच-सखलपणा यांवरच केवळ अवलंबून आहे हें ध्यानांत ठेवावें.

## नद्यांचे उपयोग.

( १ ) त्यांपासून प्यावयास, धुण्यास वगैरे पाणी मिळतें.

( २ ) त्यांना धरणें बांधून किंवा कालवे काढून शेतांस पाण्याचा पुरवठा करतां येतो.

( ३ ) होड्या चालविण्यास व एकंदरींत जलमार्ग या नात्यानें दळणवळणास त्यांचा उपयोग होतो.

( ४ ) सरहद्द ठरविण्यास त्यांचा उपयोग होतो.

( ५ ) पाण्याच्या जोरावर गिरण्या चालविण्यास नद्यांचा उपयोग होतो. गोकाकचे धबधब्यावर कापसाची गिरणी चालू आहे. शिवसमुद्र धबधब्याचे साहाय्यानें विद्युच्छक्तीचा संचय करून तिचा उपयोग म्हैसुरांतील सोन्याच्या खाणी चालविण्याच्या कामीं केला आहे.

( ६ ) कांठच्या प्रदेशांत गाळाचा संचय करून त्या प्रदेशास नद्या सुपीकपणा आणतात.

( ७ ) नद्यांच्या कांठचा प्रदेश मनुष्यांना राहाण्यास सोईचा पडतो. म्हणून त्यांच्या कांठच्या प्रदेशांत शहरें वसवितां येतात. जगांतील शहरांपैकीं बरींच शहरें नद्यांच्या कांठांवर वसविलेलीं आहेत.

## हवामान नियमित करणारीं कारणें.

एकाद्या प्रदेशांतील हवामान ( १ ) त्या प्रदेशाचे अक्षांश, ( २ ) त्याची समुद्रसपाटीपासून उंची, ( ३ ) समुद्राचें, भूप्रदेशाचें किंवा वालुकामय प्रदेशाचें सान्निध्य, व ( ४ ) त्यांतून वाहाणारे वाऱ्यांची दिशा या चार कारणांवर मुख्यतः अवलंबून असतें.

**(१) अक्षांशांचा हवेच्या उष्णतामानाशीं संबंध**—सूर्य भूमध्यवृत्ताच्या आसपास कोठेंतरी असतो, म्हणून त्याचे किरण लंबरूपानें भूमध्यवृत्ताच्या आसपास पडतात. या वृत्तापासून दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे जों जों दूर जावें तों तों सूर्याचे किरण जास्त जास्त वक्र‡ होत जातात. किरण जों जों जास्त वक्र तों तों त्यांचा प्रखरपणा कमी असा नियम आहे. याचा अनुभव सूर्याचे सकाळचे व संध्या-

‡ किरणांचा वक्रपणा ते ज्या प्रदेशावर पडतात त्याच्याशीं होणाऱ्या कोनाचे तिर्यक्पणावरून ठरवावयाचा.

काळचे अतिशय वक्र किरण, सकाळचे ९ व दोन प्रहरचे ३ वाजतांचे मध्यम वक्र किरण, व दोन प्रहरचे अतिशय कमी वक्र किरण, यांचा प्रखरपणा ताडून पाहिल्यानें कळून येणारा आहे. म्हणून भूमध्यवृत्तापासून दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे जों जों दूर जावें--म्हणजे एकाद्या प्रदेशाचे अक्षांश जों जों जास्ती-- तों तों तेथील उष्णतामान कमी असें आढळून येतें.*

पुढील स्थळांचे उष्णतामानाची वर्षाची सरासरी दिली आहे, तिजवरून वरील नियमाची सत्यता दिसून येईल.

| समुद्रकिनाऱ्यावरील शहरें. सरासरी | | | किनाऱ्यासून दूर असलेलीं शहरें. | | |
|---|---|---|---|---|---|
| नांव. | अक्षांश. | उष्णतामान. | नांव. | अक्षांश | उष्णतामान. |
| मंगलोर | १३ | ८० | मदुरा | १० | ८२ |
| मुंबई | १९ | ७९ | त्रिचनापल्ली | ११ | ८२ |
| सुरत | २१ | ७९ | अलाहाबाद | २५·५ | ७८ |
| कराची | २५ | ७७ | लाहोर | ३१·५ | ७५ |

**(२) प्रदेशाच्या उंचीचा उष्णतामानाशीं संबंध**—मैदानापेक्षां टेकडीवर व टेकडीपेक्षां डोंगरावर हवा जास्त थंड असते असें अनुभवास

---

*भूमध्यवृत्ताच्या उत्तरेकडे व दाक्षिणेकडे २३॥ अंशांपर्यंत सूर्य जातो. त्याच्या पलीकडे तो जात नाहीं. भूमध्यवृत्ताच्या उत्तरेस २३॥ अंशांवर जें वृत्त आहे त्यास **कर्कवृत्त** म्हणतात, व दक्षिणेस २३॥ अंशांवर जें वृत्त आहे त्यास **मकरवृत्त** म्हणतात. या दोन वृत्तांमध्यें सूर्य असतो म्हणून त्याचे किरण या भागांत अगदीं थोडे वक्र असतात. परंतु या वृत्तांचे पलीकडील भागांत ते जास्त वक्र असतात. यामुळें या वृत्तांपलीकडील प्रदेशांतील हवेचे मानानें या वृत्तांमधील प्रदेशाची हवा उष्ण असते. म्हणून या वृत्तांमधील प्रदेशांस **उष्णकटिबंध** (कटिबंध=कमरपट्टा, वाटोळा पट्टा; उष्णकटिबंध=उष्ण हवेच्या प्रदेशाचा वाटोळा पट्टा) म्हणतात. कर्कवृत्ताचे उत्तरेस ६६॥ अंशांपर्यंत व मकरवृत्ताचे दाक्षिणेस ६६॥ अंशांपर्यंत पृथ्वीभोंवतीं वाटोळ्या पट्टयांसारखे जे प्रदेश आहेत त्यांमध्यें हवा अत्यंत उष्ण किंवा अत्यंत थंड नसते; या प्रदेशांस **समशीतोष्णकटिबंध** म्हणतात. या समशीतोष्णकटिबंधांचे पलीकडे दोन्ही ध्रुवांभोंवतीं जे दोन वर्तुलाकार प्रदेश आहेत, त्यांस **शीतकटिबंध** म्हणतात. ह्यांतील हवा पराकाष्ठेची थंड असते.

येतें. यावरून असा साधारण नियम निघतो कीं, एकाद्या प्रदेशाची उंची जों जों अधिक तों तों त्यांतील हवा जास्त थंड असते. प्रत्येक हजार फुटांच्या चढास उष्णतामान तीन अंशांनीं कमी होतें असा नियम आहे. पुणें व सिंहगड, तसेंच सातारा व महाबळेश्वर यांचे अक्षांश जवळजवळ सारखेच आहेत, परंतु त्यांच्या उष्णतामाना-मध्यें फरक कितीतरी आहे यावरून ही गोष्ट समजून येईल. माथे-रान, महाबळेश्वर, उटकमंड, सिमला या ठिकाणीं हवा थंड असते याचें कारण या प्रदेशांची उंची होय. फार उंच प्रदेशांत हवा इतकी थंड असते कीं, तेथें पाणी गोठतें. हिमालयाचे उंच शिखरांवर पावसाऐवजीं बर्फ पडतें याचें कारण हेंच होय.

उत्तरगोलार्धांत, समशीतोष्णकटिबंध व उष्णकटिबंध यांचेमध्यें जें कर्कवृत्त आहे तें हिंदुस्तानाच्या मध्यभागांतून गेलें आहे.

**(३) समुद्राचे व भूप्रदेशाचे सान्निध्याचा हवामानाशीं संबंध**—सूर्याच्या किरणांच्या उष्णतेनें जमीन जितकी तापते, तितकें पाणी (समुद्र) तापत नाहीं; तसेंच रात्रीं (सूर्यकिरणांच्या अभावीं) थंडीमुळें जमीन जितकी गार होते, तितकें पाणी होत नाहीं. कारण उष्णतामान विवक्षित अंशांनीं चढण्यास जमिनीस किंवा इतर खनिज पदार्थांस जितकी उष्णता लागते, त्यापेक्षां पाण्यास पुष्कळ जास्त लागते. पाण्याच्या व जमिनीच्या या भिन्न धर्मांमुळें जे प्रदेश समुद्रापासून दूर व मोठ्या भूमिप्रदेशाच्या मध्यभागीं असतात, त्यांच्या दिवसाच्या व रात्रींच्या व त्याचप्रमाणें हिंवाळ्या-च्या व उन्हाळ्याच्या हवामानांत जितका फरक पडतो, तितका जे प्रदेश समुद्रास लागून आहेत त्यांच्या हवामानांत पडत नाहीं. म्हणून समुद्रास लागून असलेल्या प्रदेशांत हिंवाळ्यांतील थंडी व उन्हाळ्यांतील उष्णता यांमध्यें फरक थोडा ( १०-३० अंश फॅ० ) असतो; पण जे प्रदेश समुद्रापासून दूर असतात, त्यांमध्यें हा फरक पुष्कळ ४०-१०० अंश असतो. जो प्रदेश खडकाळ किंवा वालुकामय असतो, तेथें हें अंतर फार असतें.

जवळजवळ एकाच अक्षांशावर, परंतु कांहीं समुद्राजवळ तर कांहीं समुद्रापासून दूर, असलेल्या स्थलीं समुद्राच्या सान्निध्याचा व भूमिप्रदेशाच्या सान्निध्याचा हवामानावर काय परिणाम होतो, हें पुढील दोन कोष्टकांचे तुलनेवरून दिसून येईल.

### समुद्राजवळ असलेलीं स्थलें.

| नांव. | कमींत कमी सरासरी उष्णतामान. | जास्तींत जास्ती सरासरी उष्णतामान. | फरक. |
|---|---|---|---|
| मंगळूर | ७६ | ८३ | ७ |
| मुंबई | ७४ | ८५ | ११ |
| कराची | ६५ | ८७ | २२ |
| कलकत्ता | ६५ | ८५ | २० |
| कटक | ७० | ८९ | १९ |

### समुद्रापासून दूर असलेलीं स्थलें.

| नांव. | कमींत कमी सरासरी उ०. | जास्तींत जास्ती सरासरी उ०. | फरक. |
|---|---|---|---|
| बंगलोर | ६७ | ८० | १३ |
| अहमदनगर | ६२ | ८५ | २३ |
| मालेगांव | ६६ | ८८ | २२ |
| जबलपूर | ६१ | ९० | २९ |
| अलाहाबाद | ६१ | ९२ | ३१ |

मोठ्या भूमिप्रदेशाचे मध्यभागीं असलेल्या स्थलांपैकीं, कांहींची कमींत कमी व जास्तींत जास्ती उष्णतामानाची सरासरी पुढें दिली आहे, तिजवरूनही वरील नियम लक्षांत येईल.

| नांव. | कमींत कमी सरासरी उष्णतामान. | जास्तींत जास्ती सरासरी उष्णतामान. | दोहोंत फरक. |
|---|---|---|---|
| नागपूर | ६९ | ९३ | २४ |
| आग्रा | ६० | ९५ | ३५ |
| अजमीर | ५८ | ८९ | ३१ |
| लाहोर | ५४ | ९३ | ३९ |

**(४) एकाद्या प्रदेशांतून वाहाणारे वारे व त्या प्रदेशाचें हवामान यांमधील संबंध**–भूमिप्रदेशाकडून येणारे वारे कोरडे

असतात व ते बहुधा उन्हाळ्यांत जास्त उष्ण व हिंवाळ्यांत जास्त थंड असतात. समुद्राकडून येणारे वारे दमट (बाष्पयुक्त) असतात व ते उन्हाळ्यांत थंड व हिंवाळ्यांत कमी थंड असतात. तसेंच ध्रुवाचे दिशेकडून येणारे वारे थंड असतात व विषुववृत्ताकडून येणारे वारे उष्ण असतात. म्हणून एकाद्या प्रदेशाचे हवामान त्या देशांतून वाहाणाऱ्या वाऱ्यांचे स्वरूपावर अवलंबून असतें. हिंदुस्तानचे तिन्ही आंगांस समुद्र असल्यामुळें किनाऱ्याजवळील प्रदेशांतील हवा दमट असते. हिमालयाचे उत्तरेकडील भूप्रदेश उंच व थंड हवेचा आहे, यामुळें तिकडून येणारे वारे थंड व कोरडे असतात. म्हणून ईशान्येकडून मान्सून वारे वाहूं लागले, म्हणजे हिंदुस्तानांतील हवा थंड व कोरडी होते. तसेंच, बलुचिस्तानांतून येणारे वारे हिंदुस्तानच्या वायव्य भागांतील प्रदेशांतून वाहातात, म्हणून त्यांतील हवा कोरडी असते.

वातावरण स्तब्ध असलें किंवा वारा फार मंद असला, तसेंच हवा फार बाष्पयुक्त असली म्हणजे उष्णतामान जास्त भासून उकाडा होतो. पण वारा जसजसा जास्त जोरानें वाहूं लागतो तसतसें उष्णतामान कमी भासूं लागतें किंवा गारवा जास्त भासूं लागतो. म्हणून उष्णता कमीजास्त भासणें हें हवेंतील वाफेचें प्रमाण व वाऱ्याचे कमजास्त वाहणें यांवर अवलंबून आहे.

## हवामान नियमित करणारीं किरकोळ कारणें.

(१) **प्रदेशाच्या आसपासच्या पर्वतांची दिशा**—डोंगरांच्या योगानें ढग अडविले जातात, वाऱ्यास प्रतिबंध होतो किंवा त्याची गति बदलते. यामुळें पर्वताच्या योगानें शेजारच्या प्रदेशाच्या हवामानांत थोडासा फरक होतो. उदाहरणार्थ—दख्खनचे पश्चिमभागीं सह्याद्रि असल्यामुळें तो नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांना अडवून त्यांच्यांतील वाफेचें घनीभवन करवितो. या कारणानें सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रदेशांत पाऊस फार पडतो व पूर्वेकडील प्रदेशांत थोडा पडतो. त्याचप्रमाणें नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांचे मार्गांत हिमालय पर्वत असल्यामुळें या वाऱ्यांबरोबर येणारे बहुतेक ढग हिमालयाच्या पलीकडे जाऊं शकत नाहींत. या कारणानें हिमालयाच्या दक्षिणभागीं पुष्कळ व उत्तरभागीं फारच थोडा

पाऊस पडतो. ईशान्येकडून येणारे मान्सून वारे तिबेटासारख्या फार उंचीच्या व थंड प्रदेशांतून येत असल्यामुळें ते अतिशय गार असतात; परंतु त्यांच्या मार्गांत हिमालय पर्वत आडवा असल्यामुळें त्यांना कांहींसा प्रतिबंध होऊन हिमालयाचे दक्षिणेस जे प्रदेश आहेत त्यांना त्यांपासून तितकी थंडीची बाधा होत नाहीं. नाहीं तर ती फारच झाली असती. ( २ ) **जमिनीचें स्वरूप**—मातीपेक्षां खडक व खडकापेक्षां वाळू फार लवकर तापते व फार लवकर गार पडते. यामुळें मातीच्यापेक्षां माळाचे व खडकाळ प्रदेशांत आणि खडकाळ प्रदेशापेक्षां वाळवंटाचे प्रदेशांत उन्हाळ्यांत उन्हाळा व हिंवाळ्यांत थंडी हीं फार असतात. उदाहरणें सिंध, राजपुताना. ( ३ ) **हवेची आर्द्रता**—लवकर न तापणें व लवकर न निवणें या पाण्याच्या धर्मामुळें, ज्या हवेंत बरीच वाफ असते ती फार तापत नाहीं व फार थंड होत नाहीं. म्हणून ज्या प्रदेशांत समुद्रावरील दमट हवा येते, तेथें उन्हाळ्याचें व हिंवाळ्याचें उष्णतामान यांत फार फरक पडत नाहीं. याच कारणानें कोंकण व बंगालमध्यें भिन्न ऋतूंतील उष्णतामानांत फार फरक पडत नाहीं. कोणत्याही स्थलीं पावसाच्याचे दिवसांत, सकाळची उष्णता व दोन प्रहरची उष्णता यांमध्यें फार फरक पडत नाहीं याचें कारण हेंच होय. तथापि ज्या हवेंत वाफ फार असते त्या हवेंत थोडी उष्णता असतांनाही आंगास घाम येतो व उष्णता ८५ अंशांवर झाली असतां गदमदूं लागते. ( ४ ) **पाऊस**—पावसामुळें जमीन ओली होऊन पाण्याचा पुरवठा होतो व झाडी वाढते, यामुळें पावसानें हवेचें उष्णतामान थोडेंसें कमी होतें. म्हणून इतर सर्व बाबतींत दोन प्रदेश सारखे असून त्यांपैकीं एकांत जर पाऊस जास्त पडत असेल, तर त्यांतील उष्णतामान दुसऱ्या प्रदेशापेक्षां थोडें कमी राहील.

**सूचना**—पाऊस व झाडी यामुळें उष्णता कमी होते, पण ती थोडीशी कमी होते हें विसरतां कामा नये. उष्णता कमी जास्त करणारीं मुख्य कारणें अक्षांश व प्रदेशाची उंची हीं होत. ह्यांपुढें पाऊस व झाडी, हीं कारणें क्षुद्र आहेत. म्हणून मुख्य कारणें प्रतिकूल असतांना क्षुद्र कारणें अनुकूल असल्यानें फारसा फरक पडणार नाहीं. याकरितां ‘ पाऊस पुष्कळ पडतो ’ अथवा ‘ झाडी पुष्कळ आहे ’ म्हणून हवा थंड आहे असलीं विधानें करूं नयेत. अक्षांश कमी व

उंची कमी असतांना वरील कारणामुळें हवेंत थंडपणा विशेष येणार नाहीं. या कारणामुळें फरक पडेल तो एवढाच कीं, दोन प्रदेश इतर बाबतींत सारखे असून त्यांपैकीं एका प्रदेशांत पाऊस पुष्कळ पडत असेल किंवा झाडी पुष्कळ असेल, तर त्यामुळें त्या प्रदेशांतील हवा दुसऱ्या प्रदेशापेक्षां थोडी कमी उष्ण राहील. ' नद्या पुष्कळ आहेत म्हणून हवा थंड आहे ' हें विधानही चुकीचें आहे. कारण नद्यांमुळें हवेची उष्णता एकाद्या अंशापेक्षां कमी होणार नाहीं. जवळ डोंगर आहेत म्हणून हवा थंड आहे हें म्हणणें देखील चुकीचें आहे. जवळ डोंगर असल्यानें एकाद्या ठिकाणची हवा थंड होत नाहीं.

## हवेच्या रोगटपणाचीं कारणें व रोगट हवेचे प्रदेश.

कुजणाऱ्या पदार्थांचे संसर्गानें हवा रोगट होते. कुजण्याची क्रिया चालण्यास उष्णता व ओलावा या गोष्टी आवश्यक आहेत. पर्वतांचे उच्च भाग खेरीजकरून बाकीच्या सर्व ठिकाणीं हिंदुस्तानांत उष्णता कमीजास्त प्रमाणानें असतेंच. म्हणून हिंदुस्तानच्या ज्या भागांत झाडी व पाणी ( विशेषतः संथ किंवा सांचलेलें पाणी ) हीं फार असतात, तेथील हवा कमीजास्त मानानें रोगट असते. बंगालमधील सुंदरबन हें अशा प्रदेशाचें उदाहरण होय. अशा प्रदेशांपैकीं ज्या प्रदेशांत जमिनीस बराच उतार असतो, त्यांतील झाडपाला पावसाळ्यामध्यें पावसाचे पाण्यानें वाहून जातो, म्हणून त्यांतील हवा रोगट नसते. परंतु जे प्रदेश खोलगट असतात त्यांतील झाडपाला वाहून न जातां उलट त्या ठिकाणीं जवळच्या उंच प्रदेशांतील झाडपाला वाहून येतो. म्हणून अशा प्रदेशांतील हवा रोगट असते. अशा प्रकारचे प्रदेश, ज्यांत जंगल आहे अशा डोंगरांमधील दऱ्या व खोलगट भाग हे होत. हिमालयाच्या पायथ्याशीं असलेला तराई हा प्रदेश व इतर पर्वतांचे दऱ्याखोऱ्यांमधील प्रदेश यांतील हवा रोगट असते, याचें कारण हेंच आहे.

पावसाळ्यांत जमीन ओली होते, व पावसाळ्यांत व पावसाळ्याचे शेवटीं उष्णता बरीच असते; म्हणून वरील प्रदेशांत या दिवसांत हवा विशेष रोगट असते. इतर प्रदेशांत वरील दिवसांतच हवा कमीजास्त मानानें रोगट असते, याचें कारण हेंच होय. बागायती जमिनीजवळची हवा रोगट असते याचें कारणही वरील विवेचनावरून समजून येण्यासारखें आहे.

## प्रदेशाच्या सुपीकपणासंबंधानें नियम.

ऊन, पाऊस, जलप्रवाहांचें वाहाणें इत्यादि कारणांनीं भूपृष्ठावरील खडक व धोंडे यांचा चूर होऊन त्यांपासून माती तयार होत असते, व ही माती पावसाचें पाणी भूमिप्रदेशांतून वाहात जात असतां त्यामध्यें मिसळते. जोंपर्यंत पाण्यास जोर असतो तोंपर्यंत त्यांतील माती प्रवाहाबरोबर वाहून जाते. परंतु प्रवाहाचा वेग कमी झाला, म्हणजे माती तळाशीं थोडी थोडी सांचूं लागते. जेथें प्रदेशास उतार बराच असतो तेथें प्रवाहास वेग बराच असतो व जेथें उतार कमी असतो तेथें प्रवाहासही वेग कमी असतो. यामुळें असें होतें कीं, जो प्रदेश अतिशय कमी उताराचा अथवा सपाट असतो त्यांत पाण्याबरोबर वाहून येणारा गाळ फार सांचतो, व प्रदेशाचा उतार ज्या ज्या मानानें जास्त जास्त असतो, त्या त्या मानानें त्यांत मातीचा थर कमी कमी सांचतो. डोंगरावरून उतरतांना जमिनीचा उतार जों जों कमी होत जातो, तों तों तिच्यावरील मातीचा थर जास्त जास्त जाड होत जातो, असें जें आपणांस आढळून येतें त्याचें कारण हेंच होय.

माती व गाळ यांचा थर जेथें जाड असतो, तेथील जमीन बहुधा कसदार असते. असे थर विशेषतः सखल व सपाट प्रदेशांत असतात. म्हणून जे प्रदेश सखल व सपाट असतात ते सुपीक* असतात असा सामान्य नियम आहे. नद्यांचे मुखाजवळील प्रदेश बहुधा सखल व सपाट असतात व नद्यांचे प्रवाहाबरोबर येणारा गाळ या प्रदेशांत सांचतो, म्हणून ते फार सुपीक असतात. नद्यांचे कांठचा प्रदेश दूरच्या प्रदेशापेक्षां सखल असतो व त्यामुळें त्यांत इतर प्रदेशांतील गाळ येऊन सांचतो; म्हणून तोही सुपीक असतो.

जे प्रदेश खोलगट असतात त्यांमध्येंही इतर प्रदेशांतील माती वाहून येत असल्यामुळें ते सुपीक असतात. डोंगरांमधील कित्येक प्रदेश ( खोरीं ) सुपीक असतात याचें कारण हेंच होय.

---

* पिकें व झाडें यांची वाढ होण्यास मातीच्या जाड थराशिवाय उष्णता व पाणी यांची आवश्यकता आहे. पैकीं उष्णता ही सर्व हिंदुस्तानभर आहेच. मात्र पाण्याचा पुरवठा सर्व ठिकाणीं आहे असें नाहीं. दख्खनमध्यें कांहीं प्रदेशांत जमीन कसदार असूनही कधीं कधीं पाऊस भरपूर न पडल्यामुळें पिकें येत नाहींत व त्यामुळें दुष्काळ पडतो.

जे प्रदेश उतरते असतात त्यांतील माती वाहून जात असल्या-मुळें ते सुपीक नसतात.

यावरून असा नियम निघतो कीं, सखल व सपाट प्रदेश, खोल-गट प्रदेश, नद्यांच्या मुखाजवळील प्रदेश व नद्यांच्या कांठचे सपाट प्रदेश सुपीक असतात, व उतरते प्रदेश सुपीक नसतात. उतरत्या प्रदेशांत जों जों उतार कमी, तों तों जमीन कमी नापीक, व उतार जों जों जास्त तों तों जमीन जास्त नापीक. प्रदेशाच्या कमीजास्त उताराप्रमाणेंच त्यांतून वाहाणाऱ्या नद्यांचे प्रवाहास कमी जास्त वेग असतो; म्हणून नदीचा प्रवाह जसजसा जास्त मंथ असतो, तस-तसा कांठचा प्रदेश जास्त सुपीक असतो.

## हवामान, सुपीकपणा व भूप्रदेशाचें स्वरूप यांचा लोकांच्या स्वभावावर होणारा परिणाम.

**हवामान**—उन्हाळयापेक्षां हिंवाळयांत आपल्या आंगांत हुशारी जास्त असते. याचें कारण त्या ऋतूंतील थंड हवा हें होय. उन्हा-ळयांतील उष्ण हवेनें शरीरांतील ताकद कमी होऊन अगदीं थकल्या-सारखें वाटतें. यावरून प्रकृतीस थंड हवा चांगली, व उष्ण हवा वाईट, असा सामान्य नियम निघतो.

हवा उष्ण असून दमट असेल तर तिजमुळें आंगावर घाम फार सांचून राहतो. मुंबई व गुजराथ या भागांत आंगांत घाम फार येण्याचें हेंच कारण आहे. ज्या हवेंत आंगास पुष्कळ घाम आलेला दिसतो त्या हवेनें मनुष्यास लवकर थकवा येतो. म्हणून ज्या देशां-तील हवा उष्ण व विशेष दमट असते तेथील लोक फारसे सशक्त व तडफदार नसतात. बंगाली व गुजराथी लोक फारसे सशक्त नसतात याचें कारण हेंच आहे.

**सुपीकपणा**—ज्या प्रदेशांत जमीन सुपीक असते तेथें लोकांस उदरनिर्वाहार्थ फारसे श्रम करावे लागत नाहींत. परंतु जेथें जमीन कमी सुपीक किंवा नापीक असते, तेथील लोकांस शेतांत पुष्कळ खपल्याशिवाय पोटास मिळत नाहीं. म्हणून सुपीक प्रदेशांतील लोकांपेक्षां नापीक प्रदेशांतील लोक जास्त मेहनती असतात.

डोंगराळ प्रदेशांत जमीन बहुधा नापीक असते; यामुळें पोट भरण्यासाठीं तेथील लोकांना पुष्कळ श्रम करावे लागतात. शिवाय

डोंगराळ मुलखांतून हिंडतांना पुष्कळ श्रम व संकटें सोसण्याची त्यांना संवय होते. म्हणून अशा प्रदेशांतील लोक उद्योगी, धाडशी व कंटक असतात.

**सरहद्दीपासून अंतर**—ज्या लोकांवर शत्रूंचे हल्ले वरचेवर येतात, त्यांना शत्रूंशीं झगडण्याचे प्रसंग वारंवार येतात; म्हणून ते शूर होतात. कोणत्याही देशाचे सरहद्दीवर जे लोक असतात त्यांचेवर शत्रूंचा हल्ला प्रथम येतो. म्हणून असा साधारण नियम निघतो कीं, ज्या सरहद्दीचे बाजूनें शत्रूंचे हल्ले एकाद्या देशावर विशेष येतात, त्या सरहद्दीजवळच्या प्रदेशांतील लोक शूर असतात.

हिंदुस्तानच्या वायव्य सरहद्दीवरील व पंजाबांतील लोक शूर असण्याचें कारण हेंच आहे. देशाचे जे भाग सरहद्दीपासून दूर असतात तेथें शत्रूंची भीति कमी असल्यामुळें तेथील लोक सरहद्दीजवळच्या प्रदेशांतील लोकांपेक्षां कमी शूर असतात.

वरील नियमांचीं उदाहरणें:—

**पंजाब**मध्यें थंडी बरीच असते व त्याचा कांहीं भाग डोंगराळही आहे. शिवाय हा प्रदेश सरहद्दीजवळ असल्यामुळें हिंदुस्तानावर स्वाऱ्या करणाऱ्या लोकांचा मारा प्रथम तेथील लोकांवरच झाला आहे. या सर्व कारणांमुळें तेथील लोक फार सशक्त व शूर आहेत. पंजाबी पैलवान व शीख शिपाई प्रसिद्ध आहेत.

**नेपाळ** हा देश डोंगराळ असून नापीक व थंड हवेचा आहे. यामुळें तेथील लोक फार कंटक व शूर आहेत. नेपाळांतील गुरखे लोकांची शौर्यासंबंधानें फार प्रसिद्धि आहे.

**राजपुताना व मध्य हिंदुस्तान** हे देश मध्यम सुपीक आहेत; परंतु त्यांतील हवा हिंवाळ्यांत बरीच थंड असते. म्हणून त्या प्रदेशांतील लोक सशक्त आहेत. रजपुतांची शौर्यासंबंधानें फार ख्याति आहे.

**महाराष्ट्र देश** मध्यम सुपीक आहे व तेथील हवा साधारण थंड आहे; त्यामुळें तेथील लोक सशक्त आहेत.

**कोंकण** डोंगराळ व नापीक असल्यामुळें त्यांतील लोक उद्योगी व कंटक आहेत. परंतु तेथील हवा साधारण उष्ण व दमट असल्यामुळें व त्यांतील लोकांस पंजाबांतील लोकांप्रमाणें चांगल्या

प्रकारचें अन्न खाण्यास मिळत नसल्यांमुळें ते पंजाबांतील लोकां-इतके ताकदवान् व धिप्पाड नाहींत.

**मद्रास** इलाख्यांतील म्हैसूरच्या उंचवट्याच्या प्रदेशाची हवा मद्रासच्या इतर भागांपेक्षां कमी उष्ण असल्यामुळें, व तेथील लोकांस चांगलें अन्न खावयास मिळत असल्यामुळें, ते मद्रास इलाख्यांतील इतर लोकांपेक्षां धिप्पाड व शूर आहेत.

**बंगाल** देश सरहद्दीपासून दूर असून फार सुपीक आहे; व तेथील हवा उष्ण असून फार दमट आहे. यामुळें त्यांतील लोक शक्तींत व शौर्यांत कमी आहेत.

**गुजराथेंत** हवा उष्ण व दमट आहे, आणि जमीन फार सुपीक आहे; यामुळें तेथील लोक शक्ति व शौर्य यांत कमी आहेत.

**भिन्न जातींचे गुण**–शौर्याविषयीं प्रसिद्ध लोक–शीख, गुरखे, रजपूत, मराठे, मुसलमान. व्यापारांत हुशार लोक–पार्शी, मारवाडी, कच्छी, भाटे, यहुदी, बोहरी, खोजे व बंगाली. बुद्धिवान् म्हणून प्रसिद्ध लोक–बंगाली, शेणवी व इतर बहुतक ब्राह्मण, कायस्थ ( प्रभु ), पार्शी.

## भिन्न देशांतील लोकांचा वर्ण, व त्याचा हवा-मानाशीं संबंध.

थंड हवेंतील लोक गोरे असतात व उष्ण हवेंतील काळे असतात. हवा उष्ण असून बरीच दमट असेल तरीही वर्ण थोडासा गौर*राहातो.

उत्तर सरहद्दीवरील प्रदेशांत हवा थंड आहे, म्हणून तेथील लोक गोरे आहेत. मध्याहिंदुस्तान व महाराष्ट्र यांतील हवा साधारण थंड आहे, म्हणून तेथील लोक साधारण गोरे आहेत. बंगाल व पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेश यांतील हवा जरी उष्ण आहे, तरी ती दमट आहे, त्यामुळें त्यांतील लोक थोडेसे गोरे आहेत. त्यांतूनही कोंकणापेक्षां मलबारांतील हवा जास्त दमट असल्यामुळें मल-

---

* उन्हांत फिरणारे लोक घरीं सावलींत बसून राहाणाऱ्या लोकांपेक्षां ( उ० बायकांपेक्षां ) काळे असतात, व पावसाळ्यांत हवा दमट असते त्या वेळीं आंगाचा गोरेपणा थोडासा अधिक वाढतो, या नेहमींच्या अनुभवावरून वरील नियम लक्षांत येईल.

बारांतील लोक कोंकणांतील लोकांपेक्षां जास्त गोरे आहेत. मद्रासच्या पूर्व व दक्षिणभागांतील हवा फार उष्ण आहे; यामुळें त्यांतील लोक फार काळे आहेत.

---

## भूगोल शिकविण्यासंबंधानें शिक्षकांस सूचना.

**नकाशा व आराखडा यांचा उपयोग**—सीमा, पर्वत, नद्या, सरोवरें, शहरें वगैरेंचीं नांवें, स्थानें व सापेक्ष स्थिति ह्या गोष्टी नकाशावरून पाहिल्या असतां जशा चांगल्या समजतात व लक्षांत राहातात, तशा त्या केवळ पुस्तकांत वाचल्यानें समजत नाहींत व लक्षांत राहात नाहींत; म्हणून या गोष्टी नकाशावरूनच मुलांस माहीत करून द्याव्या, व त्यांची उजळणीही नकाशावरूनच करण्याची संवय त्यांना लावावी. नकाशा हातानें काढल्यानें वरील गोष्टी लक्षांत चांगल्या राहातात, म्हणून अशा गोष्टी नकाशांत दाखविल्यावर नकाशाचा आराखडा काढलेले कागद मुलांस देऊन त्यांमध्यें पर्वत, नद्या वगैरेंचा संबंध जसजसा येईल तसतशा त्या गोष्टी काढण्यास मुलांस सांगावें.

शक्य असल्यास, शिक्षकानेंही मुलांचे देखत फळ्यावर स्वतां काढलेल्या नकाशाचे साहाय्यानें मुलांना सर्व स्थलविषयक माहिती करून द्यावी.

ह्या पद्धतीपासून फायदे—शिक्षकानें काढलेला नकाशा मुलांचे देखत तयार होत गेल्यानें त्या त्या गोष्टी स्पष्टपणें दिसतात व मनावर चांगल्या ठसतात. तसेंच, मुलांना नकाशा काढावयास लावल्यानें त्यांना हातांनीं करण्याजोगा व्यवसाय मिळतो व स्वस्थ बसून राहाण्याचें कारण पडत नाहीं. शिवाय त्या त्या गोष्टी हातानें काढल्यामुळें मनांत चांगल्या ठसतात, व ध्यानांत चांगल्या राहातात.

**तुलना**—पुढें असलेल्या नवीन वस्तूचें पूर्वीं माहीत असलेल्या वस्तूशीं साम्य व भेद पाहाणें, म्हणजे नवीन वस्तूची तत्सदृश पूर्वपरिचित वस्तूशीं तुलना करणें, ही गोष्ट कोणत्याही नवीन वस्तूचें ज्ञान होण्यास आवश्यक आहे. एका जागेचें क्षेत्रफळ २००० चौरस फूट आहे, असें दुसऱ्यानें आपणास प्रथम सांगितल्यावर, आपणास ज्या जागेचें क्षेत्रफळ प्रत्यक्ष माहीत आहे, तिच्या कितीपट ती जागा

आहे, हें आपण तुलनेनें जाणल्याशिवाय ( म्हणजे अज्ञात क्षेत्राची ज्ञात क्षेत्राशीं तुलना केल्याशिवाय ) त्या जागेचे विस्तारासंबंधानें योग्य कल्पना आपणास होत नाहीं. म्हणून ज्या नवीन देशाचें ज्ञान मुलांस करून द्यावयाचें आहे त्याच्या सीमा, स्वाभाविक रचना, क्षेत्रफळ, लोकसंख्या, लोकस्थिति इत्यादि गोष्टींची पूर्वी परिचित झालेल्या देशाच्या त्या त्या गोष्टींशीं तुलना करावी.

**सीमा**—नकाशा दाखवून मुलांकडून काढून घ्याव्या.

**आकार**—देशाच्या आकाराचें कोणत्या तरी परिचित आकृतीशीं सादृश्य ठरवावें; म्हणजे आकार लक्षांत ठेवणें सोपें जाईल. उदाहरण, सिलोन देश पेरूप्रमाणें आहे असें ठरविल्यानें त्या देशाचा नकाशा काढतांना बाह्यरेषेची मर्यादा ठरविण्यास या सादृश्याचा कांहीं उपयोग होईल.

**स्वाभाविक रचना**—देशाच्या स्वाभाविक रचनेचें ज्ञान त्या देशासंबंधीं इतर माहितीचा पाया होय. म्हणून हें ज्ञान प्रारंभीं करून द्यावें. परंतु ही माहिती शिक्षकानें स्वतां न सांगतां समुद्रापासून त्या देशाचें अंतर आणि देशांतील नद्या व पर्वत यांचीं स्थानें यांवरून अनुमानरूपानें मुलांकडून काढून घ्यावी. शक्य असेल तेव्हां उच्चनीचभागदर्शक प्रतिमेच्या ( रिलीफ मॅपच्या ) साहाय्यानें ही माहिती मुलांस करून द्यावी, व नंतर ती साध्या नकाशावरून अनुमानरूपानें कशी मिळवितां येते हें दाखवावें.

**लांबीरुंदी**—प्रत्येक देशाची लांबी व रुंदी स्केलच्या साहाय्यानें मुलांस सांगावयास लावावें.

**पर्वत**—पर्वतांची दिशा, त्यांची लांबी वगैरे गोष्टी मुलांकडून नकाशाचे साहाय्यानें काढून घ्याव्या.

**नद्या**—नद्यांचा उगम, त्यांचे प्रवाहाची दिशा, प्रवाहास असणारीं मुख्य वळणें यांविषयींची माहिती नकाशावरून मुलांकडून काढून घ्यावी. ती त्यांस पुस्तकांतून पाठ करण्यास सांगूं नये.

**हवामान**—देशाचा उंचसखलपणा व त्यांतील पर्वत आणि नद्या यांची माहिती मुलांस करून दिल्यावर, ही माहिती व हवामानाचे स्थूल नियम, यांच्या साहाय्यानें त्या देशाचे हवामानाची माहिती मुलांस करून द्यावी.

**सुपीकपणा**—देशांतील नद्या, कालवे, पावसाचें मान यांवरून समजून येणारा देशांतील पाण्याचा पुरवठा, व त्या देशांतील जमिनीचा सपाटपणा अथवा उतार, व हवामान ह्या गोष्टी पाहून त्या देशाचा सुपीकपणा ठरवावा.

**पिकें**—देशाचें हवामान, जमिनीचें स्वरूप, पाण्याचा पुरवठा इत्यादि गोष्टींवरून त्यांतील पिकें ठरवावीं.

**उद्योगधंदे व कारखाने**—विशिष्ट उद्योगधंदे किंवा कारखाने विशेष स्थळींच कां दृष्टीस पडतात हें तेथील लोकांचें गुणधर्म, भूप्रदेशाचें स्वरूप, हवामान, व पिकें यांच्या अनुरोधानें समजावून द्यावें.

**व्यापार**—देशांतील पिकें, उद्योगधंदे व दळणवळणाचीं साधनें, यांशीं देशाचा आयात माल व निर्यात माल यांचा मेळ घालावा.

**लोकस्थिति**—हवामान, पिकें, जमिनीचें स्वरूप इत्यादि गोष्टींचा लोकांचा स्वभाव व त्यांची सांपत्तिक स्थिति यांशीं मेळ घालावा.

**भूवर्णनांतील सामान्य नियम**—कोणत्याही विषयांतील सिद्धान्तांचें किंवा सामान्य नियमांचें ज्ञान हेंच खरें उपयोगी ज्ञान होय. हा नियम इतर विषयांप्रमाणें भूगोल या विषयासही लागू आहे. परंतु सिद्धान्तांचीं अथवा सामान्य नियमांचीं उदाहरणें दाखविल्याशिवाय त्यांची योग्य कल्पना होत नाहीं; व त्यांचा प्रसंगीं उपयोग केल्याखेरीज त्यांचें ज्ञान असून नसल्यासारखेंच होतें. म्हणून कोणताही सिद्धान्त प्रथम शब्दांनीं न सांगतां प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून समजावून द्यावा; व तो मुलांना समजल्यावर त्याचा उपयोग शक्य तेवढ्या प्रसंगीं करवावा. उदाहरणार्थ, ‘ गव्हास थंड हवा व थोडा पाऊस ह्या गोष्टी मानवतात ’ हा नियम प्रथम तोंडानें न सांगतां, थंडीचे दिवसांत, “ हल्लीं शेतांत पिकें कोणतीं आहेत ? हीं पिकें याच दिवसांत लोक कां करतात ? कोंकणांत गव्हाचें पीक कां होत नाहीं ? ” वगैरे प्रश्न विचारून व त्या त्या गोष्टी होतां होईल तों प्रत्यक्ष दाखवून, आणि एकाद्या वर्षीं थंडीच्या दिवसांत पुष्कळ पाऊस पडून गव्हाच्या पिकाचें नुकसान झालें असल्यास ती गोष्ट पाहाण्यास मुलांस सांगून समजावून द्यावा. तसेंच ‘ ज्या हवेंत पाण्याची वाफ मिश्रित असते ती हवा उन्हानें विशेष तापत नाहीं व थंडीनें विशेष थंड होत नाहीं ’ हा

नियम समजावून सांगतांना त्याचें शाब्दिक विवरण न करतां पावसाळ्याच्या दिवसांत सकाळचें उष्णतामान व दोन प्रहरचें उष्णतामान यांत फरक किती असतो, व आकाश निरभ्र असतें त्या दिवशीं किंवा थंडीच्या दिवसांत तो फरक किती असतो, हें मुलांना पाहावयास लावावें. याप्रमाणें प्रत्यक्ष उदाहरणांनीं नियमांची माहिती करून दिल्यावर त्यांचा उपयोग करण्यास त्यांस लावावें. म्हणजे गहूं कोणत्या हवेंत पिकतो या नियमाची माहिती करून दिल्यावर ' यावरून हिंदुस्तानच्या कोणत्या भागांत हें पीक होत असावें ? ' 'अमुक देशांत हें पीक होत असेल किंवा नाहीं ?' असे प्रश्न भिन्न प्रसंगीं विचारावे. तसेंच ज्या हवेंत पाण्याची वाफ मिसळलेली असते ती उन्हानें विशेष तापत नाहीं व थंडीनें...इ० ' या नियमाचें ज्ञान करून दिल्यावर, रत्नागिरी जिल्ह्याचें हवामान अथवा सिलोनचें हवामान हा विषय निघाला असतां हवामानाची माहिती शिक्षकानें न सांगतां वरील नियमाच्या साहाय्यानें मुलांकडून काढून घ्यावी.

याप्रमाणें सर्व सामान्य नियम किंवा सिद्धान्त प्रत्यक्ष उदाहरणांचे द्वारें शिकवावे व त्यांचा योग्य प्रसंगीं उपयोग करवावा.

**सहली**—भूवर्णनांत ज्यांचा उल्लेख येतो अशीं स्थळें किंवा वस्तु यांपैकीं जीं जवळपास असतील तीं मुलांस अवश्य दाखवावीं. शक्य असल्यास सुटीच्या दिवसांत मुलांना आपल्याबरोबर प्रवासास नेऊन त्यांनीं न पाहिलेल्या गोष्टींचा त्यांना परिचय करून द्यावा. ज्या वस्तूंची प्रत्यक्ष माहिती मुलांना करून देणें अवश्य आहे अशांपैकीं कांहीं पुढील होत. डोंगर, खिंड, दरी, खोरें, किल्ला, शिखर, कडेपठार, घाट, कडा, बोगदा, नदीचा उगम, धबधबा, तलाव, धरण, कालवा, समुद्र, उन्हाळें, लेणें, भुइकोट किल्ला, मशीद, गिरणी, खाण, निरनिराळया प्रकारचे कारखाने, सरकारी कचेऱ्या, स्टेशन इ०.

**नमुने व चित्रें**—ज्यांचा उल्लेख भूवर्णनांत येतो त्यांपैकीं ज्या वस्तु मुलांना परिचित नसतील त्यांचा अथवा त्यांच्या नमुन्यांचा किंवा चित्रांचा शाळेंत संग्रह करून ठेवावा. अशा वस्तु पुढील होत:— ताग, वाक, अंबाडी, ज्यूट वगैरे तंतु; आपण ज्या भागांत राहातों त्यांत दृष्टीस न पडणाऱ्या धान्यांचे व लाकडांचे नमुने; निरनिराळीं

कापडें कोठें होतात हें दाखविण्याकरितां कापडावरील चित्रें ( या चित्रांवरील नांवें सामान्यतः इंग्रजी असतात हें खरें आहे, पण कांहीं देशी भाषांतही असतात ); सचित्र मासिक पुस्तकें आणि वर्तमानपत्रें यांतून येणारीं प्राण्यांचीं, इमारतींचीं व निरनिराळ्या देशांतील कारखान्यांचीं, देखाव्यांचीं व माणसांचीं चित्रें इ०. या वस्तूंचा योग्य वेळीं शिक्षकानें उपयोग करावा, आणि अशा वस्तु मिळवून आणण्याविषयीं विद्यार्थ्यांना उत्तेजन देत जावें. हातानें काढलेल्या नकाशांत देशाचे भिन्न भागांत होणारीं पिकें व इतर पदार्थ यांचे प्रत्यक्ष नमुने मुलांकडून चिकटवून ठेवल्यानें देशांतील पिकें व उद्योगधंदे यासंबंधाची माहिती मुलांचे लक्षांत चांगली राहील.

**वर्णन**—मोठे पर्वत, त्यांचीं शिखरें, भिन्न भिन्न देशांतील सृष्टिसौंदर्य मोठ्या नद्या, मोठीं देवस्थानें, क्षेत्रें, बंदरें, शहरें इत्यादि वस्तूंच्या स्वरूपाची कल्पना त्यांच्या नामनिर्देशानें होणें अशक्य आहे. म्हणून ह्या वस्तु प्रत्यक्ष किंवा उत्कृष्ट चित्रांचे साहाय्यानें दाखविणें अशक्य असेल तेव्हां शिक्षकानें मुलांस त्यांचें वर्णन द्यावें, अथवा तें पुस्तकावरून मुलांस वाचून दाखवावें. अशा प्रकारचीं वर्णनें कोणत्या पुस्तकांत वाचावयास मिळतील याबद्दल खालीं माहिती दिली आहे.

| स्थलाचें नांव. | ग्रंथकर्त्याचें नांव. | पुस्तकाचें नांव. |
|---|---|---|
| हिमालय | गो० ग० आगरकर | विविधविषयसंग्रह. |
| महाबळेश्वर | उदास | ग्रीष्ममहाबळेश्वरवर्णन. |
| ,, | आगरकर | विविधविषयसंग्रह. |
| पुणें | गायकवाड | पुणें शहराचें वर्णन. |
| मुंबई | शिंगणे व आचार्य | मंबईचा वृत्तान्त. |
| विजापूर | गायकवाड | विजापूरचें वर्णन. |
| दिल्ली | पारसनिस | दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ. |
| काशी | धोपेश्वरकर | काशीचें वर्णन. |
| काश्मीर | गोखले | काश्मीरचें वर्णन. |
| ,, | माने | काश्मीरचा प्रवास. |
| लाहोर | गो० बा० जोशी | लाहोरचा प्रवास. |
| रामेश्वर | य० ना० कढ्ढ | रामेश्वरची यात्रा. |
| सिलोन | रा० भ० पावगी | सिलोनचा प्रवास. |

# प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करणारांस सूचना.

जी माहिती अत्यावश्यक आहे किंवा मुलांना अगदीं नवीन आहे, ती प्रस्तुत पुस्तकांत मोठ्या टाइपांत छापिली आहे. विशेष महत्त्वाचीं नावें जाड टाइपांत छापलीं आहेत.

जी माहिती कमी महत्त्वाची अथवा वर्णनाच्या किंवा विस्ताराच्या स्वरूपाची आहे. तसेंच जी माहिती मागील माहितीची कमी-जास्त मानानें पुनरुक्ति आहे, ती बारीक टाइपांत छापिली आहे. ही सर्व माहिती मुलांनीं सविस्तरपणें ध्यानांत ठेवण्याची आवश्यकता नाहीं. जी सामान्य गोष्ट मनांत ठसविण्याकरितां ही माहिती दिलेली आहे, ती मनामध्यें ठसली म्हणजे या माहितीचें काम झालें. अशा माहितीचा कांहीं भाग मुलांच्या लक्षांत राहिला तरी पुरे आहे. उदाहरणार्थ, पुणें शहरासंबधानें ज्या दहापांच गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांतील ३–४ गोष्टी मुलांच्या लक्षांत राहिल्या तरी त्या पुरेशा आहेत. अशा प्रकारची माहिती शब्दशः पाठ करून घेऊं नये व ती मुलांनीं शब्दशः सांगावी अशी अपेक्षाही करूं नये. **ह्या माहितीची उजळणी करणें सोपें जावें म्हणून तिच्यांतील महत्त्वाचा भाग जाड टाइपांत छापिला आहे.**


जी माहिती प्रथमतः नकाशावरून मिळाविणें इष्ट आहे, त्य माहितीच्या हेडिंगचे पुढें* अशी फुली घातली आहे. अशी माहिती नकाशावरूनच मिळविण्याची सवय मुलांस लावावी.

शहराचे नांवापुढें कंसांत दिलेला आंकडा त्या शहराची लोकसंख्या किती हजार आहे हें दाखवितो.


नद्यांचे नांवापुढें कंसांत दिलेला आंकडा त्यांची लांबी किती मैल आहे हें दाखवितो.

या पुस्तकांतील बहुतेक यादी (उदाहरणार्थ, तालुक्यांचीं नांवें), व बहुतेक **आंकडे** (क्षेत्रफळ, लांबी, लोकसंख्या वगैरेसंबंधाचे) केवळ **तुलनेकरितां** व वाचकांची स्वाभाविक जिज्ञासा तृप्त करण्याचे हेतूनें दिले आहेत. ही माहिती मुलांकडून पाठ करवून घ्यावी असा ग्रंथकर्त्यांचा मुळींच हेतु नाहीं.

---



मुंबई इलाखा.
सीमा, पर्वत, नद्या, विभाग वगैरेचा
नकाशा.
स्केलाचें प्रमाण:- दीड इंचांत २५० मैल.
पंजाब
कच्छचें रण
कच्छ
कच्छचें आखात
गिरनार पर्वत
पोरबंदर
जाफराबाद
दीव बेट
सुरत
दमण
साबरमती नदी
मही नदी
विंध्य पर्वत
नर्मदा नदी
सातपुडा पर्वत
त्र्यंबकेश्वर
गोदावरी नदी
साष्टी
मुंबई
भीमाशंकर
महाबळेश्वर
कृष्णा नदी
गोवें




D.P.W. Poona. 1914.

# भूवर्णन भाग १ ला.

## मुंबई इलाखा.

### ( सामान्य वर्णन. )

**मध्यभाग** नांवाच्या ज्या विभागांत आपण राहातों तशा प्रकारचे कांहीं विभाग मिळून ' इलाखा ' होतो. आपण ज्या इलाख्यांत राहातों त्यास ' मुंबई इलाखा ' असें म्हणतात.

हिंदुस्तान देशाच्या पश्चिम किनाऱ्याजवळील सुमारें दोनशें मैल रुंदीच्या पट्टीपैकीं उत्तरेकडील दोनतृतीयांश भाग मुंबई इलाख्यांत येतो.

**सीमा**--*उत्तरेस पंजाब; पूर्वेस राजपुताना, मध्यप्रांत व निजामचें राज्य; दक्षिणेस म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा; पश्चिमेस अरबी समुद्र व हाला पर्वत ( आणि त्याचे पलीकडे बलुचिस्तान ).

**सीमांचें स्वरूप**-मुंबई इलाख्याची पश्चिमेकडील सीमा स्वाभाविक आहे.बाकीच्या सीमा कृत्रिम आहेत. जिला स्वाभाविक सीमा म्हणतां येईल अशी एकादी नदीदेखील पूर्व बाजूस नाहीं.

**लांबी व रुंदी**-*मुंबई इलाख्याची रुंदी सरासरी दोनशें मैल आहे. लांबी सुमारें १ हजार मैल आहे. रुंदीच्या सुमारें पांचपट लांबी आहे.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**-मुंबई इलाख्याचें क्षेत्रफळ १ लक्ष ८८ हजार चौरस मैल आहे. मुंबई इलाखा सातारा जिल्ह्याचे सुमारें ४० पट मोठा आहे. या इलाख्याची लोकसंख्या सुमारें २॥। कोट आहे.

या इलाख्याचा सुमारें एकतृतीयांश भाग देशी संस्थानिकांचे ताब्यांत आहे. त्याचें क्षेत्रफळ ६६ हजार चौरस मैल असून लोकसंख्या ७४ लाख आहे.

**उंचसखलपणा**—*समुद्रापासून अंतर, व डोंगर आणि नद्या यांचीं स्थानें हीं पाहिलीं असतां, या इलाख्यांत सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश ( व कांहीं अंशीं काठेवाडचा मध्यभाग ) उंचवट्याचा असून बाकी सर्व भाग सखल आहे असें दिसून येईल.

सह्याद्रीचे पूर्वेकडील प्रदेशास **देश** व पश्चिमेकडील अरुंद पट्टीस **कोंकण** असें म्हणतात.

**उतार**—*नद्यांचे प्रवाहाची दिशा पाहिली असतां, सिंधमध्यें उतार दक्षिणेकडे, गुजराथचे उत्तरभागांत उतार नैर्ऋत्येकडे व दक्षिणभागांत पश्चिमेकडे, सह्याद्रीचे पूर्वेकडील प्रदेशांत उतार पूर्वेकडे-किंचित् आग्नेयीकडे—व पश्चिमेकडील प्रदेशांत पश्चिमेकडे आहे असें आढळून येतें.

**पर्वत**—*सिंधचे पश्चिमेस **हाला** ऊर्फ **खिरथर** पर्वत; काठेवाडांत **गिरनार** पर्वत; गुजराथेंत **विंध्य**; गुजराथेच्या कांहीं भागांत व खानदेशाचे उत्तरभागीं **सातपुडा**; व सातपुड्याचे दक्षिणेस दक्षिणोत्तर **सह्याद्रि** आहे.

सातपुडा व सह्याद्रीचें उत्तर टोंक यांमध्यें थोडा सखल प्रदेश आहे, त्यामधून तापी नदी गेली आहे.

**सह्याद्रीचें** मुंबई इलाख्यांतील **अत्युच्च शिखर कळसूबाई** हें होय. तें नाशिक जिल्ह्यांत असून त्याची उंची ५४०० फूट आहे.

**सह्याद्रीचे घाट**—इगतपुरीजवळचा **थळघाट** व खंडाळ्याजवळचा **बोरघाट** हे महत्त्वाचे आहेत. त्यांतून ग्रे० इं० पे० रेल्वेचे रस्ते गेले आहेत. यांशिवाय इतर अनेक घाट आहेत.

***नद्या**——

( उत्तरेकडून दक्षिणेकडे गेलें असतां ज्या क्रमानें नद्या लागतात, त्या क्रमानें त्या पुढें दिल्या आहेत. )

**सिंधु**—( १८०० ) सिंधूचा उगम हिमालयाच्या

उत्तरेकडील भागांत होतो. तेथून ती प्रथम वायव्येकडे, व नंतर नैर्ऋत्येकडे पंजाब आणि सिंधप्रांत यांतून वाहात जाऊन अनेक मुखांनीं अरबीसमुद्रास मिळते.

सिंधूचें पात्र वारंवार बदलत असतें, यामुळें तिच्या कांठीं मोठीं शहरें फारशीं नाहींत.

**लुनी**—हिचा उगम राजपुतान्यांत अरवली पर्वताचे पश्चिमभागीं होतो. ती माळव्याचा उंचवटयाचा प्रदेश व सिंधच्या पूर्वेकडील वाळूचें मैदान यांमधून वाहात जाऊन कच्छचे आखातास मिळते. ( तद्देशीय उच्चार लूणी असा आहे. )

**साबरमती**—हिचा उगम राजपुतान्यांत अरवलीचे फाट्यांत होतो. ती गुजराथेंत शिरल्यावर दक्षिण दिशेनें वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते.

**मही**—ही माळव्यांत उगम पावून नैर्ऋत्येकडे वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते.

**नर्मदा**—( ७३५ ) नर्मदेचा उगम रेवा संस्थानांत अमरकंटकाचे डोंगरांत होतो. नर्मदा नदी पश्चिम दिशेनें विंध्य व सातपुडा यांचेमधून वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते.

( अमरकंटकाचे डोंगर मध्यप्रांताच्या ईशान्यभागीं आहेत. )

नर्मदा नदीचे प्रवाहास जोर बराच आहे; यामुळें होड्या, आगबोटी वगैरे चालविण्यास ही नदी बहुतेक निरुपयोगी आहे.

नर्मदा नदी जबलपुराजवळ जेथें शुभ्र संगमरवरी खडकांमधून वाहाते तेथील देखावा फारच रमणीय आहे.

**तापी**—( ४४० ) तापीचा उगम सातपुड्यांत बैतुलाजवळ होतो. तेथून ती पश्चिमेकडे वाहात जाऊन सुरतेजवळ खंबायतचे आखातास मिळते.

**गोदावरी**—( ९०० ) ही नदी सह्याद्रीचे पूर्वेकडील फाटच्यांत त्र्यंबकेश्वराजवळ उगम पावून आग्नेयीकडे वाहात जाऊन राजमहेंद्री शहराजवळ बंगालचे उपसागरास मिळते.

**कृष्णा**—( ८०० ) ही नदी सह्याद्रींत महाबळेश्वराजवळ उगम पावून प्रथम दक्षिणेकडे वाहात जाऊन, सुमारें २०० मैल अंतरावर पूर्वेकडे वळते. पूर्व दिशेनें सुमारें ५०० मैल वाहात गेल्यावर दक्षिणेकडे वळून बंगालचे उपसागरास मच्छलीपट्टणाजवळ मिळते.

कृष्णेचा प्रवाह–विशेषतः मुखाजवळ–संथ नाहीं. यामुळें त्यामधून जहाजें, गलबतें जाऊं शकत नाहींत.

**कृष्णा व गोदावरी यांची तुलना***–(**साम्य**)दोघींची उत्पत्ति सह्याद्रींत होते. ( २ )दोन्ही साधारणपणें एकाच दिशेनें वाहातात. ( ३ ) दोन्ही पूर्वघाटाचा भेद करून जातात. ( ४ ) दोन्ही नद्यांचे प्रवाहाचा बराच भाग निजामचे राज्याचे सरहद्दीवरून गेला आहे. (**भेद** )–गोदावरी प्रथम पूर्वेकडे वाहून नंतर दक्षिणेकडे वळते, व कृष्णा प्रथम दक्षिणेकडे वाहात जाऊन नंतर पूर्वेकडे वळते.( २ ) गोदावरीचा प्रवाह जास्त लांब व संथ आहे....इ०.

**कालवे**—सिंधु नदीस अनेक कालवे बांधले आहेत, त्यांनीं पुष्कळ जमिनीस पाण्याचा पुरवठा होतो.

**धबधबे**–**गिरसप्पा** व **गोकाक**. ( जास्त माहिती कारवार व बेळगांव जिल्ह्यांखालीं पाहा. )

**आखातें, बेटें व भूशिरें**–*सिंधचे नैर्ऋत्यभागीं **मॉंझ** भूशिर आहे. या भूशिरापासून किनाऱ्याचे बाजूनें आग्नेयीकडे गेलें असतां प्रथम **कच्छचें आखात** लागतें. या आखाताचे उत्तरेस कच्छ संस्थान व त्याचे पलीकडे **कच्छचें रण** आहे. कच्छचे आखातापासून काठेवाडचे किनाऱ्यानें

दक्षिणेकडे गेलें म्हणजे **दीव बेट** लागतें, व पुढें **खंबायतचें आखात** लागतें. तेथून दक्षिणेकडे जात असतां प्रथम **दमण बेट** व नंतर **साष्टी** आणि **मुंबई हीं बेट** लागतात.

**भिन्न भिन्न भागांतील हवामान**—सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश, ज्यास देश म्हणतात, तो उंचवटयाचा असल्यामुळें त्यांतील हवा मध्यम उष्ण आहे. तथापि ह्या प्रदेशांत जों जों पूर्वेकडे जावें, तों तों त्याची उंची कमी होत गेल्यामुळें हवा जास्त उष्ण होत जाते.

सह्याद्रीचे पश्चिमेकडील प्रदेश बराच सखल आहे, म्हणून त्यांतील हवा उष्ण आहे; तथापि ती गुजराथच्या हवेपेक्षां कमी उष्ण आहे.

सिंध हा प्रदेश सखल आहे. या कारणानें सिंधची हवा उष्ण आहे.

वाळू लवकर तापते व लवकर गार होते; यामुळें सिंधमध्यें उन्हाळ्यांत उष्णता व हिंवाळ्यांत थंडी फार असते.

**पाऊस**—एप्रिल ते सप्टेंबरपावेतों हिंदीमहासागरावरून हिंदुस्तानांत ईशान्येकडे मान्सून नांवाचे वारे वाहात असतात. हे वारे समुद्रावरून वाहात येतात, यामुळें त्यांचेबरोबर पाण्याची वाफ ढगांच्या रूपानें येते. म्हणून हे वारे वाहावयास लागले म्हणजे पाऊस पडण्यास आरंभ होतो. हे वारे प्रथम किनाऱ्याजवळच्या प्रदेशांतून जातात, म्हणून किनाऱ्याजवळच्या प्रदेशांत पाऊस जास्त पडतो, व किनाऱ्यापासून दूर असलेल्या प्रदेशांत पाऊस कमी पडतो. ह्या वाऱ्यांच्या वाटेंत डोंगर अथवा उंचवटा असल्यास तो ढगांना आडवून धरतो. यामुळें अशा ठिकाणीं पाऊस अधिक पडतो.

वरील कारणामुळें मुंबई इलाख्याच्या पश्चिम भागांत व सह्याद्रीवर पाऊस जास्त पडतो, व सह्याद्रीचे पूर्वेस जों जों दूर जावें तों तों कमी होतो.

†खालीं दिलेल्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं **उत्तरेकडून दक्षिणेकडे** जों जों जावें तों तों **पावसाचें मान थोडें थोडें वाढत जातें**. तसेंच सह्याद्रीपासून जों जों **पूर्वेकडे** जावें तों तों **पावसाचें मान कमी होत जातें**. कोंकणांत किनाऱ्याकडून सह्याद्रीकडे जों जों जावें तों तों पावसाचें मान वाढत जातें.

नैर्ऋत्येकडून येणाऱ्या मान्सून वाऱ्याबरोबर येणारे ढग आड-विण्यास गुजराथेंत सह्याद्रीसारखी डोंगरांची दक्षिणोत्तर ओळ नाहीं; यामुळें तेथें कोंकणापेक्षां पाऊस कमी पडतो.

नैर्ऋत्येकडून येणारा पाऊस या इलाख्याच्या पूर्वभागाकडे जसा कमी होत जातो, तसा ईशान्येकडून येणारा पाऊस या इलाख्याच्या पश्चिमभागाकडे कमी होत जातो.*

---

† **भिन्न भागांतील पावसाचें प्रमाण**–सिंधमध्यें १० इंचांहून कमी, कच्छमध्यें १०–१५ इंच, काठेवाडांत १६–३० इंच, गुजराथेंत ३०-४५ इंच, तापीचे कांठच्या प्रदेशांत २५-४५ इंच, कोंकणांत १००-१३० इंच, सह्याद्रीवर सुमारें २ शें इंच, देशावर सरासरी ३० इंच, (सह्याद्रीजवळील प्रदेशांत ४० व अगदीं पूर्वेकडील भागांत २० इंच.)

**जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं आढळून येणारी पावसाची वर्षाची सरासरीः–गुजराथ**–अहमदाबाद ३१, खेडा ३३, पंच-महाल ३८, भडोच ४२, सुरत ४०. **मध्यभाग**–धुळें २२, जळगांव २९, नाशिक २९, नगर २२, पुणें २९, सोलापूर २६, सातारा ४१. **कोंकण**–ठाणें १००, कुलाबा ८९, रत्नागिरी ९७, कारवार ११८. **दक्षिणभाग**–विजापूर २४, धारवाड ३४, बेळगांव ५२.

*या इलाख्याच्या पूर्वभागांतील मुख्य पिकें ईशान्येकडून येणाऱ्या पावसावरच होतात. या पिकांस **रब्बीचीं पिकें** म्हणतात. या इला-ख्याच्या पश्चिमभागीं नैर्ऋत्येकडून येणारा पाऊस विशेष पडतो. म्हणून या भागांत मुख्य पिकें या पावसावरच होतात. या पिकांस **खरिपाचीं पिकें** म्हणतात.

सिंधमध्यें पाऊस फार थोडा पडतो. याचें एक कारण असें आहे कीं, पावसाळ्यांत सिंधमधील वालुकामय प्रदेश फार तापत असल्यामुळें वरची हवाही फार तापलेली असते; म्हणून त्या ठिकाणीं ढग आले तरी हवेच्या उष्णतेनें त्यांची पुनः वाफ होऊन जाते.

**सुपीकपणा**—सिंधमध्यें जमीन सखल व सपाट आहे, परंतु तिजमध्यें बारीक रेती मिसळलेली आहे, यामुळें ती फारशी सुपीक नाहीं. मात्र सिंधूचे कांठचे प्रदेशांत सिंधूचे पाण्याबरोबर येणारा गाळ सांचत असल्यामुळें तो प्रदेश सुपीक आहे. कच्छ व काठेवाड यांचा दक्षिणभाग सखल असल्यामुळें व त्यांतून नद्या वाहात गेल्या असल्यामुळें तो सुपीक आहे. गुजराथ सखल व सपाट आहे यामुळें फार सुपीक आहे. कोंकणांत जमीन उतरती असल्यामुळें सुपीक नाहीं. घाटावरील अथवा देशावरील जमीन साधारण सपाट असल्यामुळें सुपीक आहे. ह्या भागांत नद्यांच्या कांठचे प्रदेश बरेच सुपीक आहेत. देशावर पूर्वेकडे जमीन जास्त सखल व सपाट होत गेल्याकारणानें त्या बाजूस जास्त सुपीक झाली आहे. खानदेशांतून तापी जाते, यामुळें तो प्रांत सुपीक झाला आहे.

या इलाख्यामध्यें नद्यांच्या कांठचे सर्व प्रदेशांत नर्मदा व तापी या नद्यांच्या कांठचे प्रदेश फार सुपीक आहेत.

सुपीकपणाचे मानानें मुंबई इलाख्याच्या भिन्न भागांचे नंबर पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—**गुजराथ, खानदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, सिंध.**

**पिकें**—तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, कापूस, हरबरा, तूर व गळिताचीं धान्यें हीं या इलाख्यांतील मुख्य पिकें होत.

या इलाख्याच्या **पश्चिमभागांत** पाण्याचा पुरवठा भरपूर असल्यामुळें तेथें **तांदूळ** होतो. गव्हाला कडक हिंवाळा लागतो; यामुळें **गहूं** मुंबई इलाख्याचे **उत्तरार्धांत** विशेष होतो. कारण या भागांत हिंवाळ्यामध्यें कडक थंडी असते. नाशिक जिल्ह्यापासून उत्तरेस गव्हाचें पीक वाढत जातें असें म्हणतां येईल. **ज्वारी व बाजरी** या पिकांना कडक हिंवाळा सोसत नाहीं; म्हणून तीं या इलाख्याच्या **दक्षिणार्धांत** होतात. पैकीं **गोदावरीचे कांठचे प्रदेशांत बाजरी** व **कृष्णाकांठचे प्रदेशांत ज्वारी** विशेष होते. या प्रदेशांत गहूंही थोडासा पिकतो.

सुपीक काळी जमीन, बेताचा पाऊस, व उष्ण हवा या गोष्टी **गुजराथ, खानदेश व धारवाड जिल्हा या प्रदेशीं** अनुकूल असल्यामुळें तेथें **कापूस** पिकतो.

जेथें हवा थंड असून पाऊस थोडा पडतो, अशा ठिकाणीं तूर, हरबरा हीं धान्यें होतात. म्हणून तीं कोंकणांत पिकत नाहींत. तीं मुख्यतः देशावरच पिकतात.

**इतर पिकें–तंबाकू** खेडा व बेळगांव जिल्ह्यांत, **ताग** कोंकणांत व **अंबाडी देशांत** पिकते. **वेलदोडे** कोंकणचे दक्षिण भागीं **कारवार जिल्ह्यांत** होतात.

## झाडें—

**नारळ**—हीं झाडें समुद्राजवळच्या उष्ण हवेच्या प्रदेशांत वाढतात; म्हणून तीं **कोंकणांत** आढळतात. **सुपारी**–दमट व साधारण उष्ण हवा या झाडास मानवते. म्हणून सुपारीचें उत्पन्न **कोंकणांतच** होतें. **आंबे** बहुतेक सर्व भागांत होतात. ह्यांशिवाय केळीं, द्राक्षें, पेरू, डाळिंबें, लिंबें वगैरे ह्या इलाख्यांतील इतर फळें होत.

**सागवान**–या झाडास उष्ण हवा व पुष्कळ पाऊस हीं मानवतात; म्हणून त्याचें उत्पन्न **सह्याद्रीच्या पश्चिम भागांत**

विशेष आहे. **बाभूळ**–हा अतिशय उपयोगी वृक्ष कोरड्या व उष्ण हवेंत उगवतो, म्हणून तो **देशावर** आढळतो. **लिंब**–उष्ण व कोरड्या हवेच्या प्रदेशांत होतो, म्हणून तो **देशावर** आढळतो. **बांबू अथवा कळक**–हा उष्ण व दमट हवेंत उगवणारा वृक्ष आहे, म्हणून तो देशावर न होतां **कोंकणांतच** होतो. ह्यांशिवाय अंजन, खैर वगैरे उपयोगी वृक्ष या इलाख्यांत आहेत.

## प्राणी––

**वाघ**–सह्याद्रीचे आसपासचे जंगलांत वाघ आहेत. शिवाय लांडगा, तरस, कोल्हा, खोकड हे या इलाख्यांतील इतर हिंस्र प्राणी होत.

**घोडे**–**काठेवाडांतील घोडे** मोठे व मजबूत म्हणून प्रसिद्ध आहेत. गोदावरी व भीमा या नद्यांच्या कांठच्या प्रदेशांतील तट्टे कंटकपणाविषयीं प्रसिद्ध आहेत. **उंट**–**सिंध**मध्यें आढळतात. **रानगाढवें**–**कच्छचे रणांत** आढळतात. **बैल**–**गुजराथेंतील बैल प्रसिद्ध** आहेत. **म्हशी**–**काठेवाडांतील**, विशेषतः जाफराबादजवळच्या प्रदेशांतील, **म्हशी नामांकित** आहेत.

## पक्षी––

चिमणी, राघू, कावळा, मोर, घार, बहिरीससाणा वगैरे अनेक पक्षी या इलाख्यांत आढळतात.

## खनिज संपत्ति––

या इलाख्याच्या निम्या भागांत पुष्कळ खोलपर्यंत काळा फत्तर आढळून येतो. बाकीचे निमे भागांतील जमीन नदींतील गाळ व वाळू यांनीं बनलेली आहे. यामुळें या इलाख्यांत **खनिज संपत्ति विशेष नाहीं**. **पंचमहाल व धारवाड जिल्हा** हे **खनिजसंपत्तीविषयीं प्रसिद्ध** आहेत.

सोनें **धारवाड जिल्ह्यांत** सांपडतें. **लोखंड सह्याद्रीचे कांहीं भागांत** ( विशेषतः धारवाड, कारवार व बेळगांव जिल्ह्यांत ) आणि **पंचमहाल जिल्ह्यांत** सांपडतें.

मँगॅनीज नांवाच्या धातूचे दगड **पंचमहाल, बेळगांव** व **धारवाड जिल्ह्यांत** सांपडतात. लोखंडापासून पोलाद करण्याचे कामांत त्यांचा उपयोग होतो. हे दगड परदेशीं जातात.

**पोरबंदर** एथें एक प्रकारच्या **चुनखडीच्या दगडाच्या मोठ्या खाणी** आहेत. हा दगड मऊ असल्याकारणानें, जेथें इमारतीस दगडी नक्षी काम करावयाचें असतें तेथें त्याचा उपयोग करितात.

## आगगाडीचे रस्ते*—

मुंबई इलाख्याच्या सर्व भागांत आगगाड्यांचे रस्ते गेले आहेत. यांपैकीं ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे, मुंबई—बडोदा व सेंट्रल इंडिया रेल्वे, मद्रास व सदर्न मराठा रेल्वे, राजपुताना माळवा रेल्वे, सिंध व पंजाब ( अथवा नॉर्थ वेस्टर्न ) रेल्वे, भावनगर गोंडल जुनागड पोरबंदर रेल्वे व तापी व्हॅली रेल्वे हे मुख्य आहेत.

**ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे** मुंबईपासून निघून कल्याण, नाशिक, मनमाड व भुसावळ या शहरांवरून गेली आहे. तिचा एक फाटा कल्याणहून निघून पुणें, सोलापूर या शहरांवरून रायचूरपर्यंत गेला आहे. **दौंड मनमाड रेल्वे**—ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वेच्या दौंड स्टेशनापासून हा फाटा निघून त्या रेल्वेच्या उत्तरेकडे जाणाऱ्या फाट्यावरील मनमाड स्टेशनापर्यंत गेला आहे. **धुळें चाळिसगांव रेल्वे**—हा फाटा चाळिसगांवाहून निघून धुळ्यास गेला आहे. **जळगांव अंमळनेर रेल्वे**—हा फाटा जळगांवापासून अंमळनेरपर्यंत गेला आहे. **बार्शी लाईट रेल्वे**—ही पंढरपुरापासून बार्शीवरून निजामचे राज्यांत लातूरपर्यंत गेली आहे. **माथेरान रेल्वे**—नेरळ स्टेशनापासून माथेरानपर्यंत.

**मुंबई बडोदा व सेंट्रल इंडिया रेल्वे** मुंबईपासून निघून सुरत, भडोच, बडोदें, अहमदाबाद या शहरांवरून खाराघोड्यापर्यंत गेली आहे.

**सदर्न मराठा रेल्वे** पुण्यापासून निघून सातारा, सांगली, मिरज, बेळगांव या शहरांवरून गेली आहे. हिचा एक फाटा लोंढ्यापासून गोव्याकडे, दुसरा लोंढ्याहून धारवाड, हुबळी, गदग या शहरांवरून मद्रासेकडे, तिसरा हुबळीहून म्हैसूरकडे, व चौथा गदगहून विजापुराकडे गेला आहे. विजापुरावरून जाणारा फाटा पुढें ग्रे० इं० पे० रेल्वेच्या हुटगी स्टेशनापर्यंत गेला आहे. **कोल्हापूर**

**स्टेट रेल्वे**—हा फाटा (मद्रास आणि) सदर्न मराठा रेल्वेच्या मिरज स्टेशनापासून कोल्हापुरापर्यंत गेला आहे.

**राजपुताना माळवा रेल्वे** अहमदाबाद शहरापासून निघून राजपुतान्यांत व माळव्यांत गेली आहे. या रेल्वेच्या मारवाड जंक्शनपासून जोधपूर बिकानेर रेल्वेचा एक फाटा सिंधमधील हैदराबादपर्यंत गेला आहे.

**सिंध पंजाब अथवा नॉर्थ वेस्टर्न रेल्वे** कराचीपासून निघून हैदराबाद शहरावरून पंजाबांत गेली आहे. तिचा एक फाटा रुकपासून निघून केट्याकडे गेला आहे.

**भावनगर गोंडल जुनागड पोरबंदर रेल्वे** वढवाणपासून निघून काठेवाडांतील भावनगर, गोंडल, जुनागड व पोरबंदर या शहरांपर्यंत गेली आहे.

**तापी व्हॅली रेल्वे** अंमळनेरापासून सुरतेपर्यंत तापीचे कांठानें गेली आहे.

**गोदावरी व्हॅली रेल्वे** मनमाडपासून हैदराबादेकडे गोदावरीचे कांठानें गेली आहे.

## व्यापार——

**निर्यात माल**—ह्या इलाख्यांतील अतिशय महत्त्वाचें पीक कापूस होय. म्हणून ह्या इलाख्याच्या निर्यात मालांत **कापूस** हा महत्त्वाचा जिन्नस आहे. पंजाबांतील महत्त्वाचें पीक गहूं होय व माळव्यांतील महत्त्वाचें पीक अफू होय; पंजाबास कराची बंदर जवळ आहे व माळव्यास मुंबई बंदर सोईचें आहे; ह्मणून पंजाबांतील **गहूं** कराचीहून व माळव्यांतील **अफू** मुंबईहून परदेशीं जाते. यांशिवाय **कापड, सूत, गळिताचीं धान्यें** वगैरे जिन्नस परदेशीं जातात.

**कापूस** युरोपांत जातो. **कापड व सूत** आफ्रिका व चीन ह्या देशांत जातें. **अफू**—युरोपांत व चिनांत जाते.

गहूं, तांदूळ, गळिताचीं धान्यें, कातडीं, लोंकर वगैरे माल युरोपांत जातो.

**आयात माल**—परदेशांतून पुढील माल या इलाख्यांत येतोः—**सर्व प्रकारचें कापड, सूत, धातूंचें सामान, साखर, राकेल,** दारू, सोनें, रुपें, यंत्रें ...इ०.

किरकोळ जिन्नस—औषधें, दगडी कोळसे, काचेचें सामान, स्टेशनरी सामान वगैरे.

आयात व निर्यात माल मिळून १०० **कोटींच्यावर** मुंबई इलाख्याचा **व्यापार** आहे.

**मुंबई व कराची** हीं मुंबई इलाख्यांतील **मुख्य** बंदरें होत. पैकीं मुंबई बंदर फारच मोठें आहे. या इलाख्याच्या सर्व व्यापारापैकीं चारपंचमांश व्यापार मुंबई बंदरांतून होतो.

**लहान बंदरें**—कारवार, कुमठा, वेंगुर्लें, मांडवी.

**लोकसंख्या**—या इलाख्याची लोकसंख्या २ कोट ७० लक्ष आहे.

पैकीं हिंदू २ कोट, मुसलमान ५० लक्ष, जैन ५ लक्ष, ख्रिस्ती २॥ लक्ष व पार्शी ८३ हजार आहेत. यहुदी १६ हजार, शीख १॥ हजार व बौद्धधर्मी ७ शें आहेत.

पार्शी लोकांची वस्ती मुख्यतः मुंबई शहर व गुजराथ या भागांत आहे. पैकीं खुद्द मुंबईत सुमारें ५० हजार पार्शी आहेत. जैन लोक विशेषतः गुजराथेंत आहेत. मुसलमान लोक सिंधमध्यें फार व कोंकणांत अतिशय कमी आहेत. ख्रिस्ती लोकांची वस्ती ठाणें, खेडा अहमदनगर व कारवार या जिल्ह्यांत विशेष आहे.

**भाषा**—सिंधमध्यें **सिंधी**; कच्छमध्यें **कच्छी** ( ही भाषा कांहीं अंशीं गुजराथी भाषेसारखींच आहे ); काठेवाडांत व गुजराथेंत **गुजराथी**; बेळगांव, धारवाड, कारवार व विजापूर या जिल्ह्यांत **कानडी**; व हे जिल्हे आणि गुजराथ यांमधील प्रदेशांत मराठी.

मुसलमान लोक उर्दू भाषा बोलतात. पार्शी गुजराथी भाषा व यहुदी लोक मराठी भाषा बोलतात. दक्षिण कोंकणांतील मराठी भाषा देशावरील मराठी भाषेपेक्षां थोडी भिन्न आहे.

**विभाग**---*राज्यव्यवस्थेकरितां या इलाख्याचे पुढील-प्रमाणें विभाग‡ केले आहेत. ( १ ) सिंध, ( २ ) उत्तर-भाग, ( ३ ) मध्यभाग, ( ४ ) दक्षिणभाग, ( ५ ) मुंबई बेट.

( २ ) **उत्तरभागांत** अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत [ हे पांच जिल्हे म्हणजे काठेवाड व बडोदें संस्थान शिवाय-करून गुजराथचा सर्व प्रदेश ] व ठाणें हे जिल्हे येतात.

( ३ ) **मध्यभागांत** पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, नाशिक, पुणें, अहमदनगर, सातारा, व सोलापूर हे जिल्हे येतात.

( ४ ) **दक्षिणभागांत** बेळगांव, धारवाड, कारवार, विजापूर, कुलाबा, व रत्नागिरी हे जिल्हे येतात.

**मुंबई बेट** विशेष महत्त्वाचें असल्यामुळें त्याचा स्वतंत्र विभाग केला आहे.

**संस्थानें**--*या इलाख्यांत एकंदर ३६३ *संस्थानें आहेत. म्हणजे रोज एक संस्थान पाहावयाचें मनांत आणलें, तर इंग्रजी

---

‡ सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र व कोंकण हे या इलाख्याचे स्वाभाविक विभाग होत. ( उंची, हवामान, जमिनीचें स्वरूप, पिकें, लोकांची जात व भाषा यांपैकीं एक अथवा अनेक गोष्टींचे अनुरोधानें केलेल्या विभागांस स्वाभाविक विभाग म्हणतात.) काठेवाड गुजराथेंतच येतें. नर्मदा नदीपासून दक्षिणेकडे बेळगांव जिल्ह्यापर्यंतच्या देशाचे भागास महाराष्ट्र म्हणतात. बेळगांवच्या दक्षिणेकडे जो भाग आहे त्यास दक्षिणमहाराष्ट्र अथवा कर्नाटक म्हणतात. कर्नाटक व महाराष्ट्र यांमधील सीमा सामान्यतः कृष्णा नदी होय.

† कच्छ, काठेवाड व गुजराथ या देशांत मिळून ३ शेंवर संस्थानें आहेत. पैकीं पुष्कळ संस्थानें फार लहान आहेत.

वर्षाच्या ३६५ दिवसांपैकीं दोन दिवस शिल्लक राहातील. सर्व संस्थानांमध्यें बडोद्याचें संस्थान फार मोठें आहे. त्याचा वसूल सुमारें १॥ कोट आहे. हें संस्थान मुंबईसरकारचे ताब्यांत नसून हिंदुस्तानसरकारचे ताब्यांत आहे. इतर संस्थानांत **पालनपूर, कच्छ, कोल्हापूर, जुनागड, भावनगर** व **नवानगर** हीं मोठीं होत.

मुंबई इलाख्यांतील संस्थानांचे ( १ ) कच्छ, ( २ ) काठेवाड, ( ३ ) महाराष्ट्रांतील जहागिरी, व ( ४ ) दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी, असे मुख्य विभाग आहेत.

( ३ ) गोदावरी व कृष्णा यांच्या दरम्यानचे प्रदेशांत जीं संस्थानें आहेत त्यांचा **महाराष्ट्रांतील जहागिरी** या नांवाचा विभाग केला आहे.

( ४ ) कोल्हापूरचे पूर्वेस ८ संस्थानांचा समूह आहे. या सर्व संस्थानांस **कोल्हापूर संस्थान** व **दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी** असें नांव दिलें आहे.

उत्तरेकडील बहुतेक संस्थानांचे राजे रजपूत आहेत. दक्षिणेकडील बहुतेक संस्थानांचे राजे मराठे व ब्राह्मण आहेत.

**परकीय लोकांच्या ताब्यांतील प्रदेश**–*दीव, [ काठेवाडचे दक्षिणेकडील बेट ] दमण व गोवें हीं पोर्तुगीजांचे‡ ताब्यांत आहेत.

या तीन ठिकाणचा मुलूख मिळून २॥ हजार चौरस मैल आहे. लोकसंख्या ६ लाख आहे.

**राज्यव्यवस्था**—राज्यव्यवस्थेकरितां मुंबई इलाख्याचे कमिशनरी भाग, जिल्हे व तालुके असे विभाग केले आहेत.

कांहीं [ शें दोनशें ] गांव मिळून तालुका होतो; कांहीं [ १०–१२ ] तालुके मिळून जिल्हा होतो; व कांहीं [ ५–६ ] जिल्हे मिळून कमिशनरी भाग होतो.

---

‡ युरोपखंडांत पोर्तुगाल म्हणून देश आहे त्यांतील लोकांस पोर्तुगीज म्हणतात.

इलाख्यांतील सर्व अधिकाऱ्यांवरील अधिकारी **गव्हर्नर** होय. त्याचे मदतीस दोन कौन्सिलें असतात. पैकीं एका कौन्सिलाचें काम अमलबजावणीचें आहे व दुसऱ्या कौन्सिलाचें काम कायदे करण्याचें आहे.

संस्थानांवर देखरेख ठेवण्याकरितां **पोलिटिकल एजंट** नांवाचे अधिकारी नेमलेले असतात. संस्थान लहान असेल तर तें ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्याचा कलेक्टर तेथील पोलिटिकल एजंटचें काम करितो. अनेक संस्थानें शेजारीं असतील तर त्या सर्वांकरितां मिळून एक निराळा पोलिटिकल एजंट नेमतात. पोलिटिकल एजंट गव्हर्नरचे ताब्यांत असतात.

**मुंबई इलाख्याचा इतिहास**—या इलाख्याचा बहुतेक भाग इंग्लिशांनीं पेशव्यांपासून १८१८ सालीं जिंकून घेतला. सिंध प्रांत सिंधचे अमिरांपासून १८४३ सालीं घेतला.

**राजधानी**—**मुंबई हें शहर मुंबई इलाख्याची राजधानी आहे. याची वस्ती सुमारें १॥ लाख असून हें मोठें बंदर असल्यामुळें जगांतील महत्त्वाच्या शहरांपैकीं एक आहे.** एथें मोठमोठ्या व्यापाऱ्यांची व कारखानदारांची वस्ती असून **लोक फार संपन्न** आहेत. एथील भव्य इमारती, माणसांनीं व गाड्यांनीं गजबजलेले मोठे रस्ते, एथें नेहमीं चालत असलेला उद्योग, लोकांची संपन्नता व कारखान्यांची आणि गिरण्यांची संख्या हीं पाहून नवीन मनुष्य थक्क होऊन जातो. या शहराचा विस्तार २२ चौरस मैल असून त्यांत लोकांना इकडून तिकडे नेण्यास आगगाड्या व विजेच्या ट्रॅमच्या गाड्या सारख्या धावत असतात. **मुंबई बंदर जगांतील अत्यंत प्रशस्त व सुरक्षित बंदरांपैकीं एक आहे.** तें सर्व प्रकारच्या गलबतांनीं व सर्व देशांहून आलेल्या आगबोटींनीं नेहमीं गजबजलेलें असतें.

फक्त शंभर वर्षांमध्यें मुंबई शहराची एवढी वाढ झाली आहे. यापूर्वी तें अगदीं खेडेगांव असून तेथें फक्त कांहीं कोळ्यांची वस्ती होती. उत्कृष्ट बंदर, या बंदराचा युरोपखंडास नजीकपणा, व हिंदुस्तानच्या पश्चिमार्धांतील सर्व प्रदेशांतून आगगाडीनें माल आणण्याची विशेष सोय, या कारणांनीं या शहराची वाढ एवढ्या झपाट्यानें झाली आहे.

हें शहर एका बेटावर वसलें असून तें बेट, भराव घालून उंच केलेल्या रस्त्यानें, साष्टी बेटास जोडलें आहे. या बेटाचा कोट* म्हणून जो भाग आहे त्यांत मोठमोठे व्यापारी व हुंडीवाले यांचीं ऑफिसें व हायकोर्ट, सेक्रेटरीएट‡, पोस्ट ऑफिस वगैरे सरकारी कचेऱ्या आहेत.

मलबार टेकडी म्हणून मुंबईचा जो भाग आहे, त्यावर गव्हर्नरसाहेबांचा सरकारी बंगला व इतर श्रीमंत लोकांचे सुंदर व भव्य बंगले आहेत.

या शहरांत जगांतील बहुतेक सर्व देशांतील लोक कमीजास्त प्रमाणानें आढळतात.

मुंबईस सर्व प्रकारच्या मिळून सुमारें २ शें लहान मोठ्या गिरण्या आहेत. मोठ्या गिरण्यांमध्यें कापसाच्या कापडाच्या ८१, कापसाची सरकी काढून गठ्ठे बांधण्याच्या ११, रेशमाच्या २, लोकरीचें कापड विणण्याच्या २ व कागदाची १ अशा आहेत.

## सिंध.

सिंधुनद ह्या देशांतून वाहातो, म्हणून ह्यास सिंध हें नांव पडलें असावें.

क्षेत्रफळ ५३,००० चौ० मैल. लोकसंख्या ३५ लक्ष.

भाषा, पोशाक, चालरीत, हवा वगैरे बाबतींत सिंध देश मुंबई इलाख्याच्या इतर भागांहून फार भिन्न आहे. वाळूचें मैदान व समुद्र यांनीं अनुक्रमें सिंधचा पूर्वभाग व दक्षिणभाग मुंबई इलाख्यापासून तोडून टाकल्यामुळें, ह्या देशाचें मुंबई इलाख्याच्या इतर भागांशीं मुळींच साम्य नाहीं.

---

*कोट–एथें पूर्वीं भुइकोट किल्ला होता. त्याचे तटाचा आतां मागमूसही राहिला नाहीं; तरी ही तो ज्या भागीं होता त्यास हल्लीं कोट म्हणतात.

‡ सेक्रेटरीएट–गव्हर्नरसाहेबांच्या सरकारी सेक्रेटरींचे ऑफिस.

**उंचसखलपणा, सुपीकपणा वगैरे**—या देशाच्या पश्चिमभागीं डोंगर आहेत, परंतु बाकीचा सर्व प्रदेश सपाट व सखल आहे. ह्या देशाचा पूर्वभाग म्हणजे बहुतेक वाळूचें मैदानच आहे. सिंध देशांत पाऊस फार थोडा पडतो. ह्या देशांत सिंधूशिवाय दुसरी महत्त्वाची नदी नाहीं. सिंधूला पूर येतो तेव्हां तिचें पाणी दोन्ही तीरांवर फार लांबपर्यंत पसरतें, व त्या पाण्यानें पिकें येतात. मार्चमध्यें हिमालयावरील बर्फ वितळावयास लागलें म्हणजे पुरांना आरंभ होतो. हे पूर पावसाळा संपेपर्यंत म्हणजे ऑगस्ट महिन्यापर्यंत चालू असतात. सिंधूचे कालवे सिंधच्या बहुतेक भागांत नेले आहेत. त्यांच्या पाण्यावर ह्या भागांतील पिकें होतात.

सिंधूच्या कांठच्या प्रदेशांत पुरांबरोबर येणारा गाळ सांचत असल्यामुळें व त्या भागांत पाण्याचा पुरवठा भरपूर होत असल्यामुळें तो सुपीक आहे. बाकीच्या प्रदेशांपैकीं ज्या प्रदेशांतून कालवे गेले आहेत ते मध्यम सुपीक आहेत. इतर प्रदेश नापीक आहेत.

**महत्त्वाचें पीक**—या प्रांतांत इजिप्त देशांतील कापसाची लागवड करण्याचा प्रयत्न चालू असून तो बहुतेक सिद्धीस गेल्यासारखा आहे. ह्या कापसापासून फार बारीक सूत काढतां येतें.

**लोक**—लोकसंख्येपैकीं $\frac{3}{4}$ लोक मुसलमान आहेत.

**भाषा**—ह्या देशांतील मुख्य भाषा **सिंधी** व **बलुची** होत.

**विभाग**—राज्यव्यवस्थेकरितां ह्या प्रांताचे सहा जिल्हे केले आहेत. त्यांचीं नांवें:—१ कराची, २ हैदराबाद, ३ शिकारपूर, ४ लारखाना, ५ थर आणि पारकर, ६ अप्पर सिंध फ्रॉंटियर.

**शहरें**—

**कराची**—( १५१ ) हें सिंधमधील मुख्य शहर आहे. हें मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या नंबरचें व हिंदुस्तानांतील तिसऱ्या नंबरचें बंदर आहे. या बंदराचा व्यापार ३० कोटींचा आहे.

**हैदराबाद**-(७६) सिंधूच्या पूर्वतीरावर हें शहर आहे. तें पूर्वी सिंधमधील मुख्य अमिराची राजधानी होतें. हें आगगाडीचें जंक्शन असून **व्यापाराविषयीं प्रसिद्ध** आहे. **गालिचांसंबंधीं** ह्या शहराची **प्रसिद्धि** आहे. हैदराबादच्या उत्तरेस थोड्या अंतरावर **मियोणी** हें गांव आहे, तेथें 'सर चार्लस नेपियर' यानें अमिरांचा पराभव केला.

हैदराबादच्या पूर्वेस वाळवंटाच्या प्रदेशांत **अमरकोट** शहर आहे. तेथें **अकबराचा जन्म** झाला.

**सक्कर**—( ३५ ) हें शहर सिंधूच्या पूर्वतीरावर आहे. बोलन घाटांतून येणाऱ्या रस्त्यावर हें शहर असल्यामुळें एथें **बराच व्यापार** चालतो.

**जाकोबाबाद**—( ११ ) हें अप्पर सिंध फ्रॉंटियर जिल्ह्यांत आहे. एथें **फौजेची छावणी** आहे. एथें उन्हाळा फारच कडक असतो. उष्णतामान कधीं कधीं १२० अंशापर्यंत जातें.

**खैरपूर संस्थान**-हें संस्थान सिंधच्या ईशान्यभागीं आहे. तें एका मुसलमान राजाच्या ताब्यांत आहे, त्यास नबाब म्हणतात. उत्पन्न सुमारें १३ लाख. **राजधानी—खैरपूर** शहर.

---

## कच्छ.

कच्छचा आकार कांहींसा चंद्रकोरीप्रमाणें आहे. पावसाळ्यांत रणामध्यें समुद्राचें पाणी येतें तेव्हां कच्छ हें एक बेटच बनून जातें.

लांबी पूर्वपश्चिम १७५ मैल व दक्षिणोत्तर ७५ मैल. क्षेत्रफळ ७६०० चौरसमैल. लोकसंख्या पांच लाख. उत्पन्न १८ लाख.

**जनावरें**-एथील **घोडे** व **उंट** चांगल्या प्रतीचे असतात अशी प्रसिद्धि आहे. कच्छचे रणांत रानटी गाढवांचे कळप आहेत.

**कलाकौशल्य—रुप्यावरील नकशीचें काम** व **जरीचें काम** ह्यांविषयीं ह्या संस्थानाची ख्याति आहे. कच्छी लोक उत्तम खलाशी व व्यापारी असतात असा त्यांचा लौकिक आहे.

शहरें.—*

ह्या संस्थानची **राजधानी भूज** [२१] शहर होय. १८१९ सालीं धरणीकपानें ह्या शहराचा फार नाश झाला. इंग्रज सरकारचा पोलिटिकल एजंट ऐथें राहातो.

**मांडवी**--( २४ ) हें ह्या संस्थानचें मुख्य बंदर होय. एथें एक दीपगृह आहे.

## काठेवाड.

क्षेत्रफळ २०,००० चौ० मैल. लोकसंख्या २५ लाख.

या द्वीपकल्पाचे उत्तरेकडील जमीन जवळजवळ समुद्रसपाटीइतकी सखल आहे. पूर्वी कच्छचें रण व खंबायतचें आखात यांच्यांतील पाणी पावसाळ्यामध्यें ह्या सखल प्रदेशांत पसरून काठेवाड हें बेट बनत असे. परंतु अलीकडे माती सांचून ह्या प्रदेशाची उंची जरा वाढली आहे. तरीदेखील पावसाळ्यांत कच्छचें रण व खंबायतचें आखात यांतील पाणी बरेंच लांबपर्यंत आंत येतें.

काठेवाडच्या मध्यभागची जमीन उंचवट्याची असून तींत एक टेकड्यांचा पुंजका आहे; ह्यांपैकीं **गिरनार पर्वत** ३५०० फूट उंच असून त्यावर जैनांनीं बांधिलेलीं **सुंदर देवालयें** आहेत.

**जनावरें**—गिरनार व इतर टेकड्या यांच्या आसपास गवताचीं रानें बरींच असल्यामुळें तेथें **गाई व म्हशी,** यांची उत्पत्ति फार होते. गिरनारच्या जंगलांत **सिंह** आहेत. काठेवाडी **घोडे** फार प्रसिद्ध आहेत.

ह्या प्रदेशाच्या वायव्य किनाऱ्यावर मीठ तयार होतें. '**खाराघोडा**' ऐथील **मीठ** प्रसिद्ध आहे.

ह्या द्वीपकल्पाच्या आसपासच्या समुद्रांत—विशेषतः वायव्यभागीं कच्छचे आखातांत—**मोतीं** सांपडतात.

**विभाग**--काठेवाडांत सुमारें पावणेदोनशें [ १८८ ] संस्थानें आहेत. त्या सर्वांचे चार विभाग करून त्यांपैकीं प्रत्येकावर एक

असिस्टंट [ दुय्यम, मंदतगार ] पोलिटिकल एजंट नेमिला आहे. या सर्व असि० पोलिटिकल एजंटांवर एक **मुख्य पोलिटिकल एजंट** नेमिला आहे. तो **राजकोट** एथें राहातो.

मोठीं संस्थानें काठेवाडांत १४ आहेत. त्यांपैकीं **जुनागड, भावनगर, गोंडल, मोरवी, ध्रांगध्रा** हीं मुख्य होत.

काठेवाडांतील १३ संस्थानें खंडणी न देणारीं आहेत; बाकीच्यांपैकीं, कांहीं इंग्रज सरकारास, कांहीं जुनागडच्या नवाबास, व कांहीं बडोद्याच्या गायकवाडांस खंडणी देतात.

## शहरें*—

**राजकोट**--( २६ ) हें शहर काठेवाडच्या मध्यभागीं असून थोडें उंचावर असल्यामुळें एथील हवा कमी उष्ण आहे. राजपुत्रांच्या शिक्षणाकरितां एथें ' **राजकुमार कॉलेज** ' स्थापन केलें आहे.

**जुनागड**--( ३५ ) गिरनार पर्वताजवळ असून तें जुनागड **संस्थानची राजधानी** आहे. एथें एक इंग्रजी कॉलेज आहे.

**भावनगर**--( ६० ) हें शहर **भावनगर संस्थानची राजधानी** आहे. एथून बराच **कापूस** रवाना होतो.

**द्वारका**--किनाऱ्यावर पश्चिम टोंकाजवळ **द्वारका** हें **हिंदूंचें पवित्र क्षेत्र** आहे. हें शहर कृष्णाची राजधानी असून त्याचे रक्षणार्थ सुदर्शन नांवाचें चक्र त्याच्याभोंवतीं नेहमीं फिरत होतें असें हिंदूंच्या पुराणांत सांगितलें आहे. किनाऱ्यावर द्वारकेच्या दक्षिणेस **पोरबंदर** ( २५ ) हें बंदर आहे.

**सोमनाथ**--काठेवाडच्या किनाऱ्यावर वेरावळ बंदराजवळ सोमनाथ आहे. एथील शिवाचें देवालय प्राचीन काळीं फार प्रसिद्ध होतें. तें गिझनीच्या महमुदानें इ० स० १०२४ मध्यें लुटिलें व उध्वस्त केलें.

# उत्तरभाग.

## ( गुजराथ. )

ठाणें जिल्ह्याचे उत्तरेस कच्छचे रणापर्यंत मुंबई इलाख्याचा जो भाग आहे तो सर्व गुजराथ होय. अर्थात् काठेवाड हें द्वीपकल्पही

गुजराथेंत येतें; तथापि त्या द्वीपकल्पास निराळें नांव असल्या-मुळें पुढील वर्णनांत गुजराथ हें नांव वर सांगितलेल्या प्रदेशापैकीं काठेवाड शिवायकरून इतर प्रदेशास दिलें आहे.

क्षेत्रफळ ३०,०००. लोकसंख्या ५० लाख.

गुजराथच्या उत्तरेस, ईशान्येस व पूर्वभागीं डोंगर आहेत. बाकीचा प्रदेश समुद्रास लागून असून त्यांत डोंगर फारकरून नाहींत; यावरून तो सखल व सपाट आहे असें दिसून येतें.

**डोंगर**-[ मुंबई इलाख्याखालीं पाहा ].

**नद्या***--**साबरमती, मही, नर्मदा व तापी ह्या मुख्य** नद्या आहेत.

**सुपीकपणा**-ह्या देशाचा **मध्यभाग** सखल व सपाट असून नद्यांचे मुखांजवळ असल्यामुळें **फार सुपीक** आहे. तथापि नद्यांचे पुरांमुळें ह्या भागांत कधीं कधीं फार नुकसान होतें. पश्चिमभागांत माती इतकी आहे कीं, तेथें दगड फार दुर्भिळ आहेत.

गुजराथेंत पांच जिल्हे आहेत. ते येणेंप्रमाणें—१ अहमदाबाद, २ खेडा, ३ पंचमहाल, ४ भडोच आणि ५ सुरत.

**शहरें***—

( १ )**अहमदाबाद**-[२१६] साबरमती नदीचे कांठीं—हें **उत्तर-भागांतील मुख्य शहर** होय. गुजराथचा राजा अहमद यानें हें वसविलें, म्हणून यास अहमदाबाद असें नांव पडलें. [ त्या वेळीं हें गुजराथची राजधानी होतें. ] लोकसंख्येच्या मानानें हें **मुंबई इला-ख्यांतील दुसरें शहर होय.** एथें कापसाच्या **५३ गिरण्या** असून एथील **रेशमी**, सुती **व किनखापाचें कापड** फार प्रसिद्ध आहे. एथें एक आगपेट्यांचाही कारखाना आहे. एथील **जुन्या इमारती व देवालयें पाहाण्यासारखीं** आहेत. ह्या शहरांत जैन लोकांची मोठी वस्ती आहे.

( ४ ) **भडोच**--[ ४३ ] हें नर्मदेच्या मुखाशीं आहे. प्राचीन काळीं हें शहर प्रसिद्ध बंदर होतें, परंतु नर्मदेच्या मुखांत गाळ सांचून

तें उथळ झाल्यामुळें आतां त्यांत जहाजें येऊं शकत नाहींत. एथून **पुष्कळ कापूस रवाना** होतो.

(५) **सुरत**–[ ११५ ] हें पूर्वीं प्रसिद्ध बंदर होतें. परंतु तापीचे मुखांत गाळ सांचून तें उथळ झाल्यामुळें आतां त्यांत जहाजें येऊं शकत नाहींत. **इंग्लिशांनीं आपली वखार एथेंच १६१२ सालीं स्थापन** केली. हल्लींही हें व्यापाराचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. एथें **जरीचे व किनखापाचे कारखाने** आहेत.

सुरत जिल्ह्यांतील संस्थानें मिळून **सुरत एजन्सी** हा भाग झालेला आहे. त्यांत **वांसदा, धरमपूर व सचीन** हीं संस्थानें येतात. **खंबायत** संस्थान खेडा जिल्ह्यांत आहे.

## गुजराथेंतील लहान संस्थानें.

गुजराथेंतील लहान संस्थानांचे तीन समूह करून, त्यांस **पालनपूर एजन्सी, महीकांठा एजन्सी** आणि **रेवाकांठा एजन्सी** अशीं नांवें दिलीं आहेत.

**पालनपूर एजन्सी**–यांत ११ संस्थानें येतात. त्यांपैकीं पालनपूर व राधनपूर हीं मुख्य आहेत. **डीसा**—या शहरीं इंग्रज सरकारच्या फौजेची छावणी आहे.

**महीकांठा एजन्सी**—५९ संस्थानें मिळून ही एजन्सी झाली आहे. यांतील संस्थानांपैकीं ईदरचें संस्थान सर्वांत मोठें आहे. या एजन्सींतील **दांटा शहरीं संगमरवरी दगडाच्या खाणी** आहेत.

**रेवाकांठा एजन्सी**—या एजन्सींत लहानमोठीं मिळून ६१ संस्थानें आहेत. या संस्थानांपैकीं **राजपिंपळा संस्थानांत मूल्यवान् दगडांच्या खाणी** आहेत.

## वडोदें संस्थान.

हें संस्थान गायकवाडांचे ताब्यांत आहे. त्यांना महाराज असा किताब आहे. ह्या संस्थानाचा मुलूख गुजराथेंत आहे, तथापि हें मुंबई सरकारचे देखरेखीखालीं नसून हिंदुस्तान सरकारचे देखरेखीखालीं आहे.

क्षेत्रफळ ८ हजार चौरस मैल. लोकसंख्या २० लाख. उत्पन्न १॥ कोट.

**बडोदें** ( १०३ )—हें शहर या संस्थानची राजधानी होय. एथील **राजवाडे, बाग, पशुसंग्रहालय** व **अजबखाना** ( म्युझीयम् ) हीं पाहाण्यासारखीं आहेत.

या संस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत देण्याची सोय केली आहे.

---

# मराठी जिल्हे.

ज्या जिल्ह्यांतील लोक मराठी भाषा बोलतात, त्यांस **मराठी जिल्हे** असें नांव दिलें आहे मध्यभागांतील सर्व जिल्हे, उत्तरभागापैकीं ठाणें जिल्हा, व दक्षिणभागापैकीं कुलाबा व रत्नागिरी हे जिल्हे मिळून १० जिल्हे मराठी आहेत. पैकीं मध्यभागांतील सर्व जिल्हे देशावरील प्रदेशांत व बाकीचे तीन जिल्हे कोंकणांत येतात.

## देशावरील मराठी जिल्हे.

### ( सामान्य वर्णन. )

**सीमा**—*उत्तरेस सातपुडा पर्वत व दक्षिणेस कृष्णा नदी ह्या, देशावरील मराठी जिल्ह्यांच्या प्रदेशाच्या स्थूल सीमा होत.

**पर्वत***—सह्याद्रि व त्याचे पूर्वेकडे जाणारे फाटे.

**नद्या**—*उत्तरप्रदेशांत **तापी**, मध्य प्रदेशांत **गोदावरी**, व दक्षिणेकडील प्रदेशांत **कृष्णा** या मुख्य नद्या होत.

**स्वाभाविक विभाग व त्यांचें स्वरूप**—

ह्या प्रदेशाचे स्वाभाविक विभाग पुढीलप्रमाणें आहेत—

**पश्चिम पट्टी**—सह्याद्रीस अगदीं लागून असलेला ( सह्याद्रीचे पूर्वेकडील सुमारें १० मैल रुंदीचा ) प्रदेश.

**मध्य पट्टी**—पश्चिम पट्टीचे पूर्वेकडे सुमारें १५ मैल-पर्यंतचा प्रदेश.

**पूर्व पट्टी**—मध्य पट्टीचे पूर्वेकडील सपाट प्रदेश.

**स्वरूप**—पश्चिम पट्टींतील प्रदेश अगदीं डोंगराळ आहे. मध्य पट्टीच्या प्रदेशांत डोंगर थोडे आहेत; तथापि या प्रदेशांत उंचसखलपणा बराच आहे. पूर्व पट्टींतील प्रदेशांत डोंगर किंवा टेकड्या फार थोड्या आहेत व तो बहुतेक सपाट आहे.

**उतार**—*खानदेश खेरीजकरून बाकीच्या सर्व जिल्ह्यांत उतार पूर्वेकडे—कांहींसा आग्नेयीकडे—आहे.


**पाऊस**—पश्चिम पट्टींत पुष्कळ ( ४० इंचांवर ) पडतो. मध्य पट्टीच्या प्रदेशांत पाऊस साधारण (३० इंच) पडतो. पूर्व पट्टीच्या प्रदेशांत पाऊस थोडा ( २० इंच ) पडतो.


**हवा**—पश्चिम पट्टींत हवा थंड परंतु उन्हाळा खेरीज-करून इतर ऋतूंत रोगट असते. मध्य पट्टीच्या पदेशांत हवा मध्यम उष्ण आहे. पूर्व पट्टींत हवा उष्ण पण निरोगी आहे.

खानदेशांत अगदीं उत्तरेकडला व अगदीं पश्चिमेकडला प्रदेश खेरीजकरून बाकीच्या सर्व प्रदेशांत हवा उन्हाळ्यांत फार उष्ण असते.

मराठी जिल्ह्यांत दक्षिणेकडून उत्तरेकडे जों जों जावें तों तों थंडीच्या दिवसांत थंडी व उन्हाळ्यांत उन्हाळा जास्त असतो.

पुणे मराठी ग्रंथालय





मराठी जिल्हे
(सीमा, पर्वत व नद्या)
स्केल.
० २५ ५० १००
मुंबई
नाशिक
अहमदनगर
सोलापूर
सातारा
सांगली
सावंतवाडी
रत्नागिरी

**सुपीकपणा**--पूर्वेकडे जमिनीचा कसदारपणा वाढत जातो.

**मुख्य पिकें**—पश्चिम पट्टींत **तांदूळ** पिकतो. मध्य पट्टींत **गहूं, बाजरी** आणि थोडी **ज्वारी** हीं पिकतात. पूर्व पट्टींत मुख्यतः **ज्वारी** व थोडी **बाजरी** हीं पिकतात. शिवाय **कापूस** व थोडा **गहूं**ही पिकतो.

दक्षिणेकडून जों जों उत्तरेकडे जावें तों तों गव्हाचें पीक वाढत जातें. उत्तरेकडून दक्षिणेकडे जों जों जावें तों तों ज्वारीचें पीक वाढत जातें. गहूं व ज्वारी यांच्या प्रदेशांच्या दरम्यान बाजरीचा प्रदेश आहे.

पूर्वभागांत जों जों उत्तरेकडे जावें, तों तों कापसाचें पीक वाढत जातें.

**व्यापाराच्या पेठा**—जिल्ह्यांचीं ठाणीं खेरीजकरून व्यापाराच्या इतर पेठा बहुतेक पूर्वभागांत आहेत. जिल्ह्यांचीं बहुतेक ठाणीं मधल्या पट्टींत आहेत.

**लोकस्थिति**—सुशिक्षित व सुधारलेल्या लोकांची वस्ती मध्य पट्टींत विशेष आहे. पश्चिमभागांतील लोक मागसलेले व गरीब आहेत.

विद्येमध्यें पुणें जिल्ह्यांतील लोक विशेष पुढें गेले आहेत.

## कोंकणांतील मराठी जिल्हे.

### ( सामान्य वर्णन. )

मुंबई इलाख्यांत सह्याद्रि व अरबी समुद्र यांमध्यें दक्षिणोत्तर प्रदेशाची जी अरुंद पट्टी आहे तिला कोंकण म्हणतात.

ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे कोंकणांतील मराठी जिल्हे होत.

**सीमा**—*कोंकणाचे उत्तरेस गुजराथ प्रांत व दक्षिणेस गोवा प्रांत आहे.

**लांबीरुंदी***—या प्रदेशाची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ४।। शें मैल असून पूर्वपश्चिम रुंदी ३०–६५ मैल आहे.

**स्वाभाविक स्वरूप**–*हा प्रदेश समुद्रास लागून आहे, यावरून तो सखल आहे; व त्यांतील सर्व नद्या पश्चिमेकडे वाहातात, यावरून तो पश्चिमेकडे उतरता होत गेला आहे; असें दिसून येईल.

या प्रदेशाच्या पूर्वभागांतून सह्याद्रि गेल्यामुळें तो फार डोंगराळ आहे. पश्चिमभाग बराच सपाट आहे.

**पाऊस**—पूर्वभागांत पाऊस सरासरीनें सवाशें इंचांवर पडतो.

पश्चिमभागांत पाऊस सुमारें १०० इंच पडतो.

उत्तरेकडून दक्षिणेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे जों जों जावें, तों तों पाऊस अधिक होत जातो.

**नद्या व खाड्या**–*कोंकणांतील सर्व नद्यांचे उगम सह्याद्रींत असल्यामुळें व कोंकणाच्या प्रदेशाची रुंदी कमी असल्यामुळें यांतील नद्या फार लहान आहेत. शिवाय, नद्या ज्या प्रदेशांतून वाहातात, तो फार उतरता असल्यामुळें त्यांचा प्रवाह संथ नसतो. याच कारणानें त्यांना पावसाळ्यांत फार जोराचे पूर येतात आणि त्यांपैकीं बहुतेक नद्या उन्हाळ्यांत कोरड्या पडतात. यामुळें या नद्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. किनाऱ्याजवळचा प्रदेश बराच सपाट आहे, म्हणून त्या ठिकाणीं मात्र

नदीचें पात्र संथ असतें. किनाऱ्याजवळ नदी समुद्रास मिळते, म्हणून तेथें समुद्राचें पाणी भरतीबरोबर आंत येऊन नदीचें मुख रुंद झालेलें असतें. या रुंद मुखांतून लहान आगबोटी, गलबतें व होड्या आंत येऊं शकतात. अशा रुंद मुखास **खाडी** म्हणतात. कोंकणांतील नद्यांपैकीं ज्या नद्या साधारण मोठ्या आहेत त्यांचे मुखाजवळ अशा प्रकारच्या खाड्या आहेत. आगबोटी व मचवे यांचे साहाय्यानें आंतील भागांशीं दळणवळण करण्यास या खाड्यांचा फार उपयोग होतो.

**हवा**—कोंकणचा बहुतेक भाग सखल असल्यामुळें त्यांतील हवा उष्ण आहे. परंतु समुद्र जवळ असल्यामुळें निरनिराळ्या ऋतूंतील हवेच्या उष्णतामानांत फार फरक पडत नाहीं. समुद्र नजीक असल्यामुळें एथील हवेंत दमटपणाही* बराच आहे.

ठाण्यापेक्षां कुलाब्याची व कुलाब्यापेक्षां रत्नागिरी जिल्ह्याची हवा जास्त निरोगी आहे.

**सुपीकपणा**—हा प्रदेश डोंगराळ व उतरता असल्यानें त्यांतील बरीच माती पावसाचे पाण्याबरोबर समुद्रांत वाहून जाते. या कारणानें हा प्रदेश फारसा सुपीक नाहीं. डोंगरांचे खोऱ्यांत जेथें जमीन खोलगट किंवा सपाट आहे तेथील प्रदेश सुपीक आहे. तसेंच समुद्रकिनाऱ्याजवळ जेथें जमीन सपाट असून समुद्राचें खारें पाणी आंत येत नाहीं, तेथें माती बरीच सांचते, व तो भाग साधारण सुपीक असतो.

---

*हवेंत दमटपणा असला म्हणजे आंगास घाम फार येतो.

**पिकें**—कोंकणांत पाऊस पुष्कळ पडतो; या कारणानें या प्रदेशांत तांदळांचें पीक चांगलें होतें.

एथील जमिनींत होणारीं इतर पिकें **हरीक, नाचणी** अथवा नागली, **वरी, पावटे, कडवे,** आणि **हुलगे** किंवा कुळीथ हीं धान्यें व **ताग** होत.

**झाडें**—समुद्राचें सान्निध्य, रेताड जमीन, व उष्ण हवा या अनुकूल कारणांमुळें या प्रदेशांत **नारळ** व **सुपारी** यांची उत्पत्ति बरीच होते. उष्ण हवा व पुष्कळ पाऊस यांमुळें सह्याद्रीच्या जगलांत **सागाचीं** झाडें होतात.

**फणस, आंबे, काजू** हीं फळझाडें या प्रदेशांत वाढतात. **शिंदी, ताड** व **नारळ** यांपासून दारू काढतात. **मोहाचीं** झाडें ठाणें जिल्ह्यांत होतात. त्यांचे फुलांपासून दारू काढतात. सह्याद्रीचे जंगलांत **हिरड्यांचें** मोठें उत्पन्न होतें.

**जनावरें**—ह्या प्रदेशांत जनावरांना चांगला चारा मिळत नाहीं; म्हणून घोडे, बैल, वगैरे जनावरें या प्रदेशांत चांगलीं निपजत नाहींत.

**लोक**—कोंकणांतील लोक उद्योगी, कंटक व बुद्धिमान् म्हणून प्रसिद्ध आहेत.

**उद्योगधंदे**—शेतकीशिवाय **मासे मारणें** हा महत्त्वाचा धंदा आहे. ठाणें जिल्ह्यांत कांहीं लोक **विणकामाचा** धंदा करितात. समुद्रकिनाऱ्यावर पुष्कळ ठिकाणीं **मिठाचीं** मोठीं **आगरें** आहेत. त्यांत पुष्कळ मीठ तयार होतें.

**निर्यात माल**—तांदूळ, नारळ, सुपारी, मीठ, लाकूड, मासळी.

**आयात माल**-धान्य ( गहूं, डाळ, मुइमूग वगैरे ), विलायती माल [ कापड, साखर, राकेल, धातूंचें सामान इ० ] व वाणाजिन्नस.

---

## मराठी जिल्ह्यांतील आगगाडीचे रस्ते*—

ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे, मद्रास व सदर्न मराठा रेल्वे, मुंबई बडोदा व सेंट्रल इंडिया रेल्वे, आणि तापी व्हॅली रेल्वे, हे आगगाडीचे मुख्य रस्ते होत.

दौंड मनमाड रेल्वे, धुळें चाळिसगांव रेल्वे, जळगांव अंमळनेर रेल्वे, बार्शी पंढरपूर रेल्वे, माथेरान रेल्वे हे वरील रस्त्यांचे फाटे होत.

[ ह्यांच्यासंबंधीं माहिती मुंबई इलाख्याखालीं पाहावी. ]

## मराठी जिल्ह्यांतील बैलगाडीचे मुख्य रस्ते*–

कल्याण व पुणें हीं या जिल्ह्यांतील रस्त्यांचीं मुख्य केन्द्रें होत.

मुख्य रस्ते पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

(अ) कल्याणपासून मुख्य तीन रस्ते निघतात. १. कल्याणहून ईशान्येकडे नाशिक व पूर्व खानदेश या जिल्ह्यांत जाणारा रस्ता. ( हा रस्ता पुढें दिल्लीपर्यंत गेला आहे. ) २. कल्याणहून पुण्याकडे जाणारा रस्ता. ( ३ ) कल्याणहून मुंबईकडे जाणारा रस्ता.

( ब ) पुण्याहून मुख्य तीन रस्ते जातात. १ ला रस्ता—पुण्याहून पूर्वेस नगराकडे जाणारा. २ रा रस्ता—पुण्याहून दक्षिणेस सातारा जिल्ह्यांतून जाणारा. ३ रा रस्ता—पुण्याहून सोलापुराकडे जाणारा.

## मराठी जिल्ह्यांच्या आयात व निर्यात मालासंबंधान सामान्य नियम.

**बाहेरून येणारा माल**—कापड, सूत, रेशीम, धातु व धातूंचे पत्रे, राकेल, स्टेशनरी सामान ( कागद, टांक वगैरे ), मसाले हे जिन्नस परदेशांतून हिंदुस्तानांत येतात, व त्यांची जरूरी बहुतेक सर्व लोकांना आहे; म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या आयात मालांत हे पदार्थ असतात.

हिंदुस्तानांत तयार होणाऱ्या मालापैकीं मुंबईच्या गिरण्यांत व कारखान्यांत तयार होणारा माल व मध्यप्रांता-

तील कापसाचें कापड हा माल प्रत्येक जिल्ह्याच्या आयात मालांत असतो.

**मराठी जिल्ह्यांतून बाहेर जाणारा माल**-देशावरील जिल्ह्यांतून धान्य आणि कोंकणी जिल्ह्यांतून मीठ व नारळ.

खानदेशांतील कापूस मुंबईस जातो. सातारा जिल्ह्यांतून मुंबई शहरीं बराच भुईमूग रवाना होतो. धान्य मुख्यतः खानदेशांतून जातें.

**मराठी जिल्ह्यांचा परस्परांशीं व्यापार**-देशावरील जिल्ह्यांत नारळ, सुपारी, मीठ वगैरे जिन्नस होत नाहींत; म्हणून त्यांच्या आयात मालांत हे जिन्नस असावयाचेच.

देशावर तांदूळ कमी पिकतो. म्हणून देशावरील जिल्ह्यांचे आयात मालांत तांदूळ हा पदार्थ कमीजास्त मानानें असावयाचाच.

( फक्त नाशिक व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत बाहेरून तांदूळ फारसा येत नाहीं. )

गहूं, हरबरा व तूर हीं धान्यें कोंकणांत बहुशः पिकत नाहींत. म्हणून कोंकणांतील जिल्ह्यांच्या आयात मालांत हे जिन्नस थोड्या प्रमाणानें असतात.

पुण्यास तयार होणाऱ्या मालांपैकीं सुती व रेशमी कापड, भांडीं आणि कागद; नाशिक एथें तयार होणारीं भांडीं; सोलापूरच्या गिरण्यांतील कापड; व येवलें एथें तयार होणारीं रेशमी वस्त्रें हा माल बहुतेक जिल्ह्यांत जातो.

---

# पश्चिम खानदेश व पूर्व खानदेश.

## [ खानदेश प्रांताचें सामान्य वर्णन. ]

पूर्वी पश्चिम खानदेश व पूर्व खानदेश मिळून खानदेश असा एकच जिल्हा होता. परंतु त्याचें क्षेत्रफळ इतर जिल्ह्यांचे मानानें सुमारें दुप्पट असल्याकारणानें राज्यव्यवस्थेच्या सोईकरितां १९०६

सालापासून त्याचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन जिल्हे केले आहेत. हे दोन्ही जिल्हे मिळून एक स्वाभाविक विभाग होत असल्याकारणानें त्याचें प्रथम सामान्य वर्णन देऊन नंतर दोन्ही जिल्ह्यांचें विशेष वर्णन दिलें आहे. ]

सर्व मराठी जिल्ह्यांत हा प्रदेश अत्यंत उत्तरेकडील होय. सर्व मराठी जिल्ह्यांमध्यें हा प्रदेश विशेष सुपीक असल्यानें त्यांतील लोक इतर जिल्ह्यांतील लोकांपेक्षां खाऊनपिऊन सुखी आहेत.

**सीमा**—*उत्तरेस सातपुडा पर्वत; पूर्वेस मध्यप्रांत व वऱ्हाड; दक्षिणेस नाशिक जिल्हा; पश्चिमेस गुजराथचा कांहीं भाग.

**स्वाभाविक रचना***—या प्रदेशाचा उत्तर भाग, पश्चिम भाग, व कांहीं अंशीं दक्षिण भाग उंचवट्याचा व डोंगराळ आहे. बाकीचा प्रदेश सपाट आहे.

**उतार**—तापीचे प्रवाहावरून यांतील सामान्य उतार पूर्वेकडून पश्चिमेकडे आहेसा दिसतो; तथापि ही गोष्ट ह्या प्रदेशाच्या जेवढ्या भागांतून तापी नदी वाहात गेली आहे, तेवढ्यासंबंधानेंच खरी आहे. कारण, या प्रदेशाच्या नैर्ऋत्य भागांतून सह्याद्रीची ओळ गेल्यामुळें तो भाग बराच उंच व डोंगराळ असून त्यांत उतार ईशान्येकडे आहे; तसेंच तापीच्या दोन्ही अंगचे प्रदेश तापीकडे उतरते होत गेले आहेत. यांपैकीं उत्तरेकडील प्रदेश जास्त उतरता आहे; हें त्या प्रदेशाचे उत्तरभागीं असलेली पर्वताची रांग व दक्षिणेकडील तापी नदी यांमध्यें अंतर फारसें नाहीं, या गोष्टीवरून समजून येतें.

**पर्वत**-*सातपुड्याची ओळ या प्रदेशाचे उत्तरेस पूर्वपश्चिम गेली आहे.

खानदेशाचे पश्चिमभागांत सह्याद्रीचे शेवटाकडील कांहीं भाग आहे. सह्याद्रीचा एक फाटा पूर्वेकडे गेला आहे; त्याचा कांहीं भाग खानदेश व निजामचें राज्य यांमधून गेला आहे. त्यास **अजिंठ्याचा किंवा सातमाळ्याचा डोंगर** म्हणतात. या डोंगरांत **अजिंठा** गांवाजवळ फार सुंदर **कोरींव लेणी** आहेत.

**नद्या**-*मुख्य नदी **तापी**. खानदेशांतील इतर सर्व नद्या तापीस मिळतात. त्यांपैकीं **पूर्णा**, **गिरण** , **बोरी** व **पांझरा** या महत्त्वाच्या आहेत. त्या सर्व तापीस डाव्या आंगानें मिळतात. तापीच्या कांठच्या जमिनीपेक्षां तापीचें पात्र बरेंच खोल असल्यामुळें तिला कालवे काढितां येत नाहींत.

**हवा**-खानदेशाची सरसरी उंची १५००फूट आहे, या कारणानें त्यांतील हवा उष्ण आहे. नैर्ऋत्य भागांतील व अगदीं उत्तेरकडील प्रदेश उंचवट्याचा असल्यानें त्यांतील हवा मध्यम उष्ण आहे. परंतु उन्हाळ्याखेरीज इतर ऋतूंत या भागांतील हवा रोगट असते.

**सुपीकपणा**-खानदेशांतील बराच भाग तापीच्या कांठचा प्रदेश असल्यामुळें त्यांतील जमीन फार सुपीक आहे.

**पिकें**—या प्रदेशांतील जमीन काळी असून पाऊस थोडा पडत असल्यामुळें त्यांत **कापसाचें पीक उत्तम** होतें. तापीच्या कांठच्या प्रदेशांत **गहूं** व **हरभरा** पुष्कळ पिकतो.

शिवाय ज्वारी, बाजरी, जवस, तंबाकू नीळ, ताग, अंबाडी, गळिताचीं धान्यें ( विशेषतः तीळ ), ऊंस हीं पिकें होतात.

**उद्योगधंदे**—मुख्य धंदा शेतकीचा आहे. कापूस बराच पिकत असल्यामुळें कांहीं लोक विणकाम करितात.

सरकी काढून कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या **गिरण्या** पश्चिम खानदेशांत ६१ व पूर्व खानदेशांत १३९ आहेत.

**लोक**—खानदेशाच्या डोंगराळ भागांत भिल्ल लोकांची वस्ती बरीच आहे.

# पश्चिम खानदेश.

क्षेत्रफळ ५५२५ चौ० मैल, व लोकसंख्या ५॥। लक्ष आहे. लोकवस्ती दर चौ० मैलास १०५.

**प्रदेशाचें स्वरूप**-*उत्तरभागीं, पश्चिमभागीं व बहुतेक दक्षिणभागीं डोंगर आहेत. यामुळें तापीच्या कांठचा प्रदेश खेरीजकरून बाकीच भाग डोंगराळ आहे.

**हवा**—उन्हाळा खेरीज करून बाकीचे ऋतूंत, विशेषतः पश्चिम व उत्तर भागीं, हवा बहुधा रोगट असते.

( कारणें-झाडी, पाऊस, व डोंगराळ प्रदेश वगैरे. ) सखल भागांतील हवा बरीच उष्ण असते.

**पाऊस**—सरासरीनें २४ इंच पडतो.

या जिल्ह्यांत पश्चिमभागीं जरी पुष्कळ पाऊस पडतो, तरी सर्व जिल्ह्यांतील पावसाची सरासरी पूर्व खानदेशापेक्षां कमी आहे. या जिल्ह्यांत पूर्व खानदेशापेक्षां पाऊस जास्त नियमितपणानें पडतो, म्हणून दुष्काळ पडण्याचा संभव कमी असतो.

**पिकें**—महत्वाचें पीक **कापूस** होय. तथापि **पूर्व**-खानदेशापेक्षा या जिल्ह्यांत कापूस कमी पिकतो व **बाजरीचें** पीक जास्त होतें.

पश्चिमेकडील प्रदेशांत पाऊस पुष्कळ पडत असल्याकारणानें त्यांत **तांदूळ** पिकतो. **तीळ** व **जवस** यांचें उत्पन्न या जिल्ह्यांत बरेंच होतें.

**तालुके**—१ धुळें, २ पिंपळनेर, ३ शिंदखेड, ४ नंदुरबार, ५ शिरपूर, ६ शहादें, ७ तळोदें. पेटा—नवापूर.

**गांवें**—

**धुळें** ( ३१ )-हें पश्चिम खानदेश **जिल्ह्याचें मुख्य ठिकाण** पांझरा नदीचे कांठीं आहे. एथें **कापसाचा मोठा व्यापार** चालतो व काप-

यांतील सरकी काढून कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कांहीं गिरण्या आहेत.

**तळोदें** ( ६ )--हा गांव सातपुड्याचे जंगलाचे जवळ असल्या- मुळें एथें **लाकडांचा मोठा** व्यापार चालतो.

## पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील संस्थानें.

**डांगदेश**--हा प्रदेश सह्याद्रीचे पश्चिमेस असून यांत सात लहान संस्थानें आहेत. तीं सर्व भिल्ल राजांचे ताब्यांत आहेत. **सागवानी लाकडाचें उत्पन्न** या प्रदेशांत विशेष होतें.

**मेवासी प्रांत**--हा प्रदेश पश्चिम खानदेश जिल्ह्याचे वायव्येस आहे. त्यांत लहान लहान सहा संस्थानें आहेत. या प्रदेशांत बहुतेक भिल्ल लोकांची वस्ती आहे. **लाकूड, मध** व **मेण** हे या प्रांतांतील महत्त्वाचे उत्पन्नाचे पदार्थ होत.

## पूर्व खानदेश.

क्षेत्रफळ ४॥ हजार मैल व लोकसंख्या १०,३५,००० आहे. लोकवस्ती दर चौरस मैलास अडीचशें.

**स्वाभाविक रचना**---*पश्चिम खानदेशापेक्षां पूर्व खानदेशाचा प्रदेश जास्त उंचीचा आहे असें दिसून येतें. उत्तरभागीं सातपुडा असल्यानें उत्तरेकडील प्रदेश डोंग- राळ आहे व त्यांत जंगल पुष्कळ आहे. दक्षिणभाग डोंगराळ आहे. मध्यभागचा ( तापीच्या कांठचा ) प्रदेश सपाट आहे.

**हवा**--उन्हाळ्यांत फार उष्ण पण एकंदरीनें निरोगी आहे. सातपुड्याचे नजीकचे प्रदेशाची हवा हिंवाळ्याचे प्रारंभीं रोगट होतें. ( कारणें--झाडी, खोलगट प्रदेश वगैरे. )

ह्या जिल्ह्यांतील चोपडें तालुक्यांत **उन्हाळीं** आहेत.

**पाऊस**--सरासरी २८ इंच पडतो.

**पिकें**--मुख्य पीक **कापूस**. इतर मुख्य पिकें **ज्वारी** व **बाजरी** होत.

१९७ ब, नारायण पेठ, पुणें

चाळिसगांव व अंमळनेर या तालुक्यांत **बाजरी** व **तीळ** हीं पिकें मुख्यतः होतात.

**कारखाने**—कापडाच्या २ व कापसाची सरकी काढण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या **१३९ गिरण्या** या जिल्ह्यांत आहेत.

तालुके—१ चाळिसगांव, २ पाचोरें, ३ जामनेर, ४ अंमळनेर, ५ एरंडोल, ६ जळगांव, ७ भुसावळ, ८ चोपडें, ९ यावल, १० रावेर.

**पेटे**—पारोळें, भडगांव, एदलाबाद.

**गांवें**—*

**जळगांव** ( १८ )–हें **जिल्ह्याचें ठाणें** आहे. हें शहर **व्यापाराची मोठी पेठ** आहे. एथें एक सुताची व कापडाची गिरणी आहे. एथून एक आगगाडीचा फाटा अंमळनेराकडे गेला आहे. **चाळिसगांव** ( १० )–धुळ्यास जाणारा आगगाडीचा फाटा एथून निघाला आहे. **अंमळनेर** ( १३ )–एथें एक सुताची व **कापडाची गिरणी** आहे. **भुसावळ** ( १८ )–हें एक आगगाडीचें **जंक्शन** आहे. एथून रेल्वेचा एक फाटा नागपुराकडे व दुसरा खांडव्याकडे गेला आहे. एथें रेल्वेकंपनीचा मोठा कारखाना आहे. **फैजपूर** ( ७ )–ही **व्यापाराची मोठी पेठ** आहे. एथें रंगीत पासोड्या व लुगडीं होतात.

## नाशिक जिल्हा.

**सीमा***—उत्तरेस खानदेश प्रांत, पूर्वेस निजामचें राज्य, दक्षिणेस नगर जिल्हा, व पश्चिमेस सह्याद्रि.

लांबी पूर्वपश्चिम सुमारें १३० मैल व रुंदी दक्षिणोत्तर १००मैल असून क्षेत्रफळ ५८५६ चौ० मैल आहे. लोकसंख्या ९ लाख आहे. लोकवस्ती दर चौ० मैलास १५४ आहे.

**स्वाभाविक स्वरूप**—*नाशिक जिल्ह्याचा पश्चिमभाग उंचवट्याचा व डोंगराळ आहे, आणि पूर्वभाग सपाट व कमी उंचवट्याचा आहे.

**उंची**–पश्चिमभागीं २००० व पूर्वभागीं १४०० फूट आहे.

या जिल्ह्याच्या उत्तरार्धांत गिरणा नदीचें, व दक्षिणार्धांत गोदावरीचें खोरें असून या दोन खोऱ्यांचे दरम्यान चांदवडचे डोंगर आहेत

**पर्वत**—*नाशिक जिल्ह्याचे पश्चिमभागांतून सह्याद्रीची ओळ गेलेली आहे. तिच्या फाट्यांपैकीं **चांदवडचे डोंगर** हा महत्त्वाचा फाटा आहे.

**नद्या**—*नाशिक जिल्ह्यांतील मुख्य नदी **गोदावरी** होय.

तिच्या कांठीं नाशिक शहर आहे. गिरणा, मोसम, कादवा व दारणा या इतर नद्या होत.

**हवा**—ह्या जिल्ह्याचा पश्चिमभाग डोंगराळ असून तेथें पाऊस पुष्कळ पडतो. शिवाय त्यांत झाडीही पुष्कळ आहे. म्हणून त्यांतील हवा सर्द आहे, व ती उन्हाळ्याखेरीज इतर ऋतूंत रोगट असते. पूर्वभागांत उंची कमी, म्हणून तेथील हवा बरीच उष्ण आहे. मधल्या प्रदेशांतील हवा मध्यम उष्ण आहे.

**सुपीकपणा**—पूर्वभाग सपाट असल्यामुळें सुपीक आहे. पश्चिमभाग डोंगराळ असल्यानें सुपीक नाहीं.

**पिकें**—पूर्वभागांत **बाजरी, गहूं,** तीळ इत्यादि धान्यें होतात. नाशिकशहरचे आसपास उत्तम प्रकारचीं **द्राक्षें** होतात.

गोदावरीचे कांठचा प्रदेश उंच आहे, यामुळें या नदीस कालवे काढून नदीकांठच्या जमिनीस पाण्याचा पुरवठा करितां येत नाहीं. गिरणा नदी शेतीस फार उपयोगी आहे. तिला अनेक धरणें बांधलीं आहेत.

**उद्योगधंदे**—या जिल्ह्याचें मुख्य शहर **नाशिक** हें **तांब्यापितळेच्या** भांड्यांविषयीं फार **प्रसिद्ध** आहे. या जि-

ह्याचे पूर्वभागांत साळ्याकोष्ट्यांची वस्ती आहे; ते कापड विणतात. **येवलें** एथील कद, पितांबर वगैरे **रेशमी कापड** व **पागोटीं** हीं प्रसिद्ध आहेत.

**तालुके**—१ नाशिक, २ मालेगांव, ३ बागलाण, ४ कळवण, ५ पेठ, ६ दिंडोरी, ७ चांदवड, ८ नांदगांव, ९ येवलें, १० निफाड, ११ इगतपुरी, व १२ सिन्नर.

**गांवें***—

**नाशिक** ( ३३ )—हें शहर **जिल्ह्याचें मुख्य ठिकाण** आहे. हें गोदावरीच्या कांठीं एक **प्रसिद्ध क्षेत्र** असून एथें दरवर्षी पुष्कळ यात्रेकरू येतात. गोदावरीचे पूर्वेकडील नाशिकचे भागास **पंचवटी** म्हणतात. राम वनवासास गेले त्या वेळीं ते ज्या पंचवटींत राहिले म्हणून रामायणांत लिहिलें आहे ती हीच होय असें कांहीं लोक समजतात. **तांब्यापितळेच्या भांड्यां**विषयीं नाशिकची फार प्रसिद्धि आहे. नाशिकपासून ५ मैलांवर **भगूर** एथें गोऱ्या फौजेची **छावणी** आहे. **त्र्यंबकेश्वर** (४)—हें नाशिकचे पश्चिमेस वीस मैलांवर **प्रसिद्ध देवस्थान** आहे. एथें गोदावरीचा उगम होतो. **मनमाड** ( ७ )—हें आगगाडीचें **जंक्शन** आहे. **येवलें** ( १६ )—कद, पितांबर, पागोटीं, व एकंदरींत **रेशमाचें** व **जरीचें काम** यांविषयीं हा गांव पूर्वींपासून फार प्रसिद्ध आहे. **इगतपुरी** ( ८ )—हें रेल्वेचें **मोठें स्टेशन** आहे. हा गांव उंचावर आहे, यामुळें एथील **हवा थंड** आहे. एथें कांहीं साहेब लोकांचे बंगले आहेत.

## संस्थानें.

**सुरगणा**—हें संस्थान देशमुख आडनांवाचे राजाचे ताब्यांत आहे. ह्यांत कोळी लोकांची वस्ती विशेष आहे. ह्यांतील मुलूख फार डोंगराळ असून सुपीक बेताचाच आहे. क्षेत्रफळ ३६० चौरस मैल. लोकसंख्या १५०००. उत्पन्न ४७०००.

# पुणें जिल्हा.

मराठी जिल्ह्यांमध्यें हा जिल्हा अगदीं मध्यभागीं आहे.

**सीमा**—*उत्तरेस नगर जिल्हा; पूर्वेस नगर जिल्हा व सोलापूर जिल्ह्याचा कांहीं भाग; दक्षिणेस निरा नदी आणि तिच्या पलीकडे सातारा व सोलापूर हे जिल्हे; पश्चिमेस सह्याद्रि.

पूर्वपश्चिम लांबी १३० मैल व दक्षिणोत्तर रुंदी ९० मैल असून क्षेत्रफळ ५३५० चौ० मैल आहे. लोकसंख्या १०,७१,००० आहे. लोकवस्ती दर चौ० मैलास २०० आहे.

**स्वाभाविक स्वरूप**—*अगदीं पश्चिमेकडील प्रदेश डोंगराळ आहे; पूर्व प्रदेश बहुतेक सपाट आहे.

पुणें जिल्ह्याच्या उत्तरभागांतील नद्या आग्नेयीकडे वाहातात, यावरून या भागांत उतार आग्नेयीकडे आहे; व दक्षिणभागांतील नद्या पूर्वेकडे वाहातात, यावरून या भागांत उतार पूर्वेकडे आहे.

**डोंगर**—*सह्याद्रीची ओळ या जिल्ह्याचे पश्चिमभागांतून गेली आहे. हिचे कित्येक फाटे पूर्वेकडे या जिल्ह्यांत पसरले आहेत.

**नद्या**—*या जिल्ह्यांतील मोठी नदी **भीमा** होय. तिचा उगम सह्याद्रींत भीमाशंकराजवळ होऊन ती आग्नेयीकडे वाहात जाते.

भीमेच्या खालोखाल मोठी नदी **निरा** होय. तिचा उगम सह्याद्रींत होतो. ती निरानरसिंगपुराजवळ भीमेस मिळते. या दोन नद्यांचा **संगम** जेथें होतो, तें ठिकाण पुणें जिल्ह्याचें आग्नेयीकडील टोंक होय. या जिल्ह्यांतील तिसरी महत्त्वाची नदी मुळा व मुठा या नद्यांच्या संगमापासून झालेली **मुळामुठा** नदी होय. मुळा, मुठा यांचा संगम पुण्याजवळ होतो.

**सुपीकपणा**–पुणें जिल्ह्याचा पूर्व भाग सपाट असल्यानें सुपीक आहे; पण या भागांत नद्या कमी असल्यानें व पाऊस कमी पडत असल्यामुळें पाण्याची अडचण आहे. अलीकडे निरा व मुठा या नद्यांचे कालवे काढून ती अडचण अंशतः नाहींशी केली आहे.

**पिकें**—पश्चिमभागांत पाऊस पुष्कळ पडत असल्यामुळें तेथें **तांदळाचें** पीक होतें. उत्तरभागांत **बटाटे** पुष्कळ पिकतात. पूर्वभागांत **ज्वारी** व **ऊस** हीं मुख्य पिकें आहेत.

**कारखाने वगैरे**—पुणें एथें **तांब्यापितळेचीं भांडीं, कद, पितांबर, जरीचें कापड, लुगडीं, कापसाचें कापड, कागद** वगैरे होतात.

**तालुके**—१ हवेली, २ जुन्नर, ३ खेड, ४ मावळ, ५ शिरूर, ६ पुरंदर, ७ भिमथडी, ८ इंदापूर.

**पेटे**—आंबेगांव, मुळशी व दौंड.

**गांवें***---

**पुणें** ( १५८ )–हें ह्या जिल्ह्याचें **मुख्य ठाणें** होय. मध्यभागचे कमिशनर यांचें व मुंबई इलाख्यांतील विद्याखातें, जंगलखातें, लष्करी हिशेबखातें, शेतकीखातें व इतर बहुतेक खातीं ह्यांचीं मुख्य ऑफिसें एथें आहेत.

हें शहर पूर्वी पेशव्यांची राजधानी होतें, यामुळें विद्या, कला, चालरीत, शुद्ध व सभ्य भाषा इत्यादि गोष्टींसंबंधानें तें सर्व **मराठी जिल्ह्यांचें नाक** आहे. इतर मराठी जिल्ह्यांतील लोक सामान्यतः पुणें शहराचें अनुकरण करितात. हें पेशव्याची राजधानी असल्यामुळें एथें पूर्वी शास्त्री, पंडित, व्यापारी, कारागीर, इनामदार, जहागिरदार ह्यांची वस्ती पुष्कळ असे. यामुळें पुणें शहर सर्वोत्तम वस्तूंचें आगर मानीत असत. तोच त्याचा लौकिक अद्यापही कांहीं अंशानें कायम आहे. जुन्या प्रसिद्ध घराण्यांपैकीं बरेच लोक एथें राहात असल्यामुळें व **विद्वान् आणि उद्योगी लोकांचा भरणा एथें मोठा असल्यामुळें ह्या शहरास बराच मान आहे.**

हें शहर मुंबई शहरास नजीक असून एथील हवा चांगली असल्यामुळें मुंबईचे गव्हर्नर व त्यांचे हाताखालचे अधिकारी वर्षांतून चार महिने एथें राहातात. पुण्याजवळ गणेशखिंडींत गव्हर्नरसाहेबांचा बंगला आहे.

एथें सुमारें १० हायस्कुलें, चार इंग्रजी कॉलेजें व दोन मराठी ट्रेनिंग कॉलेजें असून मराठी शाळा शंभरावर आहेत. [ पुणें शहरच्या म्युनिसिपालिटींत ३९ कमिशनर असून पैकीं २६ लोकांनीं निवडलेले व १३ सरकारनें नेमलेले असतात. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न सुमारें ३ लाख आहे. ]

पुणें एथें कापसाचें व रेशमाचें कापड तयार करण्याची एक, भांड्यांच्या तीन, तेलाच्या दोन व पिठाच्या अनेक गिरण्या आहेत. शिवाय एथें एक साखरेचा, दोन छत्र्यांचे, दोन विडाचे, व पितांबर आणि सुगंधी सामान यांचे अनेक कारखाने आहेत.

देहू–एथें प्रसिद्ध साधु तुकाराममहाराज वैकुंठवासी झाले. सिंहगड–हा इतिहासप्रसिद्ध किल्ला हवेली तालुक्यांत पुण्याचे नैर्ऋत्येस पंधरा मैलांवर आहे. जुन्नर ( ९ )–हें मुसलमानी अमदानींत बरेंच प्रसिद्ध शहर होतें. एथें सुडाचे कागद होतात. जुन्नरचे पश्चिमेस अर्ध्या मैलावर शिवनेरी किल्ला आहे. या किल्ल्यावर शिवाजीमहाराजांचा १६२७ सालीं जन्म झाला. इंद्रायणीचे कांठीं आळंदी एथें ज्ञानदेवाची समाधि आहे. भीमाशंकर–सह्याद्रीमध्यें भीमा नदीच्या उगमाजवळ हें स्थान आहे. प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकीं हें एक आहे. लोणावळें (७) व खंडाळें हीं गांवें सह्याद्रीच्या माथ्यावर असल्यामुळें एथील हवा थंड आहे. एथें श्रीमंत लोकांचे ( मुख्यतः पार्शी, भाटे, युरोपियन यांचे ) बंगले बरेच आहेत. कार्लें–एथील कोरींव लेणें फार भव्य व पाहाण्यासारखें आहे. कोरेगांव–एथें इंग्रजांची फौज व शेवटचा बाजीराव याची फौज यांमध्यें लढाई होऊन इंग्रजांस जय मिळाला. या जयाचें स्मरण राहावें म्हणून एथें एक जयस्तंभ बांधिला आहे. जेजुरी (३)–खंडोबाचें प्रसिद्ध देवस्थान आहे. बारामती (१०)–एथील रेशीमकांठी धोतरजोडे प्रसिद्ध आहेत. प्रख्यात मराठी कवि मोरोपंत एथें राहात

असत. **निरानरसिंगपूर**—एथें निरा व भीमा यांच्या संगमावर **नरसिंहाचें** प्रसिद्ध **देवस्थान** आहे.

## संस्थानें.

**भोर संस्थान**—ह्या जिल्ह्याच्या नैर्ऋत्य दिशेस हें संस्थान आहे. (क्षेत्रफळ१५००चौरस मैल, लोकसंख्या १,४४,०००.) ह्या संस्थानांतील मुलूख डोंगराळ असून त्यांत जंगल पुष्कळ आहे. ह्या संस्थानांत तोरणा किल्ला आहे.

हें संस्थान ब्राह्मण संस्थानिकाच्या ताब्यांत असून त्यास **पंतसचिव** हा किताब आहे. शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं सचिव हे एक होते. ह्या संस्थानाचें उत्पन्न ५ लाख आहे.

मुख्य शहर—**भोर** ( ४ ).

# नगर जिल्हा.

**सीमा**—*उत्तरेस नाशिक जिल्हा व निजामचें राज्य; पूर्वेस निजामचें राज्य; दक्षिणेस सोलापूर जिल्हा; पश्चिमेस पुणें जिल्हा.

**आकार, लांबीरुंदी इ॰**—या जिल्ह्याचा आकार साधारणपणें चार पाकळ्यांच्या फुलाप्रमाणें आहे. पूर्वपश्चिम लांबी १२५ व दक्षिणोत्तर रुंदी १२० आहे. क्षेत्रफळ ६५९४ चौ॰ मैल असून लोकसंख्या ९४५००० आहे. ( दर चौ॰ मैलीं १४३. )

**स्वाभाविक स्वरूप**—*या जिल्ह्याचा पश्चिमभाग डोंगराळ असून उंचवट्याचा आहे. मध्यभागांतही थोडे डोंगर आहेत. मुख्य नद्यांच्या प्रवाहावरून या जिल्ह्यांत उतार वायव्येकडून आग्नेयीकडे आहे, असें दिसतें. हरिश्चंद्रगडापासून जी डोंगरांची रांग पूर्वेकडे गेली आहे ती या जिल्ह्यांतील लहान नद्यांचा पाणलोट होय.

**डोंगर**—*या जिल्ह्याचे अत्यंत पश्चिमेकडील भागांतून सुमारें २५ मैलपर्यंत सह्याद्रीची ओळ गेली आहे.

**नद्यां**—*ह्या जिल्ह्यांतील महत्त्वाच्या नद्या **गोदावरी, भीमा, प्रवरा** व **सिना** ह्या होत.

प्रवरा गोदेस मिळते. सिना सोलापूर जिल्ह्यांत भीमेस मिळते. गोदा ह्या जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून वाहाते, व भीमा दक्षिण सीमेवरून वाहाते. सिनेचाही बराच भाग सरहद्दीवरून गेला आहे. या जिल्ह्याचे मध्यभागांतून वाहाणारी अशी महत्त्वाची नदी प्रवरा होय.

**हवा**—या जिल्ह्याची समुद्रसपाटीपासून उंची ( पूर्वेकडून पश्चिमेकडे ) १॥ ते २॥ हजार फुटांपर्यंत असल्यामुळें त्यांतील हवा मध्यम उष्ण आहे.

पश्चिम भागाची उंची २॥ हजार फूट असल्यामुळें त्यांतील हवा बरीच थंड आहे. पूर्व भागांतील हवा थोडीशी उष्ण आहे, परंतु ती निरोगी आहे. मधल्या भागांतील हवा चांगली निरोगी आहे. हवेच्या बाबतींत या जिल्ह्याचें नाशिक जिल्ह्याशीं कांहींसें साम्य आहे.

**सुपीकपणा**:-पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश खेरीजकरून बाकीचा प्रदेश-विशेषतः गोदावरी, भीमा व प्रवरा या नद्यांचे कांठचा प्रदेश-चांगला सुपीक आहे.

**पिकें**—या जिल्ह्याच्या पूर्वभागांत काळी जमीन असल्यामुळें त्यांत कांहीं **कापूस** पिकतो. उत्तरभागांत **गहूं व हरबरा** बराच पिकतो.

**उद्योगधंदे**—मुख्य धंदा शेतकीचा. कोष्टी लोकांची वस्ती या जिल्ह्यांत बरीच आहे. ते खण व लुगडीं विणतात. कांहीं लोक तांब्यापितळेचीं भांडीं करितात.

**तालुके**—१ अहमदनगर, २ राहुरी, ३ कोपरगांव, ४ नेवासें, ५ शेवगांव, ६ जामखेड, ७ कर्जत, ८ श्रीगोंदें, ९ पारनेर, १० संगमनेर, ११ अकोलें.

**गांवें**—*

**नगर** ( ४२ )—हें **जिल्ह्याचें ठाणें** आहे. हें शहर अहमद निजामशाह यानें वसविलें म्हणून ह्याला अहमदनगर असें नांव पडलें. एथें एक भुईकोट किल्ला आहे. किल्ल्याजवळ सरकारी फौजेची छावणी आहे. या शहराजवळील शाहा डोंगरावर **चांदबीबीचा महाल** आहे. नगर एथें कापूस दाबण्याच्या कांहीं गिरण्या आहेत.

**कोपरगांव**–एथें एक **पेशव्यांचा वाडा** आहे. या ठिकाणीं राघोबादादा पेशवे आपल्या उतारवयांत राहात असत. **पुणतांबें** (६)–हें गोदावरीचे कांठीं एक **क्षेत्र** असून एथें साधु **चांगदेव यांची समाधि** आहे. **खर्डें**–एथें भुईकोट किल्ला आहे. या गांवाजवळ **निजाम व मराठे यांच्यांत** १७९५ सालीं **लढाई** झाली. **कर्जत**–एथें धान्याचा व्यापार चालतो व लुगडीं चांगलीं होतात. **श्रीगोंदें** ( ६ )–एथें शिंदे सरकारचा मोठा वाडा आहे. **शेख महंमद** म्हणून एक साधु व कवि ह्या गांवीं होऊन गेला. श्रीगोंदें तालुक्यांतील **घोडे** प्रसिद्ध आहेत. **संगमनेर** ( १४ )–एथें लुगडीं व पितळेचें सामान फार चांगलें होतें. **अनंतफंदी** म्हणून एक प्रसिद्ध कवि एथें होऊन गेला. **हरिश्चंद्रगड**–हें सह्याद्रींत थंड हवेचें ठिकाण आहे.

## सातारा जिल्हा.

देशावरील मराठी जिल्ह्यांपैकीं हा जिल्हा अतिशय दक्षिणेकडील होय.

**सीमा**–*उत्तरेस पुणें जिल्हा; पूर्वेस सोलापूर जिल्हा; दक्षिणेस वार्णा नदी व तिच्या पलीकडे कोल्हापूर, सांगली वगैरे संस्थानें; पश्चिमेस सह्याद्रि व त्याच्या पलीकडे रत्नागिरी जिल्हा.

ह्या जिल्ह्याचा आकार साधारणपणें चौरसाप्रमाणें आहे.

**लांबीरुंदी वगैरे**–पूर्वपश्चिम लांबी ८५ व दक्षिणोत्तर रुंदी ८० मैल आहे. क्षेत्रफळ ४८२७ चौरस मैल. लोकसंख्या १०,८१,०००. लोकवस्ती दर चौ० मैलास २२४.

**स्वाभाविक स्वरूप**–*ह्या जिल्ह्याचा पश्चिमेकडील भाग डोंगराळ असून विशेष उंचवट्याचा आहे. नद्यांच्या प्रवाहावरून पाहातां उतार मुख्यतः दक्षिणेकडे व किंचित् आग्नेयीकडे दिसतो. उंची पश्चिमेकडे २॥ हजार फूट व पूर्वेकडे १॥ हजार फूट आहे.

**पर्वत**—*सह्याद्रीची ओळ पश्चिम भागीं आहे.

**नद्या**—*ह्या जिल्ह्यांतील मुख्य नदी **कृष्णा** होय. ती महाबळेश्वराच्या डोंगरांतून निघून आग्नेयीकडे व नंतर

दक्षिणेकडे बरीच लांबपर्यंत वाहात जाते व पुढें पुनः आग्नेयीकडे वळते.

**निरा** नदी ह्या जिल्ह्याच्या उत्तर हद्दीवरून वाहाते. **वार्णा** नदी दक्षिण हद्दीवरून वाहाते. **कोयना, वेरळा, वेण्णा** व **माण** ह्या इतर नद्या होत. पैकीं पहिल्या तीन कृष्णेस मिळतात.

**हवा**—पश्चिम भाग बराच उंचवट्याचा आहे त्यामुळें त्यांतील हवा थंड आहे. डोंगराळ प्रदेशांपैकीं जे भाग खोलगट आहेत त्यांतील हवा रोगट आहे. मध्यभागांतील हवा मध्यम उष्ण आहे. पूर्वभाग कमी उंचवट्याचा असल्यामुळें त्यांतील हवा कांहींशी उष्ण आहे. यांत झाडी कमी आहे.

**सुपीकपणा**—ह्या जिल्ह्यांतील मध्य पट्टींत बऱ्याच नद्यांच्या कांठचा प्रदेश येत असल्यामुळें तो सुपीक आहे. पश्चिमभाग डोंगराळ व उतरता असल्यामुळें नापीक आहे. पूर्वभाग सपाट आहे, परंतु त्यांत पाण्याचा पुरवठा कमी असल्यामुळें तो तितका सुपीक नाहीं.

**पिकें—पश्चिमभागांत** पाऊस पुष्कळ पडत असल्यामुळें त्यांत **तांदूळ** होतात. **कृष्णाकांठच्या प्रदेशांत** उत्तम प्रकारची **ज्वारी** व **पूर्वभागांत** माण नदीच्या कांठीं उत्तम प्रतीची **बाजरी** पिकते. **ऊस, भुईमूग,** व **हळद** हीं ह्या जिल्ह्यांतील विशेष पिकें होत.

**तालुके**—१ सातारा, २ वाई, ३ कोरेगांव, ४ खटाव, ५ माण, ६ खानापूर, ७ तासगांव, ८ वाळवें, ९ कऱ्हाड, १० पाटण, ११ जावली. पेटे—खंडाळें, शिराळें व मालकमपेठ.

**गांवें**—*

**सातारा** ( १९ )—हें ह्या जिल्ह्याचें **मुख्य शहर** आहे. पूर्वी हें शहर **मराठी राज्याची राजधानी** होतें. परंतु पेशवे मराठी राज्याचे चालक झाल्यावर त्यांनीं पुणें शहर आपली राजधानी केली.

**शिवाजींचे वंशज** अद्याप साताऱ्यास राहातात. त्यांना सरकारांतून ३० हजारांची जहागीर व ३० हजारांचें पेन्शन आहे. सातारा एथील जुना वाडा, नवा वाडा, जळमंदीर व आरसेमहाल या इमारती पाहाण्यासारख्या आहेत. या शहराजवळचा **अजिमतारा** किल्ला नामांकित किल्ल्यांपैकीं आहे. **सज्जनगड ऊर्फ परळीचा किल्ला**—साताऱ्यापासून ७ मैलांवर हा किल्ला आहे. प्रसिद्ध साधु **रामदासस्वामी यांची** या किल्ल्यावर **समाधि** आहे. एथें माघ वद्य १ पासून ९ पर्यंत रामदासस्वामींचे पुण्यतिथीनिमित्त व चैत्रशुद्धांत रामनवमीनिमित्त मोठे उत्सव होतात.

**वाई** ( ५ ) हें कृष्णेच्या कांठीं एक टुमदार शहर व क्षेत्र आहे. एथें कृष्णेस अनेक घाट असून तिच्या कांठीं देवळांची रांगच्या रांग असल्यामुळें कृष्णाकांठची शोभा अपूर्व दिसते. या ठिकाणीं रास्ते यांनीं बांधलेलीं विष्णु, लक्ष्मी, गणपति वगैरे देवतांचीं देवालयें पाहाण्यासारखीं आहेत. गणपतीच देऊळ व त्यांतील गणपतीची मूर्ति फारच भव्य आहे. मूर्तीची उंची ५ हात असून दंड व मांड्या यांचा घेर २–३ हात आहे. विष्णूचे देवालयांतील विष्णूची मूर्ति फारच सुंदर आहे. रास्त्यांचे मोतीबागेंतील कारंज्याच्या खजिन्याची उंची ९।१० पुरुष आहे. वाईजवळील **धोम** एथील **नरसिंहाचें स्थानही** पाहाण्यासारखें आहे. **पांचगणी** (१)–या ठिकाणची उंची ४३७८ फूट असल्यामुळें एथील **हवा थंड** असते. एथें कांहीं युरोपियन व युरेशियन लोकांनीं बंगले बांधले आहेत. **तासगांव** ( ७ )–एथील गणपतीचें देवालय व त्याजपुढील **गोपूर** हीं पाहाण्यासारखीं आहेत. **भिलवडी** एथील **तूप उत्तम** असतें अशी प्रसिद्धि आहे. एथून ९ क मैलावर कृष्णेच्या कांठीं **औदुंबर हें दत्ताचें** प्रसिद्ध **देवस्थान** आहे. **कऱ्हाड** ( ११ )–एथील **उंच मनोरे** पाहाण्यासारखे आहेत. एथें **आगकाड्यांच्या पेट्यांचा** एक **कारखाना** आहे. **महाबळेश्वर**–जावली तालुक्यांत सह्याद्रीचा जो भाग आला आहे, त्यांत महाबळेश्वर हें **थंड हवेचें ठिकाण** आहे. त्याची उंची ४॥। हजार फूट असल्यामुळें व तेथें झाडी पुष्कळ असल्यामुळें तेथील हवा उन्हाळ्यांत मजेदार थंड असते. म्हणून तेथें गव्हर्नर-

साहेब, मोठे युरोपियन अधिकारी व श्रीमंत लोक हवा खाण्याकरितां येतात. त्यांच्याकरितां एथें अनेक बंगले बांधले आहेत. या ठिकाणाहून भोंवतालच्या प्रदेशाचा देखावा फारच रम्य दिसतो. महाबळेश्वरास कोणी **नहर** असें म्हणतात. महाबळेश्वरावरील गांवास **मालकमपेठ** ( ४ ) म्हणतात. **क्षेत्र महाबळेश्वर**—महाबळेश्वरापासून थोडया अंतरावर क्षेत्र महाबळेश्वर आहे. एथें कृष्णा, वेण्णा व कोयना या नद्यांचे उगम आहेत. यामुळें या स्थळास पवित्रता झाली आहे.

## सातारा जिल्ह्यांतील संस्थानें.

या जिल्ह्यांत **औंध व फलटण** हीं संस्थानें आहेत. **फलटण** हें संस्थान या जिल्ह्याच्या उत्तरेस असून तें **निंबाळकर** नांवाच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे. ( उत्पन्न ४॥ लाख. ) **औंध**—हें संस्थान सातारा जिल्ह्याचे आग्नेयीस असून तें एका ब्राह्मण राजाचे ताब्यांत आहे. त्यास **पंतप्रतिनिधि** म्हणतात. साताऱ्याच्या मराठे राजांच्या अष्टप्रधानांमध्यें प्रतिनिधि हे मुख्य होते. ( उत्पन्न २। लक्ष. )

# सोलापूर जिल्हा.

मराठी जिल्ह्यांपैकीं हा अत्यंत पूर्वेकडील जिल्हा होय.

**सीमा**—*उत्तरेस व पूर्वेस निजामचें राज्य; दक्षिणेस जत संस्थान व विजापूर जिल्हा; पश्चिमेस पुणें व सातारा जिल्हे.

ह्या जिल्ह्याचा आकार साधारणपणें पत्त्यांतील फुलवराच्या ठिक्याप्रमाणें आहे.

**लांबी, रुंदी वगैरे**—*पूर्वपश्चिम लांबी ११० मैल व दक्षिणोत्तर रुंदी १८० मैल आहे. क्षेत्रफळ ४५४७ चौ० मैल. लोकसंख्या ७,६८,०००. लोकवस्ती दर चौ० मैलास १६९.

**डोंगर**—मोठे डोंगर ह्या जिल्ह्यांत मुळींच नाहींत.

**नद्या**—*ह्या जिल्ह्यांत नद्या फार थोड्या आहेत. मुख्य नदी **भीमा** होय.

भीमेच्या खालोखाल मोठ्या नद्या **सिना व निरा** होत. सिना नदी ह्या जिल्ह्याचे ईशान्य सरहद्दीवरून वाहाते. सातारा जिल्ह्यांतून वाहात येणारी माण नदी ह्या जिल्ह्यांत भीमेस येऊन मिळते.

**हवा**—हा जिल्हा सह्याद्रीपासून बराच दूर असल्यामुळें ह्यांतील प्रदेशाची उंची पुणें जिल्ह्यापेक्षां बरीच कमी आहे; म्हणून एथील हवा उष्ण आहे.

यांत फारशा नद्या नाहींत, यामुळें झाडींही कमी आहे. नद्या कमी व झाडी कमी यामुळें मुलूख ओसाड दिसतो.

**उद्योगधंदे**—कापसांतील सरकी काढून त्याचे गठ्ठे बांधण्याच्या व कापसाचें सूत व कापड तयार करण्याच्यां अनेक **गिरण्या** या जिल्ह्यांत आहेत.

जिल्ह्याच्या इतर भागांत कापड विणण्याशिवाय दुसरा महत्त्वाचा धंदा नाहीं.

**तालुके**–१ सोलापूर, २ माढें, ३ पंढरपूर, ४ बार्शी, ५ करमाळें, ६ सांगोलें, ७ माळशिरस.

**गांवें**—*

**सोलापूर** ( ६१ )–हें **जिल्ह्याचें मुख्य ठिकाण** होय. एथें कापसाच्या **गिरण्या** ६ आहेत. या शहरांतील **जैनांचें देवालय** पाहाण्यासारखें आहे. एथें लुगडींही चांगलीं होतात.

**पंढरपूर** ( २८ )–एथील **विठोबाचें देवस्थान** फार प्रसिद्ध आहे. विठोबाचे भक्त म्हणून प्रख्यात असलेले जे तुकाराम, नामदेव इत्यादि साधु पुरुष होऊन गेले त्यांचें दैवत हाच विठोबा होय. साधुपुरुषांच्या संबंधामुळें एथील पुष्कळ स्थलांना पवित्रता आलेली आहे. एथील विठोबाचे दर्शनाकरितां २।३ शें कोसांवरून लोक येतात. **एथें आषाढी, कार्तिकी व चैत्री एकादशीस मोठी यात्रा** भरते. या यात्रांना लाख दोन लाख यात्रेकरू येतात. या यात्रांच्या वेळीं पंढरपुरास गर्दी व अस्वच्छता वाढून कधीं कधीं महामारीचा अजार सुरू होतो, व तो चोहोंकडे पसरून त्यानें हजारों लोक मरतात. पंढरपूर **भीमेच्या कांठीं** आहे. एथें भीमेच्या प्रवाहाचा आकार चंद्राच्या कोरीप्रमाणें ✓ असल्या-

मुळें या ठिकाणीं तिला **चंद्रभागा** असें म्हणतात. **बार्शी** ( १८ )–एथें कापूस दाबून त्याचे गठ्ठे बांधण्याच्या कांहीं **गिरण्या** असून एथें **व्यापारही** पुष्कळ चालतो. एथील **भगवंताचें देवस्थान** पाहाण्यासारखें आहे.

## संस्थानें.

**अक्कलकोट**–या संस्थानाचें क्षेत्रफळ सुमारें ५०० चौरस मैल असून उत्पन्न ३–४ लाख आहे. हें संस्थान **भोसले** आडनांवाच्या मराठे राजाच्या ताब्यांत आहे. राजधानी **अक्कलकोट** ( ८ ).

---

# कोंकणांतील मराठी जिल्हे.

## ठाणें.

हा जिल्हा कोंकणाच्या अगदीं उत्तरेकडील व महाराष्ट्राच्या अगदीं पश्चिमेकडील होय.

**सीमा**–*उत्तरेस सुरत जिल्हा, पूर्वेस सह्याद्रि, दक्षिणेस कुलाबा जिल्हा, व पश्चिमेस अरबी समुद्र.

**आकार**––लांबट पेरूप्रमाणें असून टोंक उत्तरेकडे आहे.

**लांबी व रुंदी**–*दक्षिणोत्तर लांबी १०५, व पूर्वपश्चिम जास्तींत जास्ती रुंदी ६५ मैल आहे. क्षेत्रफळ ३,५७४ चौ० मैल. लोकवस्ती ८,८२,०७०. ( दर चौ० मैलीं २४३ ).

**स्वाभाविक रचना***––या जिल्ह्याचा ईशान्येकडील भाग साधारण उंचवट्याचा आहे.

बाकीचा भाग सखल असून उतार पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे.

**नद्या**–*वैतर्णा व उल्हास या मुख्य नद्या होत.

**हवा**––इतर कोंकणाप्रमाणेंच. परंतु ह्या जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं हवा रोगट आहे.

ईशान्य भाग उंचवट्याचा असल्यामुळें तेथील हवा कमी उष्ण आहे.

पुणें मराठी ग्रंथालय.
नारायण पेठ, पुणें

**उत्पन्न व उद्योगधंदे**–या जिल्ह्यांतील विशेष पीक म्हणजे **केळीं** होय. वसईचीं केळीं नामांकित आहेत. या जिल्ह्यांतील सर्व मिठागरांत मिळून दर वर्षी २ लाख खंडी **मीठ** तयार होतें. **रेशमी लुगडीं व ठाणाक्लॉथ** नांवाचें सुती कापड ठाण्यास व भिवंडीस तयार होतें.

**तालुके**—१ ठाणें, २ माहीम, ३ वसई, ४ कल्याण, ५ भिवंडी, ६ डहाणू, ७ मुरबाड, ८ शहापूर, ९ वाडें. **पेटे**–उंबरगांव व मोखाडा.

**गांवें**—*

**ठाणें** ( १६ )—हें जिल्ह्याचें **मुख्य ठिकाण** आहे. हें साष्टी बेटांत आहे. एथें **रेशमी** कापड व **पितांबर** चांगले होतात. **वसई** ( ९ )—एथें एक **जुना किल्ला** आहे. **आगाशी**—एथें **सुकेळीं** चांगलीं होतात. **कल्याण** ( १२ )—हें शहर फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. हें पुण्याहून मुंबईस जाणाऱ्या आगगाडीचे रस्त्यावर मोठें **जंक्शन** असून एथून एक आगगाडीचा फाटा मनमाडकडे गेला आहे. **व्याहाड**–एथें **मोठा तलाव** बांधून त्याचें पाणी मुंबईस आणलें आहे. **कानेरी**–एथें डोंगरावर चांगलीं **लेणीं** आहेत. **वज्रेश्वरी**–एथें **देवीचें स्थान** आहे. एथें **उष्णोदकाचीं** लहान लहान **कुंडें** पुष्कळ आहेत. **वांद्रें** ( २४ )–मुंबईजवळ मोठा गांव आहे.

**जव्हार संस्थान**–हें ठाणें जिल्ह्याचे ईशान्यभागीं आहे. एथील **राजा कोळी** जातीचा आहे. मुलूख डोंगराळ व जंगली आहे. उत्पन्न १॥। लाख. मुख्य गांव **जव्हार** ( ३ ).

## कुलाबा जिल्हा.

**सीमा**—*उत्तरेस ठाणें जिल्हा, पूर्वेस सह्याद्रि व पुणें जिल्हा, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा, पश्चिमेस अरबी समुद्र.

**आकार**–उभट आयताप्रमाणें. **लांबी व रुंदी**–*दक्षिणोत्तर लांबी ७५ व पूर्वपश्चिम रुंदी २५ मैल आहे. क्षेत्रफळ २१३७ चौरस मैल. लोकसंख्या ५,९४,०८०. लोकवस्ती दर चौ॰ मैलास २३१ आहे.

**प्रदेशाचें स्वरूप**---*या जिल्ह्याच्या पूर्वभागीं सह्याद्रि आहे. इतर भागांतही सह्याद्रीचे अनेक फाटे शिरल्यामुळें सर्व प्रदेश डोंगराळ आहे.

**पर्वत**—*पूर्वभागीं सह्याद्रि आहे. त्याचे पुष्कळ फाटे पश्चिमेकडे गेले आहेत.

सह्याद्रीच्या एका फाट्यांत **रायगड** हा डोंगरी किल्ला आहे. दुसऱ्या एका फाट्यांत **माथेरान** हें थंड हवेचें ठिकाण आहे. एथें पुष्कळ बंगले बांधलेले आहेत. मुंबईचे श्रीमंत लोक एथें थंड हवेकरितां येतात.

**नद्या**–*उत्तरभागांत अंबा, मध्यभागांत कुंडलिका, व दक्षिणभागांत सावित्री ह्या मुख्य नद्या होत.

**तालुके**–१ कर्जत, २ पनवेल, ३ पेण, ४ अलिबाग, ५ रोहें, ६ माणगांव व ७ महाड. **पेटे**–नागोठणें, उरण, खालापूर.

**गांवें**---*

**अलिबाग** ( ३ )–हें जिल्ह्याचें **मुख्य ठाणें** आहे. हें मराठ्यांच्या आरमारावरील सरदार **आंग्रे यांची राजधानी** होतें. अलिबागेजवळ समुद्रांत एक **किल्ला** व एक मोठा **दीपस्तंभ** आहे. **रेवदंडा** ( ४ )–हा रहदारीचा गांव असून एथें एक किल्ला आहे. **नागोठणें**–हें **बंदर** आहे. **पनवेल** ( ८ )—मोठी पेठ आहे. एथें देशी **औषधें तयार करण्याचा मोठा कारखाना** आहे. **घारापुरी**–हें उरणाजवळ लहानसें बेट आहे. एथें उत्तम **कोरींव लेणीं** आहेत. त्यांत एक मोठें देवालय असून त्यांतील त्रिमुखी शिवाची मूर्ति १२ हात उंच आहे. **महाड** ( ७ )–एथें **भाताचा मोठा व्यापार** चालतो. एथून ६ कोसांवर **रायगड किल्ला** आहे, त्यावर शिवाजीमहाराजांची **समाध** आहे. **प्रतापगड** किल्ला महाडापासून १२ कोसांवर आहे. किल्ल्यावर शिवाजीची कुलस्वामिनी भवानी या देवीचें देवालय आहे.

जांजेरा संस्थान–हें संस्थान सिद्दी म्हणजे अबिसीनियन जा-[illegible] मुसलमान संस्थानिकाचे ताब्यांत आहे. त्यास नवाब म्हण-[illegible]त्रफळ ३[illegible] चौरस मैल. लोकसंख्या सुमारें पाऊण लाख. [illegible] लाख. मुख्य शहर–मुरूड (४).

# रत्नागिरी जिल्हा.

या जिल्ह्यांतील लोक बुद्धिमान् व तरतरीत आहेत अशी प्रसिद्धि आहे.

**सीमा**–*उत्तरेस कुलाबा जिल्हा, पूर्वेस सह्याद्रि, दक्षिणेस गोवें संस्थान, व पश्चिमेस अरबी समुद्र.

**आकार**–उभ्या आयताप्रमाणें आहे.

**लांबी, रुंदी वगैरे**–दक्षिणोत्तर लांबी १५० व पूर्वपश्चिम रुंदी ४० मैल आहे. क्षेत्रफळ ३९९१ चौ० मैल. लोकसंख्या १२,०३,०००. लोकवस्ती दर चौ० मैलीं ३०१ आहे.

**पर्वत**—*ह्या जिल्ह्याच्या पूर्वभागांतून सह्याद्रि गेला आहे.

मालवण, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, व सुवर्णदुर्ग हे समुद्रकांठचे मुख्य किल्ले होत.

**नद्या**–*सावित्री, वाशिष्ठी, शास्त्री, व मुचकुंदी. सावित्री नदी ह्या जिल्ह्याचे उत्तरेस आहे.

**हवा**—या जिल्ह्यांत झाडी बेताची असल्यामुळें इतर कोंकणी जिल्ह्यांपेक्षां यांतील हवा जास्त चांगली आहे.

**तालुके**–१ रत्नागिरी, २ दापोली, ३ खेड, ४ चिपळूण, ५ संगमेश्वर, ६ राजापूर, ७ देवगड, ८ मालवण, ९ वेंगुर्लें. **पेटे**–मंडणगड व गुहागर.

**गांवें**—*

**रत्नागिरी** (१६)–हें जिल्ह्याचें ठाणें आहे. एथें एक शिल्पशाला असून तींत लाकडी सामान चांगलें तयार होतें.

**दापोली** ( ३ )--एथील हवा नामी आहे म्हणून एथे पूर्वी लष्करी कँप ( छावणी ) होता. **वेळास-नाना फडणिसांची जन्मभूमि** आहे. **चिपळूण** (११)-हें **व्यापाराचें** मोठें **ठिकाण** आहे. देशावरील माल कुभार्ली घाटानें एथ येऊन तो जलमार्गानें मुंबईस रवाना होतो. चिपळुणाजवळ **परशुरामाचें** प्रसिद्ध **देवस्थान** आहे. **संगमेश्वर**-एथील कर्णेश्वर नांवाचें सांबाचें देवालय पाहाण्यासारखें आहे. **राजापूर** ( ६ )-एथें मोठा **व्यापार** चालतो. राजापुराजवळ **गंगेचें प्रसिद्ध स्थान** आहे. ऐथें पाण्याचा प्रवाह आकस्मिकपणें येतो व आकस्मिकपणें नाहींसा होतो. हा प्रवाह **गंगेचा** होय, अशी लोकांची समजूत आहे. एथें शेजारीं **उन्हाळेंही** आहे. **विजयदुर्ग**-हें **बंदर** असून एथें मोठा **किल्ला** आहे. या गांवीं **गव्याचे शिंगावरील नकशीचें काम** उत्तम प्रकारचें होतें. **मालवण** ( २२ )-एथें मोठा **व्यापार** चालतो. **वेंगुर्लें** ( १७ )-हें महत्त्वाचें **बंदर** असून एथें मोठा व्यापार चालतो.

**सावंतवाडी संस्थान**-हें संस्थान या जिल्ह्याचे दक्षिणेस आहे. तें भोसले घराण्यांतील **सरदेसाई** नांवाचे मराठे राजाचे ताब्यांत आहे. संस्थानचें क्षेत्रफळ सुमारें १००० चौ॰ मैल असून उत्पन्न ४ लाख आहे. राजधानी—**सावंतवाडी** ( १० ).

---

**मराठी जिल्ह्यांचा वसूल**--

| | | | |
|---|---|---|---|
| पश्चिम खानदेश | १५,१७,००० रु०. | सातारा | २०,२२,००० रु०. |
| पूर्व खानदेश | २५,३०,००० रु०. | सोलापूर | ११,४४,००० रु०. |
| नाशिक | १५,४९,००० रु०. | ठाणें | १४,०२,००० रु०. |
| पुणें | १४,००,००० रु०. | कुलाबा | १२,९०,००० रु०. |
| नगर | १६,५६,००० रु०. | रत्नागिरी | ८,७०,००० रु०. |

## मराठी संस्थानें.

**कोल्हापूर संस्थान**-( क्षेत्रफळ ३ हजार चौरस मैल. लोकसंख्या ८॥ लाख. उत्पन्न सुमारें ४० लक्ष. ) एथील राजास छत्रपति महाराज असा किताब आहे. **राजधानी**—

**कोल्हापूर** (४८) शहर होय. एथील **देवीचें देवालय** फार जुनें असून तें फार **पवित्र** मानलें जातें. एथील नवा राजवाडा व दुसऱ्या कित्येक इमारती पाहाण्यासारख्या आहेत. पो० एजंट व रेसिडेंट कोल्हापूर एथें राहातो. **विशाळगड, कागल, बावडें, इचलकरंजी** व आणखी ७ लहान संस्थानें कोल्हापूर संस्थानचे अमलाखालीं आहेत.

**दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी–सांगली, जत, जमखंडी, मुधोळ, मिरज** (वडील),**रामदुर्ग, कुरुंदवाड** (वडील), धाकटें मिरज अथवा **मिरजमळा, कुरुंदवाड ( धाकटें )** असे क्षेत्रफळाच्या मानानें या प्रदेशांतील संस्थानांचे नंबर लागतात. ह्या संस्थानांपैकीं मुधोळ व जत हीं मराठे राजांचे ताब्यांत असून इतर सर्व ब्राह्मण राजांचे ताब्यांत आहेत.

---

## दक्षिण भाग.

(ह्या भागांतील ६ जिल्ह्यांपैकीं (१) कुलाबा व (२) रत्नागिरी या जिल्ह्यांचें वर्णन ‘ मराठी जिल्हे ’ या सदराखालीं आलें आहे. बाकीच्या चार जिल्ह्यांचें वर्णन पुढें दिलें आहे. )

**३. बेळगांव जिल्हा.**—मुख्य शहर **बेळगांव** (४२)–याची समुद्रसपाटीपासून उंची सुमारें २५॥ शें फूट असल्यामुळें एथील **हवा थंड** आहे. **गोकाक** ( ७ )–एथें **लांकडी रंगीत सामान** (फळांचे लांकडी नमुने वगैरे) **उत्तम प्रकारचें** होतें. गोकाकजवळचा घटप्रभा नदीचा **धबधबा** पाहाण्यासारखा आहे. त्याची उंची १७६ फूट असून त्याचे पाण्याचे जोरावर एक कापसाची **गिरणी** चालू आहे. **संकेश्वर** एथें **शंकराचार्यांचा मठ** आहे.

**४. विजापूर जिल्हा.**—ह्या जिल्ह्यांत नद्या कमी, पाऊस कमी व झाडीही कमी आहे. हवा थोडीशी उष्ण परंतु कोरडी व फार आरोग्यकारक आहे.

मुख्य शहर **विजापूर** (२७ )–हें शहर **पूर्वी आदिलशाही राजांची राजधानी** होतें. त्या वेळीं या शहराची वस्ती कित्येक लाख होती. एथें अर्धवट पडलेल्या लहानमोठ्या मिळून हजारों

इमारती आहेत. या शहरास एकाबाहेर एक असे तीन तट असून त्यांतील सर्वांत बाहेरील तटाची लांबी ९ मैल आहे. एथील जुन्या **इमारतींपैकीं** कित्येक इमारती **फारच भव्य असून पाहाण्या-साररुया आहेत.** या इमारती एथील पूर्वीच्या मुसलमानी राज्याच्या वैभवाची चांगली साक्ष देतात. या इमारतींपैकीं **गोल घुमट, जुम्मामशीद, मेहेतरमहाल, असार महाल, इब्राहिम रोझा** वगैरे मुख्य होत. गोलघुमट या इमारतीच्या घुमटाची उंची आंतून १७५ फूट व बाहेरून १९८ फूट असून घुमटाचा व्यास १२४ फूट आहे. हा घुमट बांधण्यांत अशी खुबी केली आहे कीं, त्याच्या आंत एका बाजूस उभें राहून एकादा शब्द हळूच उच्चारला तरी तो तेथून ७५ हातांवर समोरच्या बाजूस बसलेल्या मनुष्यास स्पष्ट ऐकूं जातो. एथील इमारतींसारख्या पाहाण्यालायक जुन्या इमारती मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या कोणत्याही शहरीं नाहींत. **तालिकोट ( ७ )–एथें १५६५ सालीं** विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर एथील सुलतान व विजयानगरचा हिंदु राजा यांमध्यें **मोठी लढाई** झाली. तींत विजयानगरच्या राजाचा पूर्ण पराभव झाला, व त्यामुळें तें राज्य लयास गेलें.

**५. धारवाड जिल्हा.**–यांतील जमीन फार सुपीक आहे. तिजमध्यें चांगल्या प्रकारचा **कापूस** होतो. या जिल्ह्यांतील **तुपाची** प्रसिद्धि आहे.

या जिल्ह्यांत सोन्याच्या **खाणी** आहेत. कांहीं ठिकाणीं मॅन्गॅनीज व लोखंड हे धातु सांपडतात.

**धारवाड ( ३० )**–हें जिल्ह्याचें ठाणें आहे. **हुबळी** ( ६१ )–लोकसंख्या व व्यापार या दोहोंच्या मानानें हें **शहर धारवाड जिल्ह्यांत पहिल्या नंबरचें** आहे. हें रेल्वेचें **मोठें जंक्शन** असून एथें आगगाडीचें सामान तयार करण्याचा **मद्रास व सदर्न मराठा रेल्वेकंपनीचा मोठा कारखाना** आहे.

**सावनूर संस्थान**–हें एका नवाबाचे ताब्यांत आहे. उत्पन्न १ लाख. मुख्य शहर–सावनूर.

पुणे मराठा ग्रंथालय
२६७ ब, नारायण पेठ, पुणे २.

६. **कारवार जिल्हा**–( बेळगांवचे दक्षिणेस )–या जिल्ह्यांतील बराच प्रदेश दऱ्याखोऱ्यांचा असून त्यांत झाडी फार आहे व पाऊस अतिशय पडतो. यामुळें झाडांचीं गळून पडलेलीं पानें पावसाळ्यांत कुजून हवा रोगट होते.

या जिल्ह्यांतील शरावती नदी गिरसप्पाजवळ जेथें घाटावरून खालीं पडते, तेथील धबधब्याची शोभा अवर्णनीय आहे. या धबधब्याची उंची ८॥ शें फूट आहे.

या जिल्ह्यांत जंगल पुष्कळ असल्यामुळें सागवानाच्या वगैरे लाकडाचें उत्पन्न बरेंच होतें.

मुख्य शहर **कारवार** ( १८ )–हें पूर्वींपासून बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. मुंबई इलाख्यांतील बंदरांत या बंदराचा नंबर तिसरा आहे. **शिरसी** ( ६ ) या गांवच्या आसपास **वेलदोडे** पुष्कळ पिकतात. हे वेलदोडे शिरसीचे वेलदोडे या नांवानें प्रसिद्ध आहेत. **गोकर्णमहाबळेश्वर** (८)–हें क्षेत्र किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर आहे.

---

# हिंदुस्तान देश.

## ( सामान्य वर्णन. )

अक्षांश ३६° ते ८°; रेखांश ६७° ते ९७°.

आपण ज्या मुंबई इलाख्यांत राहातो तो हिंदुस्तान देशाचा एक विभाग आहे. हा हिंदुस्तान देश ‘ आशिया खंड ’ नांवाच्या एका मोठ्या भूप्रदेशांत आहे. आशिया खंडाच्या दक्षिणेस जीं तीन द्वीपकल्पें दिसतात, त्यांतलें मधलें द्वीपकल्प हिंदुस्तान होय. आशिया खंडांतील मोठ्या देशांमध्यें हिंदुस्तान अतिशय दक्षिणेकडील देश होय.

( द्वीप=बेट; कल्प=बहुतेक सारखे; द्वीपकल्प=बहुतेक बेटासारखें. बेटाचे चोहों बाजूंस पाणी असतें; म्हणून ज्या भूप्रदेशाच्या बहुतेक बाजूंस पाणी असतें त्यास द्वीपकल्प म्हणतात. पूर्व, पश्चिम व दक्षिण या तिन्ही दिशांनीं हिंदुस्तानास पाण्याचा वेढा असल्यामुळें हिंदुस्तानास द्वीपकल्प म्हणतात. )

**सीमा***–उत्तरेस हिंदुकुश, काराकोरम, हिमालय हे पर्वत व त्यांचे पलीकडे पूर्व तुर्कस्तान, व तिबेट हे देश; पूर्वेस आराकानचे व ब्रह्मदेशांतील डोंगर ( आणि त्यांचे पलीकडे ब्रह्मदेश ) व बंगालचा उपसागर; दक्षिणेस हिंदी महासागर; पश्चिमेस अरबी समुद्र व हाला आणि सुलैमान पर्वत ( व ह्या पर्वतांचे पलीकडे अनुक्रमें बलुचिस्तान व अफगाणिस्तान हे देश ) आहेत.

हिंदुस्तानच्या सीमांचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हटलें, म्हणजे हिंदुस्तानच्या एका आंगास अतिशय उंच व दुर्भेद्य अशा पर्वतांचा व दुसऱ्या आंगास समुद्राचा वेढा आहे. अशा सीमा ज्यांच्या आहेत असे फारच थोडे देश पृथ्वींत आहेत.

हिंदुस्तानच्या सीमा अशा प्रकारच्या असल्यामुळें कोणत्याही परराष्ट्रास हिंदुस्तानावर सहज स्वारी करणें शक्य नाहीं. कारण एकीकडे पर्वतांचा दुर्भेद्य तट आहे व दुसरीकडे हिंदीमहासागररूपी प्रचंड खंदक आहे.

**इतर सीमांशीं तुलना**–हिंदुस्तानच्या सीमांसंबंधानें ही विशेष गोष्ट आहे कीं, त्या सर्व स्पष्ट व स्वाभाविक आहेत. मुंबई इलाख्याच्या सर्व सीमा अशा नाहींत. ज्यांच्या सर्व सीमा स्वाभाविक आहेत असे फारच थोडे जिल्हे मुंबई इलाख्यांत आहेत.

---

† जींतून मोठ्या सैन्यास सहज येतां येईल अशी एकही खिंड हिमालय पर्वतास नाहीं. हिंदुस्तानच्या पूर्वेकडील प्रदेश अतिशय डोंगराळ असल्यामुळें त्यांतूनही सैन्यास यावयास चांगलासा मार्ग नाहीं. हाला व सुलैमान या पर्वतांस मात्र कांहीं खिंडी आहेत. त्यांपैकीं खैबरघाट प्रसिद्ध आहे. हिंदुस्तानावर स्वारी करणारे बहुतेक लोक याच मार्गानें आले आहेत.

**आकार**—*हिंदुस्तानचा आकार त्रिकोणाप्रमाणें आहे. या त्रिकोणाचा पाया हिमालय पर्वत होय, व हिंदुस्तानचें दक्षिणेकडील टोंक या त्रिकोणाचा शिरोबिंदु होय.

**लांबीरुंदी**—*हिंदुस्तानची दक्षिणोत्तर लांबी २ हजार मैल आहे व पूर्वपश्चिम रुंदी १९०० मैल आहे. हिंदुस्तानरूपी त्रिकोणाची प्रत्येक बाजूही सुमारें १९०० मैल आहे.

हिंदुस्तानची लांबी मुंबई इलाख्याच्या दुप्पट व पुणें जिल्ह्याच्या २० पटींहून जास्त आहे.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**–**हिंदुस्तानचें क्षेत्रफळ सुमारें १४॥ लक्ष चौरस मैल आहे, व लोकसंख्या सुमारें ३० कोट आहे.** पैकीं ६ लक्ष चौरस मैल प्रदेश व ६कोट लोक एतद्देशीय राजांचे ताब्यांत आहेत.

**क्षेत्रफळाची तुलना**—हिंदुस्तान मुंबई इलाख्याच्या ८ पट मोठें आहे. मुंबई इलाख्यांतील मध्यम प्रतीचा जिल्हा ( उदाहरणार्थ, सातारा किंवा पुणें ) घेतला, तर त्याच्या सुमारें तीनशें पट हिंदुस्तान मोठें आहे.

**हिंदुस्तानचा किनारा**—*हिंदुस्तानचा पूर्व किनारा व पश्चिम किनारा यांच्या बाह्यरेषांमध्यें हा फरक दिसतो कीं, पश्चिम किनाऱ्याची बाह्यरेषा पुष्कळ भागीं बाह्यवक्र आहे व पूर्व किनाऱ्याची बाह्यरेषा पुष्कळ भागीं अंतर्वक्र आहे.

हिंदुस्तानच्या दक्षिणार्धाच्या पश्चिम किनाऱ्यास **मलबार किनारा** व पूर्व किनाऱ्यास **कारोमांडेल किनारा** म्हणतात.

हिंदुस्तानच्या किनाऱ्यास असाव्या तितक्या खाडी नाहींत; यामुळें हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर फारशीं बंदरें नाहींत.

**आखातें, सामुद्रधुन्या वगैरे**—*मॉंझ भूशिरापासून आग्नेयी दिशेनें किनाऱ्याचे बाजूनें गेलें म्हणजे प्रथम

**कच्छचें आखात** लागतें. तें कच्छ संस्थानचे दक्षिणेस आहे. कच्छचे उत्तरेस **कच्छचें रण** आहे. या रणाचें दक्षिणेकडील टोंक कच्छच्या आखाताचे पूर्वेकडील टोंकास मिळालें आहे.

कच्छचें रण म्हणजे एक क्षारमय व पाणथळ असें वाळूचें मैदान आहे. तें सुमारें ८००० चौरस मैल असून पावसाळ्यांत समुद्राचे पाण्यानें भरून जातें. पावसाळा संपल्यानंतर पाणी वाहून गेल्यावर एथील वाळवंटांत जे मासे अडकून राहातात ते मरतात व कुजतात; आणि त्यांची घाण इतकी सुटते कीं, तेथें घोडीं देखील जात नाहींत.

कच्छचे आखाताचे पुढें **खंबायतचें आखात** लागतें. हिंदुस्तानचे दक्षिण टोंकाजवळ हिंदुस्तान व सिलोन यांमध्यें **मानारचें आखात** व **पाल्कची सामुद्रधुनी** हीं आहेत. मानारचें आखात व पाल्कची सामुद्रधुनी यांमध्यें **रामेश्वर** व **मानार** हीं बेटें व त्यांना सांधणारा **रामाचा सेतु** आहे.

रामेश्वर व मानार यांचे दरम्यान पाण्याच्या खालीं थोडया अंतरावर असणाऱ्या वाळूच्या टेकडया व खडक मिळून जो एक तुटका बांध झालेला आहे, त्यास **रामाचा सेतु** म्हणतात. या सेतूच्या जागीं पाणी कमी खोल आहे. या कारणानें एथून मोठीं जहाजें जाऊं शकत नाहींत.

**बेटें**—हिंदुस्तानचे दक्षिणेस **सिलोन** बेट आहे. त्यास हिंदू लोक **सिंहलद्वीप** किंवा **लंका** असें म्हणतात.

सिलोन व हिंदुस्तान यांचेमध्यें रामेश्वर व मानार हीं बेटें आहेत.

मंगळूर बंदराच्या पश्चिमेस जो बेटांचा समूह आहे त्यास **लखदीव बेटें** असें म्हणतात.

'लखदीव' याचा अर्थ लाख बेटें असा होतो. हा 'लक्षद्वीप' याचा अपभ्रंश असावा.

लखदीव बेटांच्या दक्षिणेस दुसरा एक लहान बेटांचा समूह आहे, त्यास **मालदीव बेटें** म्हणतात.

[faint library stamp]

'मालदीव' याचा अर्थ हजार बेटें असा आहे.

लखदीव व मालदीव हीं बेटें ज्या खडकांवर आहेत त्यांचीं उत्पत्ति पोंवळ्याच्या किडयांपासून झालेली आहे. या बेटांत नारळांचें मोठें उत्पन्न होतें. मालदीव बेटें एका मुसलमान राजाचे ताब्यांत आहेत. या दोन्ही बेटांतून पुष्कळ कवड्या व शिंपले परदेशीं जातात.

कारोमांडेल किनाऱ्याचे पूर्वेस बऱ्याच अंतरावर बंगालच्या उपसागरांत **अंदमान व निकोबार** हीं बेटें आहेत. अंदमान बेटें मद्रास शहराच्या पूर्व दिशेस आहेत. निकोबार बेटें सिलोनच्या पूर्व दिशेस आहेत. काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी अंदमान बेटास पाठवितात.

लखदीव व अंदमान बेटें नकाशावर साधारणपणें एकाच आडव्या सरळ रेषेंत दिसतात. मालदीव, सिलोन व निकोबार हीं बेटेंही साधारणपणें एकाच रेषेंत आहेत.

**भूशिरें**--हिंदुस्तानचें अत्यंत पश्चिमेकडील टोंक **मॉंझ** भूशिर होय, व अत्यंत दक्षिणेकडील टोंक **कामोरिन** भूशिर होय. सिलोनच्या उत्तर टोंकासमोर हिंदुस्तानचें जें टोंक आहे, त्यास **कॅलिमियर** भूशिर म्हणतात. कामोरिनपासून कॅलिमियरपर्यंत जातांना प्रथम मानारचें आखात व नंतर पाल्कची सामुद्रधुनी लागते. महानदीच्या मुखाच्या ईशान्येस जें भूशिर आहे त्याचें नांव **पालमिरस** होय.

**हिंदुस्तानांतील प्रदेशांचा उंचसखलपणा.**—गंगा व सिंधु यांच्या कांठच्या प्रदेशापैकीं बराच प्रदेश, अरबी समुद्र व सह्याद्रि यांमधील प्रदेश, तसेंच बंगालचा उपसागर व पूर्वघाट यांमधील प्रदेश हे सखल आहेत. (समुद्रापासून या प्रदेशांत जात असतां डोंगर मुळींच लागत नाहीं यावरून या प्रदेशांची समुद्रसपाटीपासून उंची फारशी नाहीं असें दिसून येईल.) वरील तीन प्रदेशांमधील प्रदेश, ज्यास दख्खन म्हणतात तो, जणू काय, पश्चिम घाट, अरवली, विंध्यपर्वत, आणि पूर्वघाट या पर्वतरूपी भिंतीवर बसविला आहे; यावरून तो उंचवट्याचा आहे असें कळून येईल.

हिंदुस्तानांतील अतिशय उंच भाग म्हणजे अर्थात् हिमालय पर्वत होय.

**हिंदुस्तानचे स्वाभाविक विभाग**—( १ ) हिमालयाचा डोंगराळ प्रदेश. ( २ ) दख्खनचें उंचवटयाचें मैदान. ( ३ ) सिंधु व गंगा यांच्या कांठचीं सखल मैदानें. ( ४ ) अरबी समुद्र व सह्याद्रि यांमधील सखल प्रदेश. ( ५ ) पूर्वघाट व बंगालचा उपसागर यांमधील सखल प्रदेश. पहिल्या भागाची उंची सरासरी १५ हजार फूट आहे; दुसऱ्याची १॥–२ हजार फूट आहे; व बाकीच्या प्रदेशांची ६ शें फुटांपेक्षां कमी आहे.

## पर्वत*—

हिंदुस्तानच्या अत्यंत पश्चिमेकडील टोंकापासून हिंदुस्तानचें सरहद्दीनें आपण उत्तरेकडे जाऊं लागलों म्हणजे प्रथम **हाला** ऊर्फ **खिरथर** पर्वत लागतो. तो दक्षिणोत्तर आहे. ( लांबी २०० मैल. उंची ७२०० फूट. )

**सुलैमान**—हाला पर्वताचे पुढें सुलैमान पर्वत लागतो. तो दक्षिणोत्तर असून सिंधूशीं समांतर आहे.

तख्त्–इ–सुलैमान ( सुलैमान राजाचें सिंहासन ) हें या पर्वताचें अत्यंत उच शिखर होय. ( उंची ११,३०० फूट. )

सुलैमान पर्वताची लांबी ३॥ शें मैल व उंची ७ हजार फूट आहे.

हाला व सुलैमान हे पर्वत हिंदुस्तानचे पश्चिमेकडील व वायव्येकडील तट होत.

**हिंदुकुश**—सुलैमानाचे पुढें सरहद्दीचे बाजूनें गेलें असतां हिंदुकुश पर्वत लागतो. तो ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे ७०० मैल गेला आहे.

हिंदुकुशाचा ईशान्यभाग हिंदुस्तानचे सरहद्दीवर आहे.

**काराकोरम**—हिंदुकुश पर्वताचे ईशान्येकडील टोंका-

पासून काराकोरम पर्वतास आरंभ होतो. तो वायव्येकडून आग्नेयीकडे गेला आहे. ( लांबी ५१६ शें मैल. )

काराकोरम पर्वताच्या **गॉडविन ऑस्टिन** ह्या शिखराची उंची हिमालयाच्या अत्युच्च शिखराच्या खालोखाल आहे.

हिंदुकुश व काराकोरम यांचीं टोंकें परस्परांस जेथें मिळतात तें हिंदुस्तानचें अत्यंत उत्तरेकडील टोंक होय. काराकोरम पर्वत हिमालयाचा एक फाटा आहे असें म्हटल्यास चालेल.

**हिमालय**–हिंदुस्तानचे उत्तर सरहद्दीवर हिमालय पर्वत आहे. या पर्वताइतका उंच पर्वत सर्व जगांत दुसरा नाहीं.

हिम = बर्फ; आलय=स्थान, घर; हिमालयाच्या उंच भागावर नेहमीं बर्फ असतें, व या पर्वताच्या उंच दऱ्यांमध्यें बर्फाच्या नद्या आहेत; म्हणून या पर्वतास **हिमालय** म्हणजे बर्फाचें घर ह्मणतात. आपणाकडे पाठ करून ठेवलेल्या धनुष्याप्रमाणें या पर्वताचा आकार आहे. ( लांबी सुमारें १॥। हजार मैल असून रुंदी सरासरीनें २०० मैल आहे. )

पर्वताच्या अनेक समांतर रांगा मिळून हिमालय झालेला आहे. या रांगांपैकीं दोन रांगा विशेष लांब व उंच असल्यामुळें महत्त्वाच्या आहेत. त्यांपैकीं **दक्षिणेकडील रांग अधिक उंच** आहे. हिमालयाचीं अतिशय उंच शिखरें याच रांगेंत आहेत.

हिमालयाची सरासरी उंची २०,००० फूट आहे. अर्थात् कांहीं भाग यापेक्षां जास्त उंच आहेत व कांहीं कमी आहेत. हिमालयास अनेक उंच शिखरें आहेत; त्यांपैकीं ४० शिखरें २४ हजार फुटांहून जास्त उंचीचीं आहेत. त्या सर्वांत **एव्हरेस्ट** अथवा **गौरीशंकर** हें शिखर अत्युच्च होय. त्याची उंची २९ हजार फूट आहे. **कांचनगंगा**, **धवलगिरी**, **नंदादेवी**, **नंगापर्वत** हीं हिमालयाचीं इतर मोठीं शिखरें होत.

हिमालयावर १६ ते १८ हजार फुटांवर नेहमीं बर्फ असतें.

सोनें, लोखंड, तांबें व शिसें हे धातु हिमालय पर्वतांत पुष्कळ ठिकाणीं सांपडतात.

**हिमालयाचें महत्त्व**—( १ ) हिंदुस्तानांतील निम्मा नद्यांचे उगम हिमालयपर्वतांत आहेत. ( २ ) नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांबरोबर येणारे ढग हिमालयामुळें अडविले जाऊन त्यांचें सर्व पाणी हिमालयाचे दक्षिणेकडील प्रदेशास मिळतें. (३) हिमालयांतून वाहात येणाऱ्या नद्यांमुळें हिमालयाची जी झीज होते तिजपासून उत्पन्न होणारा गाळ सांचून उत्तर हिंदुस्तानास सुपीकपणा आला आहे.

**अरवली**—ही पर्वताची ओळ राजपुतान्यांत आहे. ती ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे गेली आहे. ( लांबी सुमारें ३०० मैल. उंची २००० फूट. ) अरवलीचे नैर्ऋत्येकडील टोंकास **अबूचा पहाड** म्हणतात. ( उंची ५॥ हजार फूट. ) अबूचे पहाडावर जैनांचीं सुंदर देवाळयें आहेत.

**विंध्य**— ही पर्वताची ओळ खंबायतचे आखातापासून थोड्या अंतरावरून निघून पूर्वेकडे—किंचित् ईशान्येकडे—जाते. हा विंध्य पर्वत म्हणजे दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची उत्तरेकडील कड होय.

विंध्यचे पूर्वेकडील फाट्यास **कैमूर पर्वत** म्हणतात. विंध्य पर्वताची लांबी सुमारें ६ शें मैल असून उंची सुमारें २॥ हजार फूट आहे. विंध्याचे दक्षिणेस नर्मदेचें खोरें व उत्तरेस माळव्याचा उंचवट्याचा प्रदेश असल्यामुळें त्याची दक्षिण बाजू उत्तर बाजूपेक्षां जास्त उंच दिसते.

**सातपुडा**—विंध्य पर्वताचे दक्षिणेस नर्मदा व तापी या नद्यांमधील पूर्वपश्चिम डोंगरांची ओळ **सातपुडा** होय.

ही ओळ विंध्य पर्वताशीं समांतर आहे. पर्वताचे पूर्वेकडील भागास **महादेव,** व **पंचमढी टेकड्या** अशीं नांवें आहेत. पंचमढी टेकड्यांची उंची ४॥ हजार फूट आहे. सातपुड्याची लांबी ५ शें मैल व उंची २–२॥ हजार फूट आहे.

**सह्याद्रि**—पश्चिम किनाऱ्यापासून सुमारें १०।४० मैलांचे अंतरावर सह्याद्रीची ओळ आहे. या पर्वतास **पश्चिम-घाट** असेंही म्हणतात. दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची सह्याद्रि ही पश्चिमेकडील कड होय.

पश्चिमघाट किनाऱ्याशीं बहुतेक समांतर आहे. लांबी १००० मैल व उंची सरासरीनें ३॥–४ हजार फूट आहे. ह्या पर्वताचें **मलयगिरी** हें शिखर म्हैसूरचे पश्चिमेस असून त्याची उंची ६३०० फूट आहे. सह्याद्रीच्या पूर्व बाजूपेक्षां पश्चिम बाजू जास्त उतरती व पायथ्यापासून अधिक उंच आहे.

**पूर्वघाट**—पूर्व किनाऱ्यापासून कांहीं अंतरावर उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी जी डोंगरांची रांग दिसते, तीस पूर्वघाट म्हणतात. ही दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची पूर्वेकडील कड होय.‡

लांबी ९ शें मैल. उंची १॥ हजार फूट.

**निलगिरी**—पूर्वघाट व पश्चिमघाट यांना दक्षिणेकडील बाजूस सांधणारी जी डोंगरांची पूर्वपश्चिम ओळ आहे तीस निलगिरी म्हणतात.

---

‡**पूर्वघाट व पश्चिमघाट यांची तुलना**–साम्य–(१) दोन्ही साधारणपणें दक्षिणोत्तर आहेत. (२) दोन्ही साधारणपणें किनाऱ्यांशीं समांतर आहेत. भेद–(१) पूर्वघाटापेक्षां पश्चिमघाट जास्त लांब आहे. (२) पूर्वघाटापेक्षां पश्चिमघाटाची उंची जास्त आहे. (३) पूर्वघाटाची रांग पश्चिमघाटाइतकी सरळ नसून वेडी-वांकडी आहे. (४) पश्चिमघाटापेक्षां पूर्वघाटास खिंडी अधिक आहेत. (५) पूर्वघाट समुद्रापासून जास्त लांब आहे. (६) पश्चिमघाटांत पुष्कळ नद्यांचे उगम आहेत व त्यांतून निघणाऱ्या नद्या दोन्ही बाजूंनीं वाहातात. पूर्वघाटांतून निघणाऱ्या नद्या फक्त एकाच अंगानें वाहातात. (७) पूर्वघाटांतून निघणाऱ्या नद्यांपेक्षां पश्चिमघाटांतून निघणाऱ्या नद्या जास्त लांब आहेत...इ०.

निलगिरीची लांबी सुमारें १०० मैल आहे. **दोडाबेटा** हें निलगिरीचें सर्वांत उंच शिखर होय. त्याची उंची ८७६० फूट आहे.

निलगिरीचे पलीकडे सह्याद्रीस सुमारें २५ मैल लांबीची एक फट आहे, तिला **पालघाटची खिंड** म्हणतात. या फटींतील प्रदेशाची उंची फक्त एक हजार फूट आहे. या खिंडीचे दक्षिणेस सह्याद्रीचा जो भाग आहे त्यास **अनमलाईचे डोंगर** म्हणतात. त्यांतील **अनमुडी** नांवाच्या शिखराची उंची ८८०० फूट आहे. या डोंगरांचे दक्षिणेकडील भागास **कार्डमम् डोंगर** म्हणतात. या डोंगरांचें ( व अर्थात् सह्याद्रीचें ) अत्यंत दक्षिणेकडील टोंक हेंच **कामोरिन भूशिर** होय.

**खिंडी***—वायव्य सरहद्दीवर चार खिंडी आहेत. त्यांपैकीं **बोलन** व **खैबर** या प्रसिद्ध आहेत.

त्यांची उंची १४००० फुटांहून जास्त आहे.

सिकीम संस्थानांतून तिबेटांत जाण्यास **जेलाप ला** नांवाची खिंड हिमालय पर्वतास आहे. उंची सुमारें १७ हजार फूट.

**नद्या***—

उत्तरार्धांतील नद्या व दक्षिणार्धांतील नद्या असे हिंदुस्तानांतील नद्यांचे दोन मुख्य वर्ग करितां येतात. पैकीं उत्तरार्धांतील नद्यांचे ( १ ) सिंधु व तिला मिळणाऱ्या नद्या, व ( २ ) गंगा, ब्रह्मपुत्रा व त्यांना मिळणाऱ्या नद्या असे दोन समूह होतात.

दक्षिणार्धांतील नद्यांचे ( १ ) पूर्ववाहिनी नद्या व ( २ ) पश्चिमवाहिनी नद्या असे दोन वर्ग होतात. त्यांपैकीं बहुतेक नद्यांचे उगम सह्याद्रींत असल्याकारणानें त्यांपैकीं ज्या पूर्ववाहिनी आहेत त्या लांब आहेत, व ज्या पश्चिमवाहिनी आहेत त्या फारच लहान आहेत. नर्मदा व तापी ह्या नद्यांचे उगम विंध्य व सातपुडा यांचे पूर्वभागीं असल्यामुळें त्या लांब आहेत. मोठ्या पूर्ववाहिनी नद्यांपैकीं फक्त महानदीचा उगम सह्याद्रींत नसून तो विंध्याद्रीचे पूर्वभागांत आहे.

**सिंधु ( १८०० )**—सिंधूचा उगम हिमालयाच्या उत्तरेकडील भागांत कैलास पर्वताच्या पश्चिम भागीं होतो. या

...णाशेजारींच सतलज व ब्रह्मपुत्रा या नद्यांचे उगम आहेत. सिंधूस डाव्या बाजूनें **जेहलम, चिनाब, रावी, बियास** व **सतलज** या पांच नद्या मिळून झालेली **पंचनदी मिठ्ठणकोटा**जवळ मिळते. या पांच नद्यांपैकीं जेहलम चिनाबेस मिळते. चिनाब रावीस मिळते व बियास आणि रावी सतलज नदीला मिळतात. उजव्या बाजूनें सिंधूस **काबूल**नदी **अटक** शहराजवळ मिळते. सिंधु पंजाब व सिंध यांतून वाहात जाऊन अरबी समुद्रास मिळते.

**गंगा** ( १५०० )—गंगेचा उगम हिमालयाचे दक्षिण उतरणीवर होतो. हिमालयांत अनेक हिमनद्या* ( हिमनदी=बर्फाची नदी ) आहेत. यांपैकीं एका हिमनदीचे शेवटाजवळ एका कोनाड्यांतून गंगेचा प्रवाह निघतो. या ठिकाणास **गंगोत्री** म्हणतात. गंगेस उजव्या बाजूनें **यमुना** व **शोणनद**, व डाव्या बाजूनें **घोगरा** या नद्या मिळतात. ( चंबळा व बटवा या नद्या माळव्यांतून येऊन यमुनेस मिळतात. ) गंगा प्रथम दक्षिणेकडे, नंतर पूर्वेकडे व मग पुन्हा दक्षिणेकडे वाहात जाऊन अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते.

गंगेच्या अनेक फाट्यांबरोबर वाहून येणारा गाळ सांचून तिच्या मुखाशीं जी भूमि बनलेली आहे तिला **सुंदरबन** म्हणतात. या प्रदेशांत झाडी फार आहे.

इतर नद्यांचें पाणी उन्हाळ्यांत कमी होतें, परंतु गंगेचें पाणी उन्हाळ्यांत थोडेंसें चढतें. याचें कारण हें आहे कीं, गंगेचा उगम

---

* **हिमनदी**—पर्वताच्या शिखरांवर सांचलेलें बर्फ जेव्हां पर्वताच्या उतरणीवरून हळू हळू वाहूं लागतें, तेव्हां त्यास **हिमनदी** म्हणतात. हिमनदीची गति फार सूक्ष्म असते.

हिमनदींत असल्यामुळें उन्हाळ्यांत सूर्याच्या प्रखर उष्णतेनें हिमनदीचें बर्फ वितळून नेहमींपेक्षां जास्त पाणी वाहूं लागतें. ( ही गोष्ट सिंधूसही लागू आहे. ) गंगा ज्या प्रदेशांतून वाहात जाते त्या प्रदेशांत उतार फार कमी आहे; या कारणानें गंगेचा प्रवाह फार संथ वाहतो.

गंगेस अनेक कालवे काढले आहेत. कालव्यांच्या योगानें लाखों एकर जमिनीस पाणी मिळून सुपीकपणा प्राप्त होतो; एवढेंच नव्हे, तर हे कालवे गलबतें जाण्याजोगे रुंद असल्यामुळें त्यांचा, मालाची नेआण करण्यास व मनुष्यांना प्रवास करण्यास, दुसरस्त्याप्रमाणें उपयोग होतो. गंगेच्या प्रवाहांतून व कालव्यांतून मोठ्या होड्या व लहान आगबोटी अलाहाबादेपर्यंत जाऊं शकतात.

गंगेचें शुभ्र पाणी, तिचा संथ व भव्य प्रवाह, तिच्या उगमाजवळच्या प्रदेशाची शोभा, तिच्या कांठच्या प्रदेशाचा सुपीकपणा, व एकंदरींत तिच्या प्रवाहाचा व तिच्या अनेक कालव्यांचा उपयोग यांमुळें तीस एवढें महत्त्व आलेलें असावें.

**ब्रह्मपुत्रा ( १८०० )**—ब्रह्मपुत्रेचा उगम हिमालयाच्या उत्तर भागांत मानस सरोवराजवळ सिंधूचे उगमाशेजारीं आहे. ती प्रथम पूर्वेकडे ८०० मैल वाहात जाऊन वाटेंत टेकड्या आल्यानें मोठें वळण घेऊन हिमालयास वळसा घालून, पश्चिमेकडे ( कांहीं अंशीं नैर्ऋत्येकडे ) वळते. नंतर हिमालय व आसपासच्या टेकड्या यांमधून सुमारें ४०० मैल वाहात गेल्यावर ती दक्षिणेकडे वळते. दक्षिणेकडे वळल्यावर थोड्या अंतरावर तिचे दोन फाटे होतात. त्यांपैकीं पश्चिमेकडील फाटा गंगा नदीच्या **पद्मा** नांवाच्या फाट्यास मिळतो. डाव्या फाट्यास **सुरमा** नदी मिळाल्यानंतर त्यास **मेघ्ना** हें नांव प्राप्त होतें. हा फाटा बंगालच्या उपसागरास मिळतो.

ब्रह्मपुत्रेला तिबेटांत **सांपू** व आसामांत **डिहांग** हीं नांवें आहेत. तिच्या हिंदुस्तानांत उजवीकडून **तिस्ता** व डावीकडून **सुरमा** या नद्या मिळतात.

हिंदुस्तानच्या उत्तरार्धांत पडणारें बहुतेक सर्व पाणी व त्या पाण्याबरोबर वाहून येणारा गाळ शेवटीं सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांत येतो.

**दक्षिणार्धांतील नद्या**–( गंगेचे मुखापासून किनाऱ्याचे बाजूनें हिंदुस्तानचे दक्षिण टोंकास वळसा घालून गेलें असतां, ज्या क्रमानें नद्या लागतात त्या क्रमानें ह्या नद्या दिल्या आहेत. )

पुढील बहुतेक नद्यांचे प्रवाह संथ नाहींत, म्हणून त्यांचा होड्यांस अथवा नांवास उपयोग होत नाहीं.

**महानदी** ( ५२० )–हिचा उगम मध्यप्रांतांत, छत्तिसगडच्या उंचवट्याच्या मैदानाच्या दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेशांत होतो. ती आग्नेयीकडे वाहात जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते.

या नदीस फार मोठे पूर येतात. १८५६ सालीं या नदीस जो मोठा पूर आला होता त्याच्या योगानें लाखों घरांची नासधूस झाली.

**गोदावरी व कृष्णा**—( पान ४ पहा. )

गोदावरीस डाव्या बाजूनें **पूर्णा**, **प्राणहिता** व **इंद्रावती** या नद्या मिळतात. आणि उजव्या बाजूनें **मांजरा** नदी मिळते. मुखाजवळ गोदावरीस मोठमोठे कालवे काढलेले आहेत. त्या सर्वांची लांबी ५ हजार मैलांहून अधिक भरेल. त्यांचा उपयोग शेतांना पाणी देण्यास व होडया चालविण्यासही होतो.

कृष्णेला डावीकडून **भीमा** व उजवीकडून **तुंगभद्रा** या नद्या मिळतात.

**उत्तर पेन्नार** ( ३५५ ), **पालर** ( २३० ), व **दक्षिण पेन्नार** ( २४५ )—या नद्या म्हैसूर संस्थान-

च्या पूर्वभागीं असलेल्या डोंगरांत उगम पावून पूर्वेकडे वाहात जाऊन बंगालचे उपसागरास मिळतात.

**कावेरी ( ४७० )**-ही नदी कुर्ग प्रांतांत सह्याद्रींत उगम पावते. ती प्रथम पूर्व व नंतर दक्षिण दिशेनें म्हैसूर संस्थानांतून वाहात जाऊन, फिरून पूर्वाभिमुखी होऊन म्हैसूर संस्थानांतून बाहेर पडते, आणि मद्रास इलाख्यांतून वाहात जाऊन बंगालचे उपसागरास मिळते.

कावेरीस दोन मोठे **धबधबे** आहेत. पैकीं एक ४६० फूट व दुसरा ३५० फूट उंच आहे. मुखाजवळ कावेरीस अनेक फाटे फुटतात. त्यांपैकीं सर्वांत उत्तरेकडील फाटयास **कोलेरून** म्हणतात.

**तापी, नर्मदा, मही, साबरमती, लुनी—**
( यांसंबंधानें माहिती ३ पानांत पाहा. )

**नद्यांच्या लांबीची तुलना—**नर्मदा, कृष्णा, गोदावरी या नद्या तापीच्या सुमारें दुप्पट लांब आहेत. आणि गंगा, सिंधू, व ब्रह्मपुत्रा या सुमारें चौपट लांब आहेत.

**सरोवरें**—काश्मीरांत जेहलम नदीचा उगमाजवळील प्रवाह पसरून झालेलें **वुलर**, संयुक्त प्रांतांत **नैनितल**, व कृष्णा आणि गोदावरी यांच्या मुखाजवळच्या प्रवाहांच्या दरम्यान **कोलेर**, हीं हिंदुस्तानांतील गोड्या पाण्याचीं सरोवरें होत.

कृष्णा व गोदावरी या नद्यांना पूर येतो तेव्हां त्यांचें जें पाणी दूरवर पसरतें तें सांचून कोलेर सरोवर बनलें आहे. पावसाळ्यांत ह्या सरोवराचें क्षेत्रफळ १०० चौरस मैल होतें.

राजपुतान्यांत **सांबर** व वऱ्हाडांत **लोणार** हीं खाऱ्या पाण्याचीं सरोवरें होत. सांबर सरोवरांतून मीठ पुष्कळ निघतें. महानदीचे मुखाजवळ **चिल्का**, मद्रासचे उत्त-

पुणे मराठी ग्रंथालय ... नारायण पेठ, पुणे

रेस, उत्तर पेन्नार व पालर या नद्यांचे मध्यें **पुलिकत,** व कोचीन बंदराजवळ **कोचीन** हीं समुद्राचें खारें पाणी आंत येऊन झालेलीं सरोवरें आहेत.

चिल्का सरोवर इतकें उथळ आहे कीं, त्याचें क्षेत्रफळ जरी कित्येक चौरस मैल आहे, तरी त्याच्या पाण्याची खोली अवघी ४।५ हात आहे.

**धबधबे**–शरावती नदीच्या योगानें झालेला **गिरसप्पाचा धबधबा** (उंची ८॥ शें फूट), कावेरीचा **शिवसमुद्र** धबधबा (उंची ३॥ शें फूट), व घटप्रभेचा **गोकाकजवळील** धबधबा (उंची १॥। शें फूट) हे महत्त्वाचे धबधबे होत.

**हवा**—

जों जों उत्तरेकडे जावें तों तों हवा कमी उष्ण होत जाते, असा उत्तरगोलार्धासंबंधानें नियम आहे. या नियमास अनुसरून हिंदुस्तानच्या दक्षिणार्धांत असलेल्या देशांपेक्षां उत्तरार्धांत असलेल्या देशांत हवा एकंदरीनें कमी उष्ण असते.

प्रदेशाची उंची जों जों अधिक तों तों त्यांतील हवा जास्त थंड असते. या नियमास अनुसरून हिंदुस्तानचे भिन्न भागांतील हवामानांत पुढील फरक दिसून येतोः—

**हिंदुस्थानच्या उत्तरार्धांत**–काश्मीर व हिमालयावरील प्रदेश यांची समुद्रसपाटीपासून उंची पुष्कळ असल्यामुळें त्यांतील हवा फार थंड आहे. माळवा साधारण उंचवट्याचा प्रदेश असल्यामुळें त्याची हवा मध्यम उष्ण आहे. सिंध व बंगाल देश सखल असल्यामुळें त्यांची हवा उष्ण आहे.

**हिंदुस्तानच्या दक्षिणार्धांत**–दख्खनचा प्रदेश उंचवट्याचा असल्यामुळें त्यांतील हवा मध्यम उष्ण आहे.

पूर्वघाट व पश्चिमघाट यांस लागून असलेले ( घाट व समुद्र यांमधील ) प्रदेश सखल असल्यामुळें त्यांतील हवा उष्ण आहे.

समुद्राजवळच्या प्रदेशांत भिन्न ऋतूंतील हवामानामध्यें जितका फरक पडतो, त्यापेक्षां मोठ्या भूप्रदेशाचे मध्यभागीं असलेल्या प्रदेशांत फार पडतो. या कारणानें माळवा, पंजाब, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत वगैरे भागांत हिंवाळ्यांत थंडी व उन्हाळयांत उन्हाळा पुष्कळ असतो. वाळवंटाच्या किंवा खडकाळ मुलखांत तर हा फरक फार पडतो. ह्मणून राजपुताना व सिंधचा उत्तर भाग या प्रदेशांत हिंवाळा व उन्हाळा हे फारच कडक असतात.

### पाऊस—

मान्सून वाऱ्यांविषयींच्या माहितीवरून हिंदुस्तानच्या भिन्न भागांतील पर्जन्यमानासंबंधानें पुढील गोष्टी कळून येतात.

( १ ) हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर व दक्षिण किनाऱ्यावर* पाऊस पुष्कळ पडतो. ( २ ) किनाऱ्यापासून दूर असलेल्या प्रदेशांत सामान्यतः पाऊस कमी पडतो; ( ३ ) परंतु या प्रदेशांत सखल ठिकाणांपेक्षां उंचवट्याच्या ठिकाणांवर ( व अर्थात् डोंगरांवरही ) पाऊस जास्त पडतो.

आक्टोबरपासून मार्चपर्यंत हिंदुस्तानांत ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वारे वाहातात. या वाऱ्यांना ईशान्येकडील

---

* बंगालच्या उपसागरावरून ईशान्येकडे वाहाणारे वारे प्रथम दक्षिण किनाऱ्याजवळच्या प्रदेशांतून जातात हें याचें कारण होय.

मान्सून वारे म्हणतात. या वाऱ्यांपैकीं बहुतेक वारे हिंदुस्तानच्या ईशान्येकडील भूप्रदेशांतून येत असल्यामुळें त्यांचेबरोबर ढग किंवा पाऊस येत नाहीं. आक्टोबर ते मार्चपर्यंतच्या महिन्यांत हवा कोरडी असते, याचें कारण हेंच आहे.

मात्र या महिन्यांत जे वारे बंगालच्या उपसागरावरून वाहात येतात, त्यांचेबरोबर पाऊस येतो. मद्रास इलाख्याचा पूर्वभाग, निजामचें राज्य, मध्यप्रांत वगैरे हिंदुस्तानच्या **पूर्वकिनाऱ्यानजीकच्या प्रदेशांत आक्टोबर ते जानेवारी महिन्यांत पाऊस पडतो** याचें कारण हेंच आहे.

कमीजास्त पावसाचे प्रदेश—बंगालचे ईशान्यभागीं **खाशीया** टेकड्यांजवळ **पाऊस अतिशय** ( ६ शें इंच ) पडतो. सह्याद्रीचे पश्चिमभागीं पुष्कळ पाऊस पडतो. सिंध, राजपुताना, व पंजाबचा दक्षिणभाग यांत पाऊस फार थोडा पडतो.

**सुपीकपणा**—गंगेच्या कांठचा प्रदेश फारच सुपीक आहे, या प्रदेशांतील कांहीं भागांत एकाच जमिनींतून वर्षांतून दोन तीन पिकें काढतात. नर्मदा, तापी, कृष्णा, गोदावरी व कावेरी या नद्यांच्या मुखांजवळील प्रदेश चांगले सुपीक आहेत. सिंधूच्या कांठच्या प्रदेशापैकीं पंजाबांतील बराच भाग सुपीक आहे.

## उत्पन्न.

### पिकें—

**तांदूळ**—जेथें हवा उष्ण असून पावसाच्या किंवा कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा असतो अशा ठिकाणीं तांदूळ पिकतात. म्हणून पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेश, पूर्व किनाऱ्याजवळील प्रदेश, बंगाल इलाखा व संयुक्त प्रांत

१९७५


या भागांत तांदूळ होतात. **गहूं**—गव्हास थंड हवा लागते व हिंदुस्तानच्या उत्तरार्धांत हिंवाळ्यांत थंडी पुष्कळ असते, म्हणून या भागांत गहूं विशेष पिकतो. **ज्वारी, बाजरी, हरवरा, तूर**—ह्या धान्यांना फार पाऊस सोसत नाहीं; म्हणून तांदळाचा प्रदेश वर्ज करून बाकीच्या बहुतेक भागांत हीं धान्यें होतात. **कापूस**—काळी जमीन, बेताचा पाऊस व उष्ण हवा या गोष्टी कापसास लागतात. या गोष्टी मध्यप्रांत, वऱ्हाड, खानदेश, कर्नाटक, गुजराथ, व सिंध या प्रदेशीं अनुकूल आहेत. म्हणून एथें कापूस पिकतो. **गळिताचीं धान्यें**—उष्ण हवेच्या बहुतेक प्रदेशांत गळिताचीं धान्यें पिकतात. तथापि बंगाल्यांत यांचें फार मोठें पीक होतें. **चहा** दमट ‡ व उष्ण हवेच्या प्रदेशांत पिकतो. आसाम प्रांतांत याचे मोठमोठे मळे आहेत. **ज्यूट***—या पिकास जमीन फार कसदार लागते. याचें पीक बंगाल प्रांतांत होतें. **अफू** माळवा व बहार प्रांतांत पिकते. **नीळ** बहार प्रांतांत पिकते.

इतर पिकें—मका, सातू, ऊंस, तंबाकू, काफी, मिरीं, वेलदोडे, वगैरे.


## फळझाडें—


**नारळ**—हे समुद्राजवळच्या उष्ण हवेच्या प्रदेशांत वाढतात, म्हणून त्यांचीं झाडें हिंदुस्तानांत किनाऱ्याजवळील प्रदेशांत आढळतात. त्यांतूनही पश्चिमकिनाऱ्याजवळील प्रदेशांत यांची उत्पत्ति

---


‡ ज्या हवेंत पाण्याची वाफ पुष्कळ असते तीस दमट म्हणतात.

* पोतीं ज्या कापडाचीं करितात तें कापड ( गोणपाट ) ज्यूटचें केलेलें असतें.



हिंदुस्तानचा नकाशा.
सीमा, पर्वत, नद्या
वगैरे दाखविणारा.
पूर्व तुर्कस्तान
काराकोरम पर्वत
हिंदुकुश पर्वत
विंध्य पर्वत
सातपुडा पर्वत
ब्रह्मपुत्रा नद
पालमिरस भूशिर
बंगालचा उपसागर
हिंदी महासागर
सिलोन
अंदमान बेटें
निकोबार बेटें
मालदीव बेटें





निरनिराळ्या नद्यांच्या लांबीची तुलना.



हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पर्वतांची उंची-संबंधानें तुलना.




DECCAN PRINTING WORKS POONA




हिंदुस्तान, मुंबई इलाखा व मध्यम प्रतीचा जिल्हा यांच्या क्षेत्रफळांची तुलना.

(या चौरसां पैकीं एक चौरस म्हणजे ५००० चौरस मैल समजावयाचे.)






हिंदुस्तानच्या निरनिराळ्या भागांतील पावसांचे प्रमाण.




श्री मराठी ग्रंथाल



DECCAN PRINTING WORKS POONA CITY.


निर्यात् माल.
(१ चौरस = २ कोट रुपये)



आयात माल.
(१ चौरस = २ कोट रुपये)

भाषा.

(१ चौरस = १ कोट लोक.)




निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचें परस्परांशीं प्रमाण.




एक चौरस सुमारें २९ लाख दाखवितो.

विशेष आहे. **सुपारी**-दमट व साधारण उष्ण हवा या झाडास मानवते. म्हणून **सुपारीचें** उत्पन्न पश्चिम किनाऱ्याजवळच्या प्रदेशांत व बंगाल्यांत होतें. **आंबे** हिंदुस्तानच्या बहुतेक सर्व भागांत होतात. **इतर फळें**-केळीं, पेरू, द्राक्षें, डाळिंबें, संत्रीं, नारिंगें वगैरे.

## इमारतीच्या लाकडाचीं झाडें—

**शाल व देवदार**—हे वृक्ष थंड हवेंत वाढतात. म्हणून ते हिमालय पर्वतावरील जंगलांत व छोटानागपूरच्या जंगलांत आढळतात. या दोन्ही वृक्षांचीं लाकडें फार उपयोगी आहेत. **सागवान**-या झाडास पुष्कळ पाऊस मानवतो; परंतु त्यास थंड हवा सोसत नाहीं. म्हणून हीं झाडें मलबार व कोंकणपट्टी या भागांत आढळतात. या लाकडांत जें एक प्रकारचें तेल असतें त्यामुळें यास कीड लागत नाहीं; म्हणून याचें लाकूड फार उपयोगी आहे. **बाभळ**-हा अतिशय उपयोगी वृक्ष कोरड्या व उष्ण हवेंत उगवतो, यामुळें तो कोंकण, मद्रासची पूर्वपट्टी वगैरे दमट हवेच्या प्रदेशांत होत नाहीं. **बांबू** अथवा **कळक**—हा उष्ण व दमट हवेंत उगवणारा वृक्ष आहे. म्हणून तो देशावर होत नसून कोंकणांत होतो. शिवाय शिसू, खैर, वड, लिंब वगैरे अनेक उपयोगी वृक्ष हिंदुस्तानांत आहेत.

**इतर झाडें-चंदन**-कोरड्या व मध्यम उष्ण हवेंत उगवणारा हा वृक्ष होय. तो देशावर, विशेषतः म्हैसूर प्रांतांत, आढळतो. **रबर**-रबराचीं झाडें आसामांत फार आहेत.

## प्राणी —

**हत्ती**—ज्या प्रदेशांत मोठीं जंगलें असून हवा साधारण उष्ण असते अशा ठिकाणीं हत्ती असतात. म्हणून म्हैसूर प्रांतांत व हिमालयाचे पायथ्याशीं असलेल्या जंगलांत ते आढळतात. **उंट**-सिंध व राजपुताना या प्रांतांतील वाळवंटाच्या मैदानांत उंटांचा फार उपयोग होतो, व असेच प्रदेश त्यांना मानवतात; म्हणून ते वरील प्रांतांत आढळतात. **घोडे**—थंडी व चरावयास गवताचीं रानें ज्या प्रदेशांत असतात, ते प्रदेश घोड्यांना मानवतात. म्हणून काठेवाड

व पंजाब या प्रदेशांत चांगल्या प्रकारचे घोडे निपजतात. **बैल**—म्हैसूर, गुजराथ, महाराष्ट्र व आग्र्याचे आसपासचा प्रदेश या भागांत चांगल्या प्रकारचे बैल आढळतात. **इतर उपयोगी प्राणी**—म्हशी, मेंढरें, बकरीं, गाढवें इत्यादि.

**सिंह**—काठेवाडांत गिरनार पर्वताचे जंगलांत कांहीं सिंह आहेत. **वाघ**—हिंदुस्तानांत ज्या ज्या भागांत जंगल आहे त्या त्या बहुतेक भागांत वाघ आहेत. बंगालमधील वाघ फार मोठे व बलाढ्य असतात अशी त्यांची प्रसिद्धि आहे. **इतर हिंस्र प्राणी**—चित्ता, तरस, अस्वल, लांडगा, कोल्हा, खोकड वगैरे.

कांहीं नद्यांतून मोठमोठ्या सुसरी आहेत. रानटी पण हिंसा न करणारे असे इतर प्राणी गेंडे, गवे, रानडुकरें, माकडें, ससे इत्यादि होत.

हिंदुस्तानच्या सर्व भागांत सर्प आहेत.

**पक्षी**—चिमणी, राघू, कावळा, पारवा, कबूतर, मैना, घार, बहिरीससाणा, गिधाड, मोर, गरुड......इ०

## खनिज संपत्ति—

**सोनें**—म्हैसूरचे नैर्ऋत्य व पूर्वभागीं, आणि धारवाड जिल्ह्यांत सोन्याच्या खाणी आहेत. **लोखंड**—मध्यप्रांत व बंगाल यांत सांपडतें. **दगडी कोळसा**—मध्यप्रांत, बहार-ओरिसा, बंगाल व आसाम यांत सांपडतो. **सोरा**—बहार प्रांतांत सांपडतो. **मीठ** पंजाबांत मिठाच्या डोंगरांत सांपडतें. **संगमरवरी दगड**—यांच्या खाणी राजपुतान्यांत आहेत.

पोरबंदरचे आसपास चुनखडीचे **पांढरे दगड** पुष्कळ सांपडतात.

**मोतीं**—सिलोनजवळ समुद्रांत मोतीं सांपडतात.

## उद्योगधंदे—

कलाकौशल्यासंबंधानें हिंदुस्तानची प्राचीन काळापासून प्रसिद्धि आहे. ढाक्याची मलमल पूर्वी अतिशय प्रसिद्ध

होती. अद्यापही काश्मीरच्या शालजोड्यांची ख्याति आहे. नकशीचें काम कांहीं ठिकाणीं उत्कृष्ट होतें.

युरोपखंडांत युरोपियन लोक यंत्रांच्या साह्यानें पुष्कळ प्रकारचा माल तयार करितात. यंत्रानें तयार होणारा माल सुबक असून थोड्या किंमतीला पडतो. असा माल हिंदुस्तानांत येऊं लागल्यामुळें या देशांतील हातानें माल तयार करण्याचे कारखाने बसत चालले आहेत. परंतु विलायती यंत्रें आणून त्यांच्या साह्यानें माल तयार करण्याचे कारखाने एतद्देशीय लोक अलीकडे काढूं लागले आहेत. यंत्रांच्या साह्यानें सूत, कापड, लोखंडी व इतर धातूंचें सामान तयार करण्याचे कारखाने हिंदुस्तानांत बऱ्याच ठिकाणीं निघाले आहेत.

मुंबई इलाखा व मध्यप्रांत यांत कापूस पुष्कळ पिकतो; म्हणून मुंबई, नागपूर व अहमदाबाद या शहरीं कापसाचें कापड तयार करण्याच्या गिरण्या पुष्कळ आहेत.

पंजाबांत व पंजाबच्या शेजारचे प्रदेशांत पुष्कळ लोंकर उत्पन्न होते. शिवाय या प्रदेशांत हिंवाळ्यांत थंडी फार असल्यामुळें ऊबदार कपड्यांची जरूरी एथील लोकांना विशेष आहे. या कारणानें लोंकरीचें कापड या प्रांतांत व आसपासचे प्रदेशांत फार होतें.

पंजाबांत **धारिवाल** एथें व संयुक्त प्रांतांत **कानपूर** एथें **लोंकरीच्या गिरण्या** आहेत.

ज्यूट फक्त बंगालमध्येंच पिकतो, म्हणून त्याचें कापड (**गोणपाट**) विणण्याच्या गिरण्या फक्त **बंगालमध्येंच** आहेत.

गालिचे तयार करणें, धातूंवर व हस्तिदंतावर नकशीचें काम करणें, भांडीं करणें वगैरे कामें ठिकठिकाणीं होतात.

**कलाकौशल्याचीं कामें**—कलाकौशल्याचे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य श्रीमंत लोकांनाच असतें. म्हणून जे देश फार सुपीक

आहेत, अथवा जेथें पूर्वी मोठीं राज्यें होतीं अशा देशांतच कला-कौशल्याचे पदार्थ विशेष तयार होतात. मोठीं राज्यें पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल या देशांत मुख्यतः होऊन गेलीं; म्हणून या देशांत कलाकौशल्याचें काम विशेष दृष्टीस पडतें. मोठया क्षेत्रीं पुष्कळ ठिकाणचे श्रीमंत लोक येतात व तेथें मालाची विक्री पुष्कळ होते. म्हणून कांहीं क्षेत्रांचे ठिकाणींही कारागिरीचे पदार्थ होतात. **दिल्ली, मुर्शिदाबाद, डाका, लखनौ, अहमदाबाद, श्रीनगर**, वगैरे शहरें व **काशी** वगैरे क्षेत्रें कलाकौशल्याचे कामाविषयीं प्रसिद्ध आहेत, याचें कारण वरील गोष्ट होय.

## दळणवळणाचीं साधनें.

**रस्ते**—ज्यांवरून घोडयांच्या गाडया चालू शकतील असे रस्ते पूर्वी हिंदुस्तानांत फारसे नव्हते. परंतु हल्लीं हिंदुस्तानच्या सर्व भागांत चांगले रस्ते झाले आहेत. या सर्व रस्त्यांची लांबी २ लाख मैल भरेल. **कालवे**–सर्व कालव्यांची लांबी ३३ हजार मैल आहे. पैकीं कांहीं कालवे लहान गलबतांना उपयोगीं पडण्यासारखे आहेत. **आगगाड्यांचे रस्ते**–आगगाडीच्या सर्व रस्त्यांची लांबी २७००० मैलांहून जास्त आहे. **पोस्ट**–सर्व हिंदुस्तानांत सुमारें १० हजार पोस्ट ऑफिसें आहेत. **तारायंत्र**–सर्व तारायंत्राची लांबी ५० हजार मैलांवर भरेल.

**आगगाडीचे रस्ते**–हिंदुस्तानांतील मुख्य आगगाडीचे रस्ते पुढीलप्रमाणें होत.

## रुंद रूळांचे रस्ते.

**नॉर्थ वेस्टर्न रेल्वे**—कराची व दिल्ली या शहरांपासून उत्तरेकडे व वायव्येकडे हिंदुस्तानचे सरहद्दीपर्यंत ही रेल्वे गेली आहे. **ईस्ट इंडिया रेल्वे**–हा रस्ता दिल्लीपासून कलकत्त्यापर्यंत, गंगेच्या दक्षिण बाजूनें गेला आहे. **औंध रोहिलखंड रेल्वे**–दिल्लीपासून काशीपर्यंत, गंगेच्या उत्तर बाजूनें, ही रेल्वे गेली आहे. **ईस्टर्न बंगाल रेल्वे**–कलकत्त्यापासून बंगालच्या पूर्व भागांत व उत्तरेस

दार्जिलिंगपर्यंत या आगगाडीचे रस्ते गेले आहेत. **बंगाल नागपूर रेल्वे**–कलकत्त्यापासून नागपूर,–जबलपूरपर्यंत, व उत्तरसरकारांत विजगापट्टणपर्यंत या आगगाडीचे रस्ते गेले आहेत. **मद्रास रेल्वे** मद्रासेपासून वायव्येकडे रायचूरपर्यंत, ईशान्येकडे उत्तरसरकार प्रांतांत वॉल्टेअरपर्यंत, व नैर्ऋत्येकडे कालिकतपर्यंत, गेली आहे. **ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे** मुंबईपासून उत्तरेकडे दिल्लीपर्यंत, पूर्वेकडे जबलपूर व नागपूरपर्यंत, आणि आग्नेयीकडे रायचूरपर्यंत गेली आहे. **मुंबई बडोदा व सेंट्रल इंडिया रेल्वे** मुंबईपासून वढवाणपर्यंत. **ईस्टकोस्ट रेल्वे**–हा रस्ता वॉल्टेअरपासून किनाऱ्याचे बाजूनें कलकत्त्याकडे गेला आहे.

## अरुंद रुळांचे रस्ते.

**बंगाल व नॉर्थ वेस्टर्न रेल्वे**–काशीचे पूर्वेस गंगेच्या उत्तरेकडील प्रदेशांत या आगगाडीचे रस्ते पसरले आहेत. **राजपुताना माळवा रेल्वे**–अहमदाबादपासून राजपुतान्यांतून दिल्ली व आग्र्यापर्यंत हा रस्ता गेला आहे. **जोधपूर विकानेर रेल्वे**–सिंधमधील हैद्राबादपासून राजपुतान्यांतील जोधपूर, विकानेर इत्यादि शहरांपर्यंत हा रस्ता गेला आहे. **भावनगर गोंडल जुनागड पोरबंदर रेल्वे**–काठेवाडच्या निरनिराळ्या भागांत हे रस्ते पसरले आहेत. ( **मद्रास व** ) **सदर्न मराठा रेल्वे** पुण्यापासून गोवा, विजापूर, मद्रास, म्हैसूर इकडे गेली आहे. **साउथ इंडया रेल्वे** मद्रासेपासून दक्षिणेकडे मद्रास इलाख्याच्या दक्षिण भागांत गेली आहे.

**आगगाड्यांचे उपयोग**––मनुष्याची व मालाची त्वरित नेआण करण्यास आगगाडी विशेष उपयोगी आहेच. पण ( १ ) एकाद्या ठिकाणीं दुष्काळ पडला असतां तेथें परठिकाणाहून धान्य नेऊन दुष्काळाचें उग्र स्वरूप कमी करण्यास, व ( २ ) बंड किंवा लढाई उपस्थित झाली असतां सैन्य ताबडतोब नेण्यास आगगाडीचा फार उपयोग होतो. ( ३ ) भिन्न प्रदेशांतील लोकांत दळणवळण वाढवून त्यांच्यामध्यें स्नेहभाव वाढविण्यासही आगगाडी कारण होते.

सुपीक व दाट वस्तीच्या प्रदेशांत मालाची नेआण पुष्कळ होते. सपाट प्रदेश साधारणपणें सुपीक असतात, व त्यांत रस्ते तयार करणें सोपें जातें. म्हणून असा साधारण नियम आहे कीं, **सुपीक व सपाट प्रदेशांत आगगाडीचे रस्ते पुष्कळ होतात.**

**व्यापार**—हिंदुस्तानांतून दरवर्षी सुमारें १॥। शें कोट रुपयांचा माल परदेशीं जातो, व सुमारें सवाशें कोट रुपयांचा माल परदेशांहून हिंदुस्तानांत येतो. मुंबई, कलकत्ता, कराची व मद्रास हीं मुख्य बंदरें आहेत.

**परदेशीं जाणारा माल**—कापूस, कापड, तांदूळ, गहूं, ज्यूट, गोणपाट, गळिताचीं धान्यें, अफू, चहा, कातडीं, नीळ, काफी, लोंकर, लाख, मसाले इ०.

निर्यात मालापैकीं बहुतेक माल युरोप खंडांत जातो. कापड आफ्रिकेंत व चिनांत जातें.

**परदेशाहून येणारा माल**—कापड, सूत, सोनें, रुपें व इतर धातु, धातूंचे पत्रे आणि धातूंचे केलेले जिन्नस, साखर, राकेल, रेशीम, दारू, यंत्रें, काच......वगैरे.

हिंदुस्तानचा **निर्यात माल** बहुतेक **कच्चा** * **माल** असतो व **आयात माल पक्का** ‡ माल असतो.

हिंदुस्तानचा व्यापार इंग्लंड देशाशीं फार आहे. त्याच्या खालोखाल अनुक्रमें चीन, फ्रान्स, जर्मनी, आफ्रिका ह्या देशांशीं आहे.

**लोकसंख्या**—एकंदर लोकसंख्या ३० कोट आहे. पैकीं हिंदु २१ कोट, मुसलमान ७ कोट, ख्रिस्ती पाव कोट, शीख २० लाख, जैन १५ लाख, बुद्धधर्मी ३ लाख, पार्शी सुमारें १ लाख व यहुदी १३ हजार आहेत. डोंगरांत राहाणाऱ्या लोकांची संख्या सुमारें १ कोट आहे.

---

* कच्चा माल=सृष्टीमध्यें आपोआप तयार होणारे पदार्थ; उदाहरणार्थ—धान्यें, अशुद्ध धातु......वगैरे.

‡ पक्का माल=कच्च्या मालापासून कृतीनें तयार केलेले पदार्थ; उदाहरणार्थ—कापड, धातु, धातूचे पदार्थ......वगैरे.

बंगाली लोक बुद्धिवान् म्हणून आणि शीख, रजपूत, मराठे व मुसलमान शूर म्हणून प्रसिद्ध आहेत.

**भाषा**—हिंदुस्तानांत निरनिराळ्या शंभर भाषा आहेत. पैकीं पुढील भाषा महत्त्वाच्या आहेत.

**संस्कृत भाषेपासून झालेल्या भाषा**—हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी. **द्राविडी भाषा**—तेलगू किंवा तेलंगी, तामिली उर्फ द्रविडी, कानडी, व मल्याळी.

हिंदी व फारशी या भाषांचे मिश्रणापासून झालेली **उर्दू ऊर्फ हिंदुस्तानी भाषा** हिंदुस्तानांतील मुसलमान बोलतात.

**शिक्षण**-शिक्षणाचा दिवसेंदिवस प्रसार होत आहे. सर्व शाळांत मिळून ४०।५० लाख विद्यार्थी शिकत असतात.

इंग्लिशांचें राज्य होण्यापूर्वीं सर्व जातींच्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था हिंदुस्तानांत नव्हती; परंतु हल्लीं सर्वांना शिक्षण मिळावें अशी योजना सरकारनें केली आहे.

**सरकारी उत्पन्न**—एक अब्जाहून जास्त आहे.

**राजधानी**—दिल्ली.

## हिंदुस्तानचे विभाग.

| | मुख्य शहर. | क्षेत्रफळ. (हजार चौ॰मै॰) | लोकसं॰ (लाख.) |
|---|---|---|---|
| पंजाब ... ... ... | लाहोर | ९७ | २०० |
| संयुक्तप्रांत ... ... | अलाहाबाद | १०७ | ४७२ |
| बंगाल ... ... ... | कलकत्ता | ७० | ५०० |
| बहार (छोटा नागपूर व ओरिसा-यांसह ) ... ... | पाटणा | ८० | ३४० |
| आसाम ... ... ... | शिलांग | ५६ | ६५ |
| मुंबई ... ... ... | मुंबई | १२३ | १९७ |
| मद्रास ... ... ... | मद्रास | १४१ | ४१४ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड ... | नागपूर | १०४ | १३९ |
| वायव्य सरहद्दीवरील प्रांत | पेशावर | १६ | २२ |
| कूर्ग ... ... ... | मर्कारा | १॥। | २। |
| अजमीर-मेरवाडा... ... | अजमीर | २॥। | ५ |

## संस्थानें.

| | | | |
|---|---|---|---|
| हैदराबाद ( निजामचें राज्य ) | हैदराबाद | ८२ | १३४ |
| म्हैसूर ... ... ... | म्हैसूर | २९ | ५८ |
| बडोदें ... ... ... | बडोदें | ८ | २० |
| काश्मीर ... ... ... | श्रीनगर | ८० | ३२ |
| राजपुतान्यांतील संस्थानें | | १२७ | १०६ |
| मध्य हिंदुस्तानांतील संस्थानें | | ७९ | ९४ |
| पंजाबांतील संस्थानें ... | | ३६ | ४२ |
| संयुक्तप्रांतांतील संस्थानें | | ५ | ८ |
| बंगालमधील संस्थानें | | ३८ | ५२ |
| बहार–ओरिसा प्रांतांतील संस्थानें. | | | |
| मध्यप्रांतांतील संस्थानें | | २९ | २१ |
| मुंबई इलाख्यांतील संस्थानें | | ६५ | ६९ |
| मद्रास इलाख्यांतील संस्थानें | | १० | ४८ |

**परराष्ट्रांच्या ताब्यांतील मुलूख–फ्रेंचांचे ताब्यांतील**–चंद्रनगर, यानान, कारिकल, पाँडिचरी व माही. **पोर्तुगीजांचे ताब्यांतील**–दीव, दमण व गोवें.

समाप्त.